एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
• मुंबई, गुरुवार ४ जून, २०२६ • वर्ष-१०४, अंक-९१, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 91 Marathi - Daily - Mumbai, 4 June, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे
24x7 : www.navakal.in
Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
CJP आणि ६ जूनचं आंदोलन.
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## थोडक्यात...

### विमान इंधनासाठी १० हजार कोटी

**नवी दिल्ली -** मध्य पूर्वेतील युद्धामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर कच्च्या तेलाचे दर वाढल्याने देशात पेट्रोल-डिझेलसह विमानाच्या इंधनाच्या दरातही प्रचंड वाढ झाली आहे. त्यामुळे विमान प्रवास महागला असून संपूर्ण हवाई उड्डाण क्षेत्र त्यामुळे प्रभावित झाले आहे. या संकटाचा सामना करण्यासाठी विमान इंधनाचे दर स्थिर रहावेत म्हणून १० हजार कोटी रुपयांच्या निधीला आज केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर ही माहिती दिली. आंतरराष्ट्रीय स्तरावर कच्चा तेलाच्या किमती वाढत असताना देशात विमान इंधनाचे दर स्थिर राखल्यास सरकारी मालकीच्या तेल कंपन्यांना अतोनात तोटा सहन करावा लागतो. त्यामुळे तेल कंपन्या तोटा कमी करण्यासाठी इंधनाची दरवाढ करतात. ज्याचा हवाई उड्डाण क्षेत्राला, विमान प्रवाशांना आणि सर्वसामान्य माणसांना फटका बसतो. यातून मध्यम मार्ग काढण्यासाठी सरकारने हा दहा हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निधीमुळे इंधनाचे दर स्थिर ठेवण्याचा फटका तेल कंपन्यांना बसणार नाही.

# शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांची अमेरिकेत मालमत्ता?
# सीबीएसई परीक्षेत गोंधळ घालणाऱ्या कंपनीशी नाते

**सीबीएसई आणि नीट युजी-२०२६ परीक्षांमध्ये घातलेल्या प्रचंड गोंधळामुळे लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात घालणारे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे आणखी काही कारनामे उघड झाले आहेत. धर्मेंद्र प्रधान यांची मुलगी अमेरिकेत कायद्याचे शिक्षण घेताना ज्या बंगल्यात रहात होती तो बंगला ओडिशामधील एका शिक्षण संस्थेच्या मालकीचा आहे आणि प्रधान यांच्या पत्नीचा त्या संस्थेशी थेट संबंध आहे. त्यामुळे हा बंगला प्रधान यांच्याच मालकीचा आहे असा संशय व्यक्त होत आहे. दुसरी गोष्ट म्हणजे प्रधान यांच्या मुलीची अमेरिकेत सर्व व्यवस्था सीबीएसई परीक्षेत गोंधळ घालणाऱ्या कोएम्पट या कंपनीच्या संचालकाने केली होती, असा आरोप विरोधकांनी केला आहे. यामुळेच शिक्षण मंत्री प्रधान यांनी राजीनामा द्यावा, या मागणीने अधिक जोर धरला आहे.**



■ नवी दिल्ली

**कॉकरोच** जनता पार्टी (सीजेपी) प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी येत्या शनिवारी ६ जून रोजी सकाळी ८ वाजता नवी दिल्ली विमानतळावर पोहोचणार आहेत. त्यानंतर ते लडाखचे पर्यावरणवादी सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांच्यासोबत दिल्लीतील पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाण्यात जाऊन जंतरमंतर येथे आंदोलन करण्यासाठी परवानगी मागणार आहेत, अशी माहिती पक्षाचे मुख्य प्रवक्ते सौरभ दास यांनी दिली. या आंदोलना संदर्भात नवी दिल्ली कॉन्स्टिट्युशन क्लब ऑफ इंडिया येथे पत्रकार परिषद घेण्यात आली. या आंदोलनात एक मोठा नेताही पक्षात प्रवेश करणार आहे.

प्रधान यांची मुलगी अमेरिकेत कायद्याचे शिक्षण घेत असताना ज्या बंगल्यात वास्तव्याला होती तो बंगला विकास एज्युकेशन ट्रस्ट नावाच्या शैक्षणिक संस्थेच्या मालकीचा आहे. या संस्थेशी प्रधान यांच्या पत्नीचा थेट संबंध आहे, तर सीबीएसई परीक्षेच्या मूल्यांकनाचे कंत्राट प्रधान यांनी ज्या 'कोएम्प्ट एडू टेक' या कंपनीला दिले होते त्या कंपनीचे संचालक राधाकृष्णन जयरामन यांनीच प्रधान यांच्या मुलीची अमेरिकेत सर्व व्यवस्था पाहिली होती. याच कोएम्प्ट एडु टेक कंपनीने सीबीएसई परीक्षेच्या मूल्यांकनात गोंधळ घालून लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ केला आहे. ओडिशातील विरोधी पक्ष बिजू जनता दलाने हा मुद्दा उचलून धरला असून विकास फाउंडेशन ट्रस्टशी त्यांच्या पत्नीचे नाव जोडले गेल्याबाबत स्पष्टीकरण देण्याची मागणी केली आहे. सोशल मीडियावर विकास फाउंडेशनबाबत नवनवी माहिती समोर येत आहे. » पान ७ वर

### नीटची कोरी उत्तरपत्रिका २० लाखांत भरून देणारे एजंट


नीट परीक्षेतील एक अतिशय धक्कादायक आणि नवा प्रकार समोर आल्याने खळबळ उडाली आहे. पेपर फुटी प्रकरणानंतर आता नीट पुनर्परिक्षेबाबत या नव्या रॅकेटमुळे वैद्यकीय प्रवेश परीक्षेच्या पारदर्शकतेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाला आहे. एका विद्यार्थ्याच्या तक्रारीनंतर हा प्रकार उघड झाला आहे. नीटची मार्किंगची उत्तरपत्रिका अर्थात ओएमआर शीट कोरी ठेवायची आणि नंतर २० लाख रुपयांमध्ये ती भरून दिली जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

या धक्कादायक माहितीनुसार मध्यस्थाने एका विद्यार्थ्याशी संपर्क साधला. पेपर फोडण्याऐवजी थेट उत्तरपत्रिकाच मॅनेज करणार असल्याचे त्याने म्हटले. या रॅकेटचा पर्दाफाश अहमदाबादमधील शुभम ठक्कर नावाच्या विद्यार्थ्याने केला आहे. शुभमने २०२३ आणि २०२४ मध्ये स्वत: नीट परीक्षा दिली होती. मध्यस्थांसोबत झालेले त्याचे संभाषण त्याने स्वत: रेकॉर्ड केले आणि या संपूर्ण प्रकरणाची गुजरात सायबर सेलकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. सायबर सेल आता » पान ७ वर

## महाराष्ट्रात पावसाची दमदार हजेरी मुंबई ते जयसिंगपूरपर्यंत परिणाम



**राज्यातील विविध भागांत आज पहाटेपासून पावसाने जोरदार हजेरी लावल्याने उष्णतेने हैराण झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. हा मान्सून पूर्व पाऊस आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, वसई-विरार, कल्याण, पनवेल, कोकण, पुणे, सांगली, कोल्हापूर, बुलडाणा आणि अहिल्यानगरसह अनेक भागांत पावसाच्या सरी कोसळल्या. काही ठिकाणी पहिल्याच पावसात पाणी साचले.**


मुंबई

■ मुंबई

**मुंबईतील** अंधेरी, जोगेश्वरी, वांद्रे, लोअर परळ, दहिसर, मालाड, मुलुंड, सायन आणि चेंबूर परिसरात सकाळी पाऊस झाला. पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला. अंधेरी सबवे पहिल्याच पावसात पाण्याखाली गेल्याने टीका होत आहे. सबवे परिसरात काढून ठेवलेल्या गाळामुळे पाण्याचा निचरा न झाल्याने सकाळी ७.४० वाजता खबरदारीचा उपाय म्हणून सबवे वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. पश्चिम द्रुतगती महामार्गावर (वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे) रस्ता निसरडा झाल्याने बस आणि चारचाकी वाहनाचा अपघात झाला. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मुंबई महापालिकेच्या आकडेवारीनुसार सकाळी ७ ते ८ या एका तासात पश्चिम उपनगरांमध्ये सरासरी ९.८४ मिमी पावसाची नोंद झाली. दक्षिण मुंबईत ०.९६ मिमी तर पूर्व » पान ७ वर

## कुवेत आणि बहरीनमधील अमेरिकी तळांवर इराणचा हल्ला! संघर्ष तीव्र

■ तेहरान

**अमेरिका** आणि इराण यांच्यातील तणाव पुन्हा एकदा वाढला असून, इराणच्या आयआरजीसी म्हणजे इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड्स



कॉर्प्सने कुवेत आणि बहरीनमधील अमेरिकी लष्करी तळांवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोनद्वारे हल्ला केला आहे. या हल्ल्यांमध्ये अमेरिकन नौदलाच्या पाचव्या ताफ्याच्या मुख्यालयासह हवाई आणि हेलिकॉप्टर तळांना लक्ष्य करण्यात आल्याचे इराणने म्हटले आहे.

मात्र, अमेरिकन सेंट्रल कमांडने हा दावा फेटाळून लावत इराणने डागलेली बहुतेक क्षेपणास्त्रे आणि ड्रोन हवेतच नष्ट करण्यात आल्याचे सांगितले. कुवेतवर डागलेली दोन क्षेपणास्त्रे लक्ष्यापर्यंत पोहोचली नाहीत, तर बहरीनकडे डागलेली तीन क्षेपणास्त्रे अमेरिकन आणि बहरीनच्या हवाई संरक्षण यंत्रणांनी पाडली, असा अमेरिकेचा दावा आहे.

दरम्यान, अमेरिकेने होर्मुज सामुद्रधुनीजवळील इराणच्या केशम बेटावरील एका दळणवळण केंद्रावर हल्ला केला आहे. हा हल्ला आत्मसंरक्षणासाठी करण्यात आल्याचा दावा अमेरिकेने केला आहे. कुवेतने इराणच्या हल्ल्याचा तीव्र निषेध करत » पान ७ वर

## पंतप्रधान मोदींच्या बचतीच्या सूचनेमुळे सुप्रिया सुळेंच्या कन्येचे विवाह रिसेप्शन रद्द

■ मुंबई

**राष्ट्रवादी** शरदचंद्र पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांची मुलगी



रेवती सुळे आणि सारंग लखानी यांच्या विवाहानंतर नागपूर येथे रिसेप्शन आयोजित करण्यात आले होते. मात्र व्याही अरुण लखानी यांना भाजपाने विधान परिषद आमदारकी देऊ केल्यावर त्यांना उपरती आली. पंतप्रधान मोदी यांनी बचतीचे आवाहन केल्याचे कारण देत त्यांनी नागपूरला नियोजित रिसेप्शन रद्द केले.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

सामान्य जनतेला कोणताही त्रास होऊ नये तसेच मोठ्या कार्यक्रमांमुळे होणारा अतिरिक्त खर्च टाळावा, या भूमिकेतून सुळे कुटुंबाने हा कौटुंबिक निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. अतिरिक्त खर्च टाळण्याचे कारण दिले असेल तर रेवती सुळे आणि सारंग लखानी यांचा विवाह २० जून रोजी मुंबईत थाटात पार पडणार आहे. हा थाटमाट करण्यापेक्षा साधेपणाने कोर्ट मॅरेज का करत नाही असा सवाल विचारला जात आहे. या विवाह सोहळ्यासाठी सुप्रिया सुळे यांनी दिल्लीत जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेस नेते राहुल गांधी, काँग्रेसच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांच्यासह विविध राजकीय पक्षांतील अनेक दिग्गज नेत्यांना निमंत्रण दिले आहे.

## शिवसेना उभी फोडली! आता तृणमूलवर घाव ममता बॅनर्जींचे ५८ आमदार फुटले! स्वतंत्र गट

■ कोलकाता

**महाराष्ट्रात** शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे पक्ष उभे फोडल्यानंतर देशातील तिसरा प्रादेशिक पक्ष तृणमूल फोडण्यात आला आहे. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपाने विजय मिळवत तृणमूल काँग्रेसची १५ वर्षांची सत्ता हटवली. त्यानंतर आता हा पक्ष फोडण्यात आला आहे.

पक्षांतर्गत धुसफूस मोठ्या प्रमाणात उफाळली. पक्षाचे प्रमुख नेते अभिषेक बॅनर्जी, कल्याण बॅनर्जी या नेत्यांवर हल्ले झाले. त्यानंतर ममता बॅनर्जी रस्त्यावर उतरल्या. यादरम्यान तृणमूलचे ऋतब्रत बॅनर्जी यांनी बंडाळी केली. त्यांनी आज ५८ आमदारांच्या समर्थनासह विधानसभा अध्यक्ष रथींद्र बोस यांची भेट घेऊन विधिमंडळ पक्षाचे नेते होण्यासाठी पत्र सादर केले. यामुळे देशातील तिसरा महत्त्वाचा प्रादेशिक पक्षही फुटल्याची चर्चा रंगली आहे. ममता बॅनर्जी यांनी स्थापन केलेला पक्ष आणि पक्षाचे चिन्ह दोन्ही त्यांच्याकडून हिसकावून घेण्यात आले आहे.

बंगालमध्ये झालेल्या निवडणुकीत तृणमूलने ८० जागा जिंकल्या होत्या. ५८ आमदारांच्या बंडखोरीनंतर आता ममतांकडे फक्त २२ आमदार उरले आहेत. मात्र बंडखोर गटाने आपल्या पत्रात ममता बॅनर्जी यांना अजूनही पक्षाध्यक्ष म्हटले आहे. पण ते अभिषेक बॅनर्जींचे नेतृत्व आणि विधिमंडळ पक्षाशी » पान ७ वर

## नवी मुंबईत शरद पवार गटाचे वाढत्या महागाईविरोधात आंदोलन

**सुप्रिया सुळे-रोहित पवार ताब्यात**

■ नवी मुंबई

**वाढत्या** महागाईविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाने नवी मुंबईत आक्रमक आंदोलन छेडले. या आंदोलनादरम्यान खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार, आमदार जितेंद्र आव्हाड, आमदार शशिकांत शिंदे यांच्यासह अनेक नेत्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. महिला पोलिसांनी शरद पवार गटाच्या नेत्या रोहिणी खडसे आणि सक्षणा सलगर यांनाही ताब्यात घेतल्याची माहिती आहे.

महागाईच्या निषेधार्थ कार्यकर्त्यांनी भररस्त्यात



बसून आंदोलन केले. तसेच रस्त्यावरच चूल पेटवून भाकरी थापत सरकारच्या धोरणांविरोधात निषेध नोंदवला.

यावेळी रोहित पवार हे महिला कार्यकर्त्यांसोबत आंदोलनात सहभागी झाले होते. यावेळी बोलताना रोहित पवार म्हणाले की, महागाईमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जीवन अधिक कठीण होत » पान २ वर

## अदानीकडे आणखी दोन वसाहती पुनर्विकास प्रकल्प निविदा खुल्या


■ मुंबई

**म्हाडाच्या** मुंबई मंडळाने वरळीतील आदर्श नगर, अंधेरी आणि वांद्रे रेक्लमेशन येथील म्हाडा वसाहतींच्या पुनर्विकासाच्या आर्थिक निविदा नुकत्याच खुल्या केल्या असून यात अदानी समूहाने बाजी मारली आहे. या तिन्ही वसाहतींपैकी वरळी आणि वांद्रे येथील प्रकल्प अदानीकडे गेले आहेत. वास्तविक, धारावी आणि गोरेगावमधील मोतीलाल नगरच्या विक्रमी पुनर्विकासानंतर आता अदानी समूहाकडे हे आणखी दोन मोठे गृहनिर्माण प्रकल्प आले आहेत.

कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट प्रारुपानुसार मोतीलाल नगर पुनर्विकासाच्या धर्तीवर तीन म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास करण्याचा निर्णय मुंबई मंडळाने घेतला आहे. त्यानुसार वरळीतील आदर्श नगर,वांद्रे पश्चिम येथील वांद्रे रेक्लमेशन आणि अंधेरी पश्चिम येथील सरदार वल्लभभाई पटेल नगरचा रखडलेला पुनर्विकास या प्रारुपानुसार करण्यासाठी मुंबई मंडळाने निविदा मागविल्या होत्या. या निविदेला चांगला प्रतिसाद मिळाला. आर्थिक निविदेनुसार आदर्श नगर पुनर्विकासासाठी अदानी प्रॉपर्टीज, लोढा समूह आणि जेएसडब्ल्यू समूहाने निविदा सादर केल्या होत्या.वांद्रे रेक्लमेशनसाठी अदानी प्रॉपर्टीज, लोढा समूह आणि जेएसडब्ल्यू याच कंपन्यांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या.

## 'काला हिरन'वर सलमान खानचा आक्षेप दिग्दर्शकांना कायदेशीर नोटीस पाठवली

**बॉलिवूड अभिनेता सलमान खान याच्याशी संबंधित १९९८ च्या जोधपूर चिंकारा शिकार प्रकरणावर आधारित 'काला हिरन' चित्रपट तयार होत आहे . मात्र या चित्रपटावर आक्षेप घेत सलमानच्या वकिलांनी चित्रपटाच्या कास्टिंग डायरेक्टरला कायदेशीर नोटीस पाठवली आहे. हा चित्रपट सलमान खानची बदनामी करणारा असून त्याच्या स्वत:चे व्यक्तिमत्व जपण्याच्या अधिकाराचे त्यामुळे उल्लंघन होत आहे, असे या नोटीसीमध्ये म्हटले आहे.**




■ मुंबई

**१९९८ रोजी** हम साथ साथ है, या चित्रपटाच्या चित्रिकरणादरम्यान चिंकारा जातीच्या हरणांची शिकार केल्याचा आरोप सलमान खानवर आहे. सलमानसोबत सहकलाकार सोनाली बेंद्रे आणि तब्बू यादेखील यासंबंधीच्या खटल्यात आरोपी होत्या. हे प्रकरण देशभर गाजले.राजस्थान उच्च न्यायालयात सलमानवरील खटला आजही प्रलंबित आहे. काला हिरनचे कथानक या चिंकारा शिकार प्रकरणावर बेतलेले आहे. त्यामध्ये सलमान खान याच्या नावाचा प्रत्यक्ष उल्लेख करण्यात आलेला » पान २ वर

## नसरापूर प्रकरणात मुलांची साक्ष पत्र्याच्या शेडमध्ये नेताना पाहिले

■ पुणे

**पुण्यातील** भोर तालुक्यातील नसरापूर येथे एका चिमुकलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या केल्याच्या खटल्यात महत्त्वाची घडामोड घडली आहे. घटनेच्या वेळी आरोपी पीडित मुलीला पत्र्याच्या शेडमध्ये नेताना तीन लहान मुलांनी पाहिले होते. न्यायालयात या मुलांनी आपली साक्ष नोंदवली आहे. येरवडा कारागृहात झालेली ओळख परेड आणि न्यायालयातील सुनावणीदरम्यान व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर असलेल्या आरोपीला त्यांनी अचूक ओळखले.

या प्रकरणात न्यायालयाने आरोपीविरुद्ध आरोपनिश्चिती केली असून, खटल्याची पुढील सुनावणी सुरू आहे. प्रत्यक्षदर्शी असलेल्या या तीन मुलांच्या साक्षीमुळे पोलीस तपासाला महत्त्वाचा आधार मिळाल्याचे मानले जात आहे. घटनेच्या दिवशी ही तिन्ही मुले परिसरात खेळत होती. त्यावेळी आरोपीने त्यांना हटकले होते.

## शौर्यचक्र विजेते अमित राणा यांचा हिमाचलमध्ये अपघाती मृत्यू

■ शिमला

**हिमाचल** प्रदेशात झालेल्या रस्ते अपघातात शौर्य चक्र विजेते आणि भारतीय नौदलाच्या मार्कोस कमांडो दलाचे माजी अधिकारी अमित सिंह राणा (३२) यांचा मृत्यू झाला. कांग्रा जिल्ह्यातील लाहरू परिसरात त्यांची कार सुमारे ५०० फूट खोल दरीत कोसळल्याने ही दुर्घटना घडली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, चार वर्षांचा मुलगा, आई-वडील आणि दोन बहिणी असा परिवार आहे. राणा हे कुटुंबातील एकमेव होते. अमित राणा सकाळी रजेवर आपल्या घरी आले होते. त्यानंतर रात्री ते एका मित्राला भेटून ११ वाजताच्या सुमारास परत येत असताना लाहरूजवळच्या धोकादायक वळणावर त्यांची कार अचानक खोल दरीत कोसळली. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अत्यंत खोल आणि अवघड भूभाग असल्याने बचावकार्य मोठ्या अडचणीचे ठरले. सुमारे एक तासाच्या



प्रयत्नांनंतर अमित राणा यांना दरीतून बाहेर काढले. त्यानंतर त्यांना खुंडियान रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. अमित सिंह राणा हे भारतीय नौदलातील विशेष कमांडो दल मार्कोसमध्ये कार्यरत होते. त्यांनी २०१८ मधील 'ऑपरेशन रक्षक' दरम्यान दहशतवादविरोधी कारवायांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली होती.

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

अनुभवी मुले पाहिजेत, सत्राप्लाझा, वाशी येथे. हाऊसकीपींग, पे आणि पार्किंग, प्लंबर, इलेक्ट्रिशियन, गवंडी, वेल्डर, कारपेन्टर, सीसीटीव्ही, सिक्युरीटी. 8369729052 {NC260763}

गोरेगाव पूर्व येथे व्हेज/ नॉनव्हेज रेस्टॉरंटसाठी कर्मचारी पाहिजेत किचन मोरी स्टाफ, वेटर्स, किचन हेल्पर्स टेबल क्लिनिंग बॉय, डिलीव्हरी बॉय, सेमी किचन शेफ, फूड पार्सल पॅकींग स्टाफ, कॅशियर/ बिलिंग एक्झिक्युटिव्ह. संपर्कः 9833119998 {NC260769}

१) क्लार्कच्या कामासाठी चांगले अक्षर असलेली रिटायर्ड व्यक्ती पाहिजे. २) क्लार्कच्या कामासाठी कॉम्प्युटरची माहिती असलेली महिला पाहिजे. ३) चारचाकी सुपर कॅरीसाठी ड्रायव्हर पाहिजे. भेटा- आशिर्वाद टायर सर्व्हिस, ९ गोकुळदास पास्ता रोड, चित्रा सिनेमाच्या बाजुला, दादर (पूर्व), मुंबई - ४०००१४. {NCC260021}

नामांकित कंपनीत खालील पदे भरणे आहे. अकाऊन्टट (टॅली, वर्ड, एक्सेल) आवश्यक. सुपरवायझर, प्लंबर, वेल्डर, ड्रायव्हर, हेल्पर. भेटा-३०, सर्वोदया ट्रस्ट बिल्डिंग, गोखले रोड साऊथ, पोर्तुगीज चर्चजवळ, दादर (वेस्ट) {NC260789}

सिक्युरिटी हाऊसकीपिंग कंपनीला- सेल्स/ मार्केटिंग मॅनेजर, अकाऊंटंट, ॲडमिन, टेलिकॉलर, एरिया मॅनेजर, फील्ड ऑफिसर, सिक्युरिटीगार्ड/ सुपरवायजर हाऊसकीपिंग मुले/मुली पाहिजेत- 9223380568/69 {NC260798}

## पाहिजेत

इमिटेशन ज्वेलरीसाठी त्वरित अनुभवी मुली पाहिजेत. दहिसर ईस्ट, संपर्क 7021374861 {NC260715}

भिवंडी फॅक्टरीमध्ये वर्कर लेबर आणि पॅकींगसाठी मुले मुली पाहिजेत 7039364173 {NC260797}

सीएसटी मुंबई येथील पेस्ट कंट्रोल कंपनीला फवारणी करणारी माणसे पाहिजे. पगार 12000+ गाडीभाडे+ कमिशन 8356824867 {NC260794}

डायरेक्ट भरती. सिक्युरीटीगार्डस पाहिजेत. बीकेसीकरीता. ड्युटी १० तास. पगार 18,000/- + PF, ESIC+ जेवण+टिप. २८ दिवस काम. 8796977016/ 9311037316 {NC260795}

मालाड- सराऑगी हॉस्पिटलमध्ये बाई आणि नर्स पाहिजेत. पगार अनुभवानुसार.- 9372179410/ 8169717250/ 8850941620 {NC260796}

## Situation Vacant

GAURI ENTERPRISES Requires Female Office Staff. 12th. Goregaon. 9321366513. {NC260776}

## Situation Vacant

PROGRESSIVE SURFACE SYSTEMS
A Leading Manufacturer of Surface Treatment and Electroplating Chemicals is looking for a
Maintenance Engineer
for its Vasai plant.
Candidates must have experience with handling chemical reactor vessel. Mtech,Diploma in Mechanical or ITI background candidates can apply
Contact :79778 84280,
E-Mail : recruit@progressivesurfacesystems.com

Urgently required Near Sanpada Station DTP With Designing Operator, Cutting/ Xerox Machine Operator Contact 9322987465 {NC260793}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: 9820627580 / 9820904646 {NC260552}

## व्यवसायविषयक

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा अनिरुद्धा दादर- 9076403434/ 8652643434 {NC260680}


### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.
- मॅनेजर, 'नवाकाळ'

## 'काला हिरन'वर सलमान खानचा आक्षेप

पान १ वरून - नाही. मात्र तरीदेखील चित्रपटाच्या कथानकावरून हे प्रकरण सलमान खानवर बेतलेले आहे हे कोणालाही सहज समजून यावे, अशा रितीने चित्रपटाची पटकथा लिहिण्यात आली. त्यातील प्रसंगदेखील प्रत्यक्ष घडलेल्या प्रसंगांप्रमाणे आहेत. अमित जानी हे या चित्रपटाचे निर्माते आहेत. तर अक्षय पांडे हे कास्टिंग डायरेक्टर आहेत. पांडे यांनाच सलमानच्या वकिलांनी ही नोटीस पाठवली. सोशल मीडियावर हा चित्रपट चिंकारा शिकार प्रकरणावर आधारित आहे, अशी जाहिरात केली जात आहे.

# कोकण आणि दख्खन यांना जोडणारा ऐतिहासिक अमृतांजन-पूल



**बोरघाटाचा** रस्ता पुरा होऊन १० नोव्हेंबर, १८३० रोजी खुला करण्यात आला, त्याचे स्मरण करून देणारी ही स्मृतिकमान होती. त्या कमानीच्या दगडी खांबावर जी संगमरवरी शिळा बसवण्यात आली होती, तिच्यावर सर मेजर जनरल जॉन माल्कम यांच्या कारकिर्दीत कॅप्टन ह्यूजेस यांनी या घाटरस्त्याचे काम पुरे केले, असा उल्लेख होता.

दख्खन आणि कोकण यांना जोडणारा, 'चाकांच्या वाहनांसाठी' बांधलेला असा हा घाटरस्ता आहे, याचाही उल्लेख या कोनशिलेत होता. अमृतांजन पूल हा जसा त्याच्या डोक्यावर चढल्यावर विशाल भूभागाचे दर्शन घडवत असे, तशीच तो एक भौगोलिक सीमारेषाही होता. म्हणजे, हा पूल ओलांडून पुण्याकडे गेले, की हवामान एकदम बदलत चालल्याचा अनुभव येई; तसेच मुंबईकडे येतानाही. एका अर्थाने, मुंबई आणि पुण्यातील फरकाचे सूचन करणाराही तो बदल असे. आता इतर फरकही मिटून गेल्यानंतर, हा सूक्ष्म हवामान बदल जाणवून देणारी खूणही इतिहासात गेल्यास त्यात नवल नाही. जवळपास दोनशे वर्षे होत आली, तरी या बांधकामाचा चिराही ढासळलेला नव्हता. केवळ वाहतूक कोंडीचे कारण पुढे करून ही सुरेख कमान पाडली जाऊ नये, यासाठी अनेकांनी प्रयत्न केले. करोना मुळे सर्व व्यवहार बंद असताना कोकण आणि दख्खन यांना जोडणारा ऐतिहासिक 'अमृतांजन पूल' अखेर वर्तमानातून इतिहासात जाऊन बसला आहे. ५ एप्रिल २०२० रोजी हा पूल पाडला गेला.

> १८३० साली वापरण्यास सुरुवात झाली. खरे तर, याला 'अमृतांजन पूल' असे नाव पडले, ते त्याच्यावर रेखाटलेल्या अमृतांजन या पेन बामच्या भव्य जाहिरातीमुळे. ते काही त्याचे मूळ नाव नव्हते. दुसरे असे, की त्याला पूल म्हटले गेले, तरी तो काही वाहतूक होणारा पूल नव्हता. ती एक नितांतसुंदर बांधकाम केलेली दगडी कमान होती. तिला स्मरणकमान असेही म्हणले जायचे.



आधुनिक तंत्र वापरून आणि मूळ बांधकामातच छिद्रे घेऊन, स्फोटकांची पेरणी करून, पूल उडविल्यामुळे इतर कोणत्याही बांधकामांना धक्का लागला नाही मात्र, ब्रिटिश राज्यकर्त्यांनी ज्या काही भल्या गोष्टी केल्या, त्यातल्या या पुलाची आठवण प्रवाशांना तेथून जाताना झाल्याशिवाय राहणार नाही. आणखी बरोबर दहा वर्षांनी स्मरण कमानीची द्विशताब्दी झाली असती.

**संजीव वेलणकर, पुणे**

# घोटाळेबाज टोरेस पुन्हा सक्रिय गुंतवणुकदारांना फोन व मेसेज

■ मुंबई

**मुंबईत** हजारो गुंतवणुकदारांची फसवणूक करणारी टोरेस कंपनी पुन्हा सक्रिय झाल्याची चर्चा सुरू झाली आहे. टोरेस इंटरनॅशनल या नावाने काही गुंतवणुकदारांना फोन कॉल, टेक्स्ट मेसेज आणि ऑनलाइन माध्यमांतून नव्याने गुंतवणूक करण्याचे आमिष दाखवले जात आहे.

दादर येथील टोरेस ज्वेलरी घोटाळा उघडकीस आल्यानंतर अवघ्या १८ महिन्यांतच जुन्या गुंतवणुकदारांशी पुन्हा संपर्क साधला जात आहे. जानेवारी २०२५ मध्ये टोरेस ज्वेलरी घोटाळा उघडकीस आला होता. मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईतील सहा ज्वेलरी दुकानांच्या माध्यमातून सुमारे १.२५ लाख गुंतवणुकदारांची तब्बल १७७ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप करण्यात आला होता. या फसवणुकीला बळी पडलेल्या अनेकांना त्यांची जुनी खाती पुन्हा सुरू करण्यास सांगितले जात आहे. नव्या योजनांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी प्रलोभने दिली जात आहेत.

# मी तुला फ्री करतोय! व्हिडिओ करून सोलापुरात पतीची आत्महत्या

■ सोलापूर

**सोलापुरात** जाकीर अब्दुल रज्जाक (३८) याने पत्नीच्या कथित अनैतिक संबंधांमुळे टोकाचे पाऊल उचलत आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी त्याने पत्नीच्या नावाने मी तुला फ्री करतोय, असे म्हणत ६ मिनिटांचा व्हिडिओ तयार केल्याने परिसरात खळबळ उडाली. या घटनेचा पोलिसांकडून तपास सुरू असून, कौटुंबिक वादातून हा प्रकार घडल्याची माहिती आहे.

काल रात्री ८ वाजताच्या सुमारास जाकीरने राहत्या घरात सिलिंग फॅनला गळफास घेत आत्महत्या केली. सकाळी जाकीरचे पत्नीसोबत कौटुंबिक वाद झाले, याच वादानंतर संध्याकाळी त्याने टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती आहे. त्याने आत्महत्या करण्यापूर्वी ६ मिनिटांचा एक व्हिडिओ पत्नीच्या नावे बनवला. त्याने व्हिडिओमध्ये रडत म्हटले की, मी तुला फ्री करतो आहे, मी तुला आझाद करतो आहे, आता तुला बोलायला, अडवायला कोणी नसणार. मी तुला खूप समजावले, परंतु तू कधीच ऐकले नाही. त्यामुळे आज मी हे पाऊल उचलतो आहे. आधीही मी सांगितलेलं फोन नको करु त्याला...वारंवार समजावले, मात्र तू ऐकले नाही... फोन करत होती, तू सगळ्यांच्या आयुष्याची वाट लावली.

# आजचे राशी भविष्य

गुरुवार ता. ४ जून २०२६
ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| | |
|---|---|
| मेष | उत्साहाने कार्यरत राहाल. सहकाऱ्यांची साथ लाभेल. योजलेल्या कामांमध्ये सफलता मिळेल. नवीन संधी उपलब्ध होतील. |
| वृषभ | संयमाने वाटचाल महत्त्वाची राहील. नियोजनाअभावी नुकसानीची शक्यता. स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घ्याल. |
| मिथुन | कार्यक्षेत्रात नवीन जबाबदारी स्वीकारावी लागेल. नवीन तंत्रज्ञान अवगत कराल. आर्थिक प्राप्ती चांगली होईल. नोकरीत मान वाढेल. |
| कर्क | कामाचे चीज होईल. सामाजिक क्षेत्रात मानसन्मान मिळेल. खर्चाचे प्रमाण वाढेल. |
| सिंह | महत्त्वाच्या कामांमध्ये सफलता मिळेल. सहकाऱ्यांची साथ लाभेल. नोकरीत जबाबदारी वाढेल. |
| कन्या | कार्यक्षेत्रात काही कामांसाठी अधिक वेळ द्यावा लागेल. रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक. नोकरीनिमित्त प्रवास घडेल. |
| तूळ | कामात व्यस्त राहाल. सामाजिक कार्यक्रम आयोजित करण्यात मदत कराल. दूरच्या प्रवासाच्या योजना आखाल. |
| वृश्चिक | कार्यक्षेत्रात नवीन संधी उपलब्ध होतील.नोकरीत स्वतःचे कौशल्य सिद्ध कराल. जोडीदाराचे सहकार्य चांगले राहील. |
| धनु | आर्थिक व्यवहार लांबणीवर पडण्याची शक्यता राहील. घरातील ज्येष्ठांच्या आरोग्याची समस्या उद्भवू शकते. नोकरीत वाद टाळा. |
| मकर | महत्त्वाच्या कामांमध्ये अचानक बदल होऊ शकतो. बोलण्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक. आरोग्य सांभाळा. |
| कुंभ | अती धाडस त्रासदायक ठरू शकते. जोडीदाराशी जुळवून घ्यावे लागेल. नोकरीत जबाबदारी स्वीकारावी लागेल. |
| मीन | योजलेली कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहाल. चिडचिड वाढू शकते. नोकरीत सहकाऱ्यांशी पटवून घ्यावे लागेल. |

# कांदा खरेदीसाठी वखार महामंडळाची अजब अट

■ नाशिक

**वखार** महामंडळाच्या कठोर निकषांमुळे नाफेडच्या कांदा खरेदीत अडचण निर्माण झाली आहे. केंद्र सरकारच्या अटींनुसारच ९५ हजार टन कांदा खरेदी करण्यात येणार असल्याचे सांगत वखार महामंडळाने कांदा हा समान आकाराचा हवा, ही अट टाकली आहे. या निकषामुळे सुमारे ५० टक्के कांदा नाकारण्यात आला आहे.

या परिस्थितीमुळे नाफेडच्या पुढील कांदा खरेदीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधित निकषांमध्ये बदल करण्यासाठी नाफेडकडून केंद्र सरकारला पत्र पाठविण्याची तयारी सुरू आहे. नाफेडच्या खरेदी निकषांनुसार कांदा चांगल्या गुणवत्तेचा म्हणजे

### ५० टक्के माल नाकारला

ए ग्रेडचा असावा. त्याचा आकार साधारण ५५ मिमी असावा, कांदे शक्यतो एकसमान आकाराचे असावेत, त्यांच्या कवचाला मोठ्या प्रमाणात इजा झालेली नसावी. कांद्याचे टरफल निघालेले नसावे. यंदा अवकाळी पाऊस आणि तीव्र उष्णतेमुळे कांद्याच्या गुणवत्तेवर परिणाम झाला आहे. त्यामुळे या निकषांनुसार मोठ्या प्रमाणावर कांदा पात्र ठरत नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. यावरून काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांनीही केंद्र सरकारवर टीका केली आहे. ते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जो अनेक देशांसोबत कृषी करार केला आहे तोच शेतकऱ्यांना बुडवणारा आहे. या कराराची समीक्षा झाली पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांना खड्ड्यात घालण्याचे काम केले आहे. तो करार रद्द होईपर्यंत शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारू शकत नाही.

# मुलाला उमेदवारी न मिळाल्याने गुलाबराव पाटलांची शायरीतून खंत

■ जळगाव

**जळगाव** स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील विधान परिषदेची जागा भाजपाच्या वाट्याला गेल्याने मंत्री गुलाबराव पाटील नाराज आहेत. आपल्या मुलाला विधान परिषदेत पाठवण्याची त्यांची इच्छा अपूर्ण राहिल्याचे बोलले जात असताना, गुलाबराव पाटील यांनी नसीब में होगा तो उछलकर आयेगा और नसीब में नही होगा तो आकर चला जायेगा अशी शायरी करत खंत व्यक्त केली आहे.

जळगावच्या जागेसाठी त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी अनेकदा चर्चा केली होती. महायुतीतील जागावाटपात जळगावची जागा भाजपाकडे गेल्याने त्यांची अपेक्षा पूर्ण होऊ शकली नाही. यावर गुलाबराव पाटील म्हणाले की, अनेक लोक म्हणतात की, तुम्हाला विधान परिषदेसाठी तिकीट मिळाले नाही. मी एवढेच सांगतो, देवाच्या मनात यापेक्षाही पुढे आयुष्यात काही चांगले होणार असेल. त्यामुळे प्रारब्धावर विश्वास ठेवा. सगळ करा, राजकारण जरूर करा, पण भगव्याचा विचार कधी सोडू नका.

# नवी मुंबईत शरद पवार गटाचे वाढत्या महागाईविरोधात आंदोलन

पान १ वरून

आहे. पेट्रोल, डिझेल, घरगुती गॅस आणि व्यावसायिक गॅसच्या दरात झालेल्या वाढीचा फटका सामान्य आणि मध्यमवर्गीय नागरिकांना बसत आहे. या नागरिकांचा आवाज सरकारपर्यंत पोहोचावा आणि सरकारने महागाईच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहावे.

खासदार सुप्रिया सुळे यांनीही यावेळी केंद्र सरकारवर टीका केली. त्या म्हणाल्या की, राज्याची नव्हे तर देशाची आर्थिक परिस्थिती ही प्रचंड अडचणीत आहे. याबद्दल आम्ही सगळे वारंवार बोललो आहोत. माझी भारत सरकारला विनंती आहे की, पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली एक सर्वपक्षीय बैठक बोलवावी आणि देशाच्या आर्थिक परिस्थितीवर चर्चा झाली पाहिजे.

# लॉटरी

## महाराष्ट्र अक्षय विकली लॉटरी

सोडत दर बुधवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 22 • सोडत दिनांक 03/06/2026

| | | |
|---|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख | AK-04 : 9195 | |
| प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- | पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी 9195 | किशोर लॉटरी सेंटर, सांगली / महाराजा असोसिएट्स - इचलकरंजी |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 6864 | श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1630 | 3108 | 5909 | 5924 | 5942 | 6682 | 8168 | 8835 | 8955 | 9798 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0541 | 1953 | 5326 | 5405 | 5684 | 5966 | 6145 | 6935 | 7754 | 9200 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1654 | 2083 | 2147 | 2404 | 3029 | 6191 | 7146 | 7357 | 8020 | 8414 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1915 | 2311 | 2906 | 3576 | 4293 | 4361 | 4368 | 4727 | 7267 | 8774 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1110 | 1611 | 2322 | 2997 | 4054 | 4674 | 5484 | 6168 | 7067 | 7731 | 8648 | 9259 |
| | | 1114 | 1612 | 2324 | 3032 | 4062 | 4685 | 5491 | 6169 | 7137 | 7735 | 8679 | 9266 |
| | | 1120 | 1618 | 2325 | 3046 | 4064 | 4708 | 5506 | 6216 | 7157 | 7740 | 8681 | 9288 |
| | | 1135 | 1621 | 2332 | 3060 | 4124 | 4709 | 5510 | 6225 | 7169 | 7744 | 8708 | 9311 |
| | | 1143 | 1667 | 2335 | 3093 | 4134 | 4712 | 5543 | 6234 | 7171 | 7753 | 8755 | 9338 |
| 0015 | 0416 | 1144 | 1671 | 2352 | 3116 | 4137 | 4725 | 5546 | 6246 | 7177 | 7757 | 8786 | 9363 |
| 0017 | 0424 | 1145 | 1690 | 2374 | 3131 | 4143 | 4740 | 5555 | 6254 | 7190 | 7763 | 8788 | 9389 |
| 0021 | 0432 | 1146 | 1731 | 2382 | 3157 | 4148 | 4805 | 5561 | 6284 | 7207 | 7790 | 8789 | 9415 |
| 0022 | 0456 | 1148 | 1735 | 2397 | 3168 | 4150 | 4807 | 5563 | 6306 | 7242 | 7807 | 8800 | 9436 |
| 0025 | 0468 | 1149 | 1771 | 2412 | 3223 | 4195 | 4841 | 5565 | 6311 | 7243 | 7808 | 8803 | 9438 |
| 0031 | 0498 | 1153 | 1820 | 2426 | 3303 | 4200 | 4842 | 5580 | 6334 | 7248 | 7809 | 8813 | 9440 |
| 0051 | 0520 | 1159 | 1822 | 2435 | 3317 | 4230 | 4879 | 5629 | 6415 | 7260 | 7857 | 8821 | 9498 |
| 0052 | 0550 | 1168 | 1843 | 2450 | 3327 | 4240 | 4882 | 5677 | 6427 | 7279 | 7870 | 8822 | 9501 |
| 0055 | 0557 | 1170 | 1860 | 2452 | 3338 | 4244 | 4906 | 5691 | 6470 | 7285 | 7877 | 8835 | 9504 |
| 0065 | 0580 | 1185 | 1902 | 2453 | 3343 | 4245 | 4968 | 5718 | 6476 | 7296 | 7897 | 8849 | 9523 |
| 0069 | 0630 | 1197 | 1910 | 2461 | 3344 | 4258 | 5005 | 5739 | 6536 | 7298 | 7990 | 8853 | 9578 |
| 0070 | 0656 | 1198 | 1919 | 2462 | 3356 | 4269 | 5044 | 5754 | 6549 | 7317 | 8019 | 8867 | 9580 |
| 0072 | 0668 | 1213 | 1927 | 2491 | 3362 | 4302 | 5095 | 5803 | 6555 | 7318 | 8039 | 8875 | 9599 |
| 0078 | 0703 | 1219 | 1929 | 2520 | 3363 | 4321 | 5115 | 5805 | 6556 | 7327 | 8071 | 8881 | 9663 |
| 0081 | 0707 | 1247 | 1952 | 2521 | 3384 | 4325 | 5117 | 5811 | 6584 | 7340 | 8087 | 8882 | 9692 |
| 0083 | 0720 | 1251 | 1991 | 2527 | 3393 | 4330 | 5145 | 5855 | 6634 | 7380 | 8089 | 8887 | 9698 |
| 0097 | 0731 | 1261 | 2150 | 2539 | 3439 | 4333 | 5221 | 5862 | 6664 | 7407 | 8121 | 8890 | 9728 |
| 0153 | 0750 | 1265 | 2183 | 2578 | 3492 | 4364 | 5255 | 5881 | 6665 | 7432 | 8133 | 8897 | 9731 |
| 0186 | 0756 | 1296 | 2208 | 2598 | 3523 | 4408 | 5259 | 5889 | 6676 | 7437 | 8215 | 8898 | 9749 |
| 0200 | 0798 | 1362 | 2212 | 2607 | 3524 | 4427 | 5265 | 5918 | 6678 | 7440 | 8227 | 8912 | 9767 |
| 0206 | 0823 | 1373 | 2213 | 2620 | 3546 | 4430 | 5305 | 5926 | 6694 | 7471 | 8248 | 8916 | 9769 |
| 0253 | 0866 | 1382 | 2217 | 2621 | 3559 | 4433 | 5345 | 5930 | 6695 | 7474 | 8342 | 8921 | 9791 |
| 0258 | 0903 | 1386 | 2222 | 2626 | 3611 | 4434 | 5354 | 5985 | 6736 | 7510 | 8409 | 8953 | 9793 |
| 0291 | 0908 | 1410 | 2224 | 2701 | 3612 | 4451 | 5357 | 6016 | 6769 | 7556 | 8470 | 8966 | 9797 |
| 0306 | 0938 | 1415 | 2231 | 2703 | 3632 | 4474 | 5359 | 6019 | 6814 | 7558 | 8477 | 9012 | 9836 |
| 0307 | 0960 | 1433 | 2241 | 2721 | 3645 | 4493 | 5363 | 6020 | 6864 | 7565 | 8482 | 9025 | 9849 |
| 0349 | 0990 | 1436 | 2242 | 2722 | 3653 | 4514 | 5368 | 6052 | 6871 | 7574 | 8484 | 9046 | 9852 |
| 0359 | 1021 | 1439 | 2252 | 2764 | 3666 | 4519 | 5369 | 6053 | 6906 | 7582 | 8487 | 9068 | 9863 |
| 0360 | 1023 | 1454 | 2255 | 2781 | 3673 | 4521 | 5391 | 6057 | 6910 | 7644 | 8498 | 9104 | 9879 |
| 0370 | 1054 | 1458 | 2256 | 2792 | 3687 | 4548 | 5398 | 6076 | 6915 | 7688 | 8507 | 9109 | 9900 |
| 0373 | 1061 | 1490 | 2260 | 2802 | 3747 | 4554 | 5400 | 6097 | 6936 | 7710 | 8518 | 9169 | 9935 |
| 0385 | 1089 | 1511 | 2272 | 2827 | 3834 | 4635 | 5401 | 6133 | 6954 | 7711 | 8548 | 9192 | 9944 |
| 0401 | 1099 | 1546 | 2280 | 2832 | 3912 | 4636 | 5441 | 6136 | 6982 | 7717 | 8572 | 9211 | 9945 |
| 0404 | 1102 | 1580 | 2292 | 2852 | 3965 | 4655 | 5444 | 6165 | 7054 | 7720 | 8573 | 9232 | 9971 |
| 0411 | 1104 | 1590 | 2316 | 2905 | 4011 | 4672 | 5459 | 6167 | 7057 | 7723 | 8627 | 9249 | 9990 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी विजयी विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता
सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 22 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 03/06/2026

| | |
|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | MG-04 : 9701 |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 8771 |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 6413 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0462 | 0823 | 0920 | 1744 | 3134 | 3201 | 4174 | 5423 | 7298 | 8915 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0585 | 0869 | 1656 | 3105 | 4155 | 4363 | 4819 | 4894 | 4898 | 9446 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0195 | 0652 | 2560 | 5316 | 6582 | 6937 | 7430 | 7957 | 7970 | 9933 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1289 | 2291 | 3135 | 3983 | 5043 | 5583 | 6608 | 8081 | 8896 |
| | | 1301 | 2329 | 3137 | 4113 | 5045 | 5588 | 6623 | 8115 | 9000 |
| | | 1312 | 2361 | 3223 | 4117 | 5164 | 5596 | 6639 | 8138 | 9255 |
| 0007 | 0407 | 1319 | 2403 | 3257 | 4212 | 5215 | 5626 | 6664 | 8154 | 9400 |
| 0031 | 0504 | 1384 | 2465 | 3262 | 4234 | 5221 | 5650 | 6684 | 8158 | 9481 |
| 0048 | 0616 | 1412 | 2468 | 3321 | 4302 | 5251 | 5680 | 6767 | 8188 | 9529 |
| 0051 | 0703 | 1431 | 2502 | 3339 | 4340 | 5257 | 5715 | 7172 | 8202 | 9546 |
| 0053 | 0720 | 1459 | 2537 | 3365 | 4401 | 5278 | 5745 | 7177 | 8223 | 9567 |
| 0059 | 0800 | 1489 | 2572 | 3371 | 4416 | 5292 | 5750 | 7188 | 8315 | 9572 |
| 0080 | 0801 | 1615 | 2582 | 3384 | 4431 | 5368 | 5785 | 7251 | 8379 | 9641 |
| 0087 | 0807 | 1618 | 2611 | 3408 | 4454 | 5377 | 5845 | 7330 | 8484 | 9682 |
| 0094 | 0835 | 1640 | 2652 | 3426 | 4640 | 5471 | 5855 | 7365 | 8506 | 9726 |
| 0098 | 1014 | 1648 | 2662 | 3612 | 4641 | 5490 | 5857 | 7623 | 8555 | 9801 |
| 0116 | 1048 | 1716 | 2693 | 3652 | 4658 | 5500 | 5987 | 7662 | 8582 | 9837 |
| 0168 | 1081 | 1909 | 2722 | 3703 | 4693 | 5525 | 6015 | 7675 | 8598 | 9859 |
| 0207 | 1099 | 2068 | 2840 | 3731 | 4774 | 5542 | 6096 | 7758 | 8674 | 9887 |
| 0211 | 1141 | 2080 | 2873 | 3735 | 4888 | 5543 | 6120 | 7760 | 8749 | 9906 |
| 0304 | 1143 | 2176 | 2922 | 3808 | 4924 | 5547 | 6124 | 7770 | 8836 | 9922 |
| 0318 | 1150 | 2226 | 2945 | 3819 | 4938 | 5548 | 6297 | 7783 | 8884 | 9934 |
| 0393 | 1185 | 2230 | 2968 | 3917 | 5016 | 5555 | 6306 | 7793 | 8886 | 9938 |
| 0397 | 1213 | 2259 | 3049 | 3921 | 5017 | 5574 | 6590 | 7830 | 8892 | 9962 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र सह्याद्री (विजयालक्ष्मी विकली लॉटरी)

महाराष्ट्र राज्य लॉटरी • सोडत सायं. 4:30 वाजता
सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 22 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 03/06/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — SV-05 : 3761

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0977 | 2128 | 2147 | 5079 | 5940 | 6361 डायमंड कॉर्पोरेशन, बोरिवली | 6850 रुखमणी एन्टरप्रायझेस, औरंगाबाद | 7108 महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर | 8461 | 9411 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0351 | 1813 | 2898 | 3196 | 3985 | 4977 | 5265 | 7228 | 7453 | 9747 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0871 | 1072 | 1341 | 1918 | 4431 | 5052 | 5588 | 7442 | 8070 | 8915 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0870 | 1999 | 3165 | 4028 | 4844 | 5838 | 7075 | 8682 |
| | 0980 | 2003 | 3231 | 4045 | 4861 | 5839 | 7170 | 8690 |
| 0058 | 1111 | 2166 | 3302 | 4075 | 5175 | 5854 | 7360 | 8741 |
| 0082 | 1129 | 2201 | 3331 | 4091 | 5218 | 5915 | 7383 | 8826 |
| 0084 | 1178 | 2220 | 3335 | 4120 | 5280 | 6171 | 7488 | 8831 |
| 0117 | 1341 | 2256 | 3364 | 4357 | 5361 | 6460 | 7692 | 8871 |
| 0278 | 1473 | 2269 | 3392 | 4402 | 5505 | 6606 | 7871 | 8895 |
| 0322 | 1616 | 2320 | 3421 | 4408 | 5549 | 6626 | 8050 | 9199 |
| 0442 | 1619 | 2722 | 3625 | 4414 | 5575 | 6823 | 8222 | 9439 |
| 0474 | 1765 | 2728 | 3631 | 4488 | 5585 | 6867 | 8584 | 9640 |
| 0777 | 1872 | 2932 | 3719 | 4654 | 5592 | 6896 | 8628 | 9671 |
| 0810 | 1945 | 3087 | 3767 | 4713 | 5727 | 6920 | 8634 | 9778 |
| 0833 | 1997 | 3099 | 3938 | 4749 | 5789 | 7024 | 8664 | 9917 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी ता. ०४/६/२०२६

| | | |
|---|---|---|
| ६ | २ | ७ |
| ६० | २४ | ७४ |
| ६५ | २९ | ७९ |
| १६९ | १३८ | ८९० |
| २५९ | ४८० | ४५८ |

## निकाल — महाराष्ट्र गजलक्ष्मी बुध विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी • सोडत सायं. 4:45 वाजता
सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 22 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 03/06/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- — GL-04 : 1724

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0532 | 0973 | 5542 | 6382 | 6804 | 6871 | 6978 | 7994 | 9243 | 9765 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0461 | 1164 | 1341 | 3809 | 4260 | 4277 | 5680 | 5814 | 6513 | 7384 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0443 | 1482 | 1497 | 1705 | 2755 | 2952 | 4369 | 5056 | 6977 | 9132 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0777 | 1301 | 1735 | 2627 | 3059 | 4055 | 5046 | 7108 | 8623 | 8673 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1435 | 2209 | 3259 | 4254 | 4938 | 5590 | 6626 | 7207 | 8198 | 8982 |
| | | 1456 | 2225 | 3275 | 4258 | 5058 | 5616 | 6656 | 7252 | 8411 | 9001 |
| 0017 | 0839 | 1489 | 2293 | 3313 | 4327 | 5111 | 5627 | 6658 | 7287 | 8421 | 9090 |
| 0040 | 0848 | 1513 | 2299 | 3399 | 4328 | 5158 | 5895 | 6661 | 7371 | 8423 | 9217 |
| 0048 | 0870 | 1567 | 2311 | 3410 | 4332 | 5165 | 5923 | 6689 | 7376 | 8454 | 9227 |
| 0084 | 0890 | 1596 | 2348 | 3418 | 4400 | 5233 | 5954 | 6758 | 7387 | 8476 | 9257 |
| 0101 | 0948 | 1709 | 2388 | 3425 | 4420 | 5312 | 5955 | 6762 | 7430 | 8567 | 9438 |
| 0109 | 0963 | 1716 | 2435 | 3453 | 4436 | 5354 | 5977 | 6853 | 7440 | 8571 | 9508 |
| 0194 | 1015 | 1721 | 2464 | 3459 | 4439 | 5454 | 5978 | 6861 | 7453 | 8635 | 9542 |
| 0224 | 1017 | 1729 | 2493 | 3519 | 4449 | 5455 | 5989 | 6868 | 7472 | 8676 | 9599 |
| 0265 | 1046 | 1761 | 2521 | 3566 | 4487 | 5495 | 6033 | 6876 | 7478 | 8684 | 9630 |
| 0361 | 1180 | 1804 | 2672 | 3608 | 4493 | 5500 | 6105 | 6909 | 7567 | 8738 | 9646 |
| 0380 | 1188 | 1834 | 2782 | 3638 | 4520 | 5504 | 6150 | 6932 | 7747 | 8773 | 9669 |
| 0424 | 1214 | 1934 | 2804 | 3793 | 4570 | 5509 | 6160 | 6963 | 7758 | 8785 | 9788 |
| 0430 | 1227 | 1954 | 2808 | 3823 | 4604 | 5513 | 6264 | 7072 | 7789 | 8819 | 9799 |
| 0500 | 1248 | 1964 | 2852 | 3967 | 4646 | 5515 | 6276 | 7076 | 7934 | 8832 | 9889 |
| 0501 | 1257 | 2088 | 2925 | 3972 | 4660 | 5523 | 6301 | 7079 | 7959 | 8834 | 9895 |
| 0568 | 1302 | 2091 | 2950 | 4034 | 4684 | 5524 | 6377 | 7101 | 8035 | 8849 | 9903 |
| 0600 | 1304 | 2109 | 3049 | 4061 | 4709 | 5525 | 6390 | 7127 | 8049 | 8882 | 9905 |
| 0620 | 1315 | 2141 | 3140 | 4065 | 4803 | 5556 | 6402 | 7129 | 8103 | 8884 | 9947 |
| 0629 | 1327 | 2161 | 3205 | 4078 | 4812 | 5559 | 6526 | 7178 | 8181 | 8889 | 9962 |
| 0780 | 1424 | 2206 | 3231 | 4093 | 4894 | 5582 | 6619 | 7195 | 8183 | 8898 | 9982 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# ज्येष्ठ-श्रेष्ठ गायक-संगीतकार स्नेहल भाटकर




**ज्येष्ठ-श्रेष्ठ गायक-संगीतकार स्नेहल भाटकर यांचा जन्म १७ जुलै १९१९ रोजी झाला. स्नेहल भाटकरांचे नाव उच्चारले की जुन्या मंडळींना चटकन कभी तनहाईयों मे युँ, हमारी याद आयेगी हे मुबारक बेगमच्या आवाजातील सदाबहार गीत आठवते. खरे तर हे गीत भाटकरजींना लतादीदींच्या आवाजात ध्वनीमुद्रित करायचे होते; पण ठरलेले असूनही लागोपाठ तीन दिवस लतादीदी तिथे फिरकल्याच नाहीत हे पाहून कोणतीही तक्रार न करता त्यांनी हे गाणे मुबारक बेगमच्या आवाजात ध्वनिमुद्रित केले आणि मग पुढच्या त्या गाण्याने जो इतिहास घडवला तो सर्वश्रुतच आहे. स्नेहलता हे त्यांच्या मुलीचे नाव. त्यातील स्नेहल घेऊन केदार शर्मा ह्यांनी ‘सुहागरात’ ह्या चित्रपटाच्या वेळी त्यांचे स्नेहल भाटकर असे नव्याने बारसे केले.**

**नोकरीत** म्हणजे आकाशवाणीमध्ये ते व्ही. जी भाटकर म्हणून वावरले तर भजनी मंडळात भाटकरबुवा म्हणून वावरले. संगीतकार आणि गायक म्हणून कधी स्नेहल तर कधी वासुदेव भाटकर हे नाव घेऊन वावरले. स्नेहल भाटकर, भाटकर बुवा, व्ही. जी. भाटकर, वासुदेव भाटकर, बी वासुदेव! एकाच माणसाची ही अनेक. त्यांचे पूर्ण नाव वासुदेव गंगाराम भाटकर. आकाशवाणीच्या नोकरीत राहून देखिल संगीत दिग्दर्शनाचा व्यवसाय करता यावा म्हणून शोधलेला, नियमाला बगल देणारा हा मार्ग होतागोड गळ्याची देणगी त्यांना त्यांच्या आईकडूनच मिळाली होती. त्यानंतर श्रीकृष्ण संगीत विद्यालयात त्यांनी संगीताचे शिक्षण घेतले. तसेच आजुबाजूच्या त्या परिसरात नियमितपणे भजनं चालत, त्यातही ते उत्साहाने भाग घेत आणि ह्यातूनही आपण बरेच शिकलो असे ते प्रांजळपणे नमूद करतात. ह्या भजनांचा परिणाम त्यांच्या संपूर्ण आयुष्यावर झालेला दिसतो की, ज्यामुळे त्यांचा स्वभाव अतिशय निगर्वी आणि समाधानी झाला. कलेच्या ह्या क्षेत्रात ते अजातशत्रू राहिले ते ह्याच स्वभावामुळे. म्हणूनच आयुष्यभर त्यांनी ह्या भजनांची साथ कधीच सोडली नाही. भजनी मंडळात ते भाटकरबुवा म्हणूनच प्रसिद्ध होते. १९३९ साली त्यांनी एचएमव्हीत पेटीवादक म्हणून नोकरी पत्करली, पण पुढे आपल्या स्वत:च्या कुवतीवर ते संगीतकार म्हणून नावारुपाला आले. १९४४ च्या सुमारास बाबुराव पेंटर ह्यांच्या ‘रुक्मिणी स्वयंवर’ ह्या चित्रपटाला संगीत देण्यासाठी त्यांची सुधीर

# स्नेहल भाटकर

फडके ह्यांच्याबरोबरीने निवड झाली आणि मग वासुदेव-सुधीर ह्या नावाने त्या चित्रपटाला त्या दोघांनी संगीत दिले. गंमत म्हणजे ह्यांतील भाटकरांनी संगीत दिलेली काही गाणी बाबुजींच्या पत्नी ललिता फडके ह्यांनी गायलेली होती. केदार शर्मा ही व्यक्ती भाटकरबुवांच्या आयुष्यातील एक अती महत्त्वाची व्यक्ती होती. सुरुवातीच्या उमेदवारीच्या काळात केदार शर्मांनी बुवांना जो हात दिला त्याचा विसर कधीही पडू न देता केदार



शर्मांच्या पडत्या काळातही पैसे न घेता बुवांनी त्यांच्या चित्रपटांना संगीत दिले होते. बुवांचे वैशिष्ट्य हे की, त्यांनी राज कपूरने पहिल्यांदाच नायक म्हणून काम केलेल्या ‘नीलकमल’ ह्या चित्रपटातील त्याच्या तोंडच्या गाण्यासाठी आपला आवाज उसना म्हणून दिलेला होता. ह्या चित्रपटाचे संगीतकार देखील ते स्वत:च होते. इथे त्यांनी बी वासुदेव हे नाव धारण केले होते. तसेच मधुबाला, तनुजा, गीताबाली, नूतन इत्यादिंच्या चित्रपट पदार्पणातील पहिल्याच चित्रपटांना त्यांनी संगीत दिले होते. आधी नायिका म्हणून गाजलेल्या आणि नंतर निर्मात्या बनलेल्या कमळाबाई मंगरुळकर, कमला कोटणीस, शोभना समर्थ वगैरे स्त्री निर्मात्यांच्या पहिल्या चित्रपटांनाही बुवांनीच संगीत दिले. नीलकमल, सुहागरात, हमारी बेटी, गुनाह, हमारी याद आयेगी, प्यासे नैन, भोला शंकर, आजकी बात, दिवाली की रात, पहला कदम इत्यादि हिंदी चित्रपटांना त्यांनी दिलेलं संगीत खूपच गाजले. तसेच मराठीत रुक्मिणी स्वयंवर, चिमुकला पाहुणा, नंदकिशोर, मानला तर देव, बहकलेला ब्रह्मचारी इत्यादि चित्रपटांना त्यांनी संगीत दिले. नंदनवन, राधामाई, भूमिकन्या सीता, बुवा तेथे बाया इत्यादी नाटकांना संगीत त्यांनी दिले. स्नेहल भाटकर यांचे २९ मे २००७ रोजी निधन झाले.

# गिरगावकरांना दिलासा मिळेपर्यंत पाठपुरावा करू! मंगलप्रभात लोढा



■ मुंबई

**गिरगाव** परिसरात अलीकडे वारंवार होत असलेल्या विद्युत पुरवठा खंडित होण्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर भाजपा नेते मंगलप्रभात लोढा व नगरसेविका स्नेहल तेंडुलकर यांनी बेस्टच्या अधिकाऱ्यांसह प्रभावित भागांची प्रत्यक्ष पाहणी केली. सुरू असलेल्या कामांचा आढावा घेत त्यांनी तात्काळ दुरुस्तीचे निर्देश दिले. कामात होणारा विलंब, समन्वयाचा अभाव आणि निष्काळजीपणा याबाबत संबंधितांना कठोर शब्दांत जाब विचारत नागरिकांना होणारा त्रास सहन केला जाणार नाही, असे स्पष्ट केले. काम अर्धवट सोडून निघून गेल्यास स्वतः धरणे आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

मरीन लाइन्स पुलाजवळील बेस्ट स्टेशन परिसरात ३३,००० वोल्ट वायरिंगमध्ये बिघाड झाल्याचे निदर्शनास आले असून, ही लाईन रेल्वे रुळाखाली असल्याने दुरुस्ती प्रक्रियेस काही वेळ लागण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली. पर्यायी व्यवस्था म्हणून सध्या विविध ठिकाणांहून ११,००० वोल्ट वीजपुरवठा वळविण्यात आला आहे. लोढा यांच्या सूचनेनुसार नागरिकांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यासाठी गिरगाव गायवाडी येथे बेस्टची विशेष बस तैनात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, ज्यामुळे स्थानिकांना त्यांच्या समस्या नोंदविणे आणि त्यावर त्वरित कार्यवाही होणे सुलभ होईल. दुरुस्तीच्या कामांसाठी करण्यात आलेल्या खोदकामामुळे रस्त्यावर निर्माण झालेल्या खड्ड्यांची तातडीने दुरुस्ती करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत, असे स्नेहल तेंडुलकर यांनी नमूद केले.

# बलात्काराच्या आरोपातून तरुणाची निर्दोष मुक्तता

■ मुंबई

**लग्नाचे** अमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याच्या आरोपातून २१ वर्षीय आरोपी गोविंद पवारला विशेष पोक्सो न्यायालयाने निर्दोष मुक्त केले. पीडितेचे वय कायदेशीररित्या अल्पवयीन सिद्ध न झाल्यामुळे पोक्सो कायद्यांतर्गत असणारे लैंगिक अत्याचाराचे सर्व आरोप न्यायालयाने फेटाळले.

कुलाबा येथील कफ परेड परिसरातील १८ वर्षीय तरुणीने २ फेब्रुवारी २०२३ रोजी कफ परेड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती पीडितेचा जन्म १ जानेवारी २००५ चा असून गोविंद याच्यासोबत तिचे प्रेमसंबंध होते, असा दावा तिने केला होता. लग्नाचे आश्वासन देऊन आरोपीने ऑगस्ट २०२२ पासून तिच्याशी वारंवार शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला होता. दरम्यान, आरोपीचा दुसऱ्या मुलीशी साखरपुडा झाल्याचे समजताच पीडितेने विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला होता, त्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# पुण्यात बंद फ्लॅटमध्ये महिलेचा मृतदेह ! प्रियकरावर संशय

**पुणे** - वाघोली परिसरात बंद फ्लॅटमधून महिलेचा मृतदेह आढळला. फ्लॅटमधून दुर्गंधी येत असल्याची तक्रार रहिवाशांनी केल्यानंतर ही घटना उघडकीस आली. प्राथमिक तपासात महिलेच्या लिव्ह-इन पार्टनरवर हत्येचा संशय असल्याने पोलिसांनी त्याला अटक केली.

मृत महिला पश्चिम बंगालमधील मेदिनीपूर येथील रहिवासी आहे. ती आणि तिचा लिव्ह-इन पार्टनर दोन वर्षांपासून वाघोलीतील फ्लॅटमध्ये एकत्र राहत होते. व्यभिचाराच्या संशयावरून हा खून २८ ते ३१ मे दरम्यान घडला असावा. आरोपी मूळचा परभणी जिल्ह्यातील असून तो प्लंबर म्हणून काम करत होता.

# उरणमध्ये शेवळांचे बहरले पीक जूनच्या उन्हात पावसाळी भाजी

■ उरण

**जून** महिना सुरू झाला, आकाशात ढगांची तुरळक उपस्थिती आहे, पण पावसाचा थेंब अद्याप पडलेला नाही. वातावरणात प्रचंड उकाडा आणि कडक ऊन असतानाही उरण परिसरात पावसाळ्याची चाहूल देणाऱ्या शेवळाच्या भाजीने बाजारपेठ गाठल्याने नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त केले जात आहे. साधारणपणे मुसळधार पावसाच्या काही दिवसांनंतर डोंगर, शेतमळे आणि ओलसर भागांत उगवणारी शेवळाची भाजी यंदा पावसाळा सुरू होण्यापूर्वीच मोठ्या प्रमाणात बाजारात दाखल झाली आहे.

# सिंधुदुर्गातील तीन एसटी डेपो खासगी भागीदारीतून उभारणार

**परिवहनमंत्री प्रताप सरनाईकांची घोषणा**

■ सिंधुदुर्ग

**जिल्ह्यातील** सावंतवाडी, दोडामार्ग आणि मालवण येथील एसटी बस डेपो पीपीपी अर्थात सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्त्वावर पुनर्विकास करून उभारले जाणार आहेत.

त्यासाठी येत्या ऑगस्टमध्ये निविदा प्रक्रिया राबवली जाणार आहे, अशी घोषणा राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली.

परिवहन मंत्री सरनाईक यांनी नुकतीच सावंतवाडी एसटी बस डेपोला भेट दिली. त्यावेळी त्यांनी ही घोषणा केली. ते पुढे म्हणाले की, प्रवाशांसाठीच्या सुविधांमध्ये सुधारणा करत एसटीच्या जागांचा व्यावसायिक वापर करून महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्याचा या योजनेचा उद्देश आहे. डिझेलच्या वाढीव किमतीमुळे एसटी महामंडळाला आतापर्यंत सुमारे ३१० कोटींचा आर्थिक फटका बसला आहे. तरीही तिकीट भाड्यात कोणतीही वाढ केलेली नाही.

# रेवदंडा गावाच्या उपसरपंचपदी महाआघाडीचे संतोष मोरे

**शिंदे शिवसेना गटाचे सुराराम माळी पराभूत**

■ रायगड

**रेवदंडा** ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाची निवडणूक झाली. या निवडणुकीत शेकाप, महाविकास आघाडीचे उमेदवार संतोष सदाशिव मोरे हे बहुमतांनी विजयी झाले. शिंदे गटातील उमेदवार सुराराम माळी यांचा दारूण पराभव झाला.

उपसरपंचपदी संतोष मोरे यांची निवड झाल्याबद्दल शेकापसह महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याकडून आनंदोत्सव साजरा केला. रेवदंडा ग्रामपंचायतीमधील उपसरपंचपद गेली अनेक महिने रिक्त होते. या पदाची निवडणूक मंगळवारी घेण्यात आली. शेकाप महाविकास आघाडीचे उमेदवार संतोष मोरे उर्फ बाबू यांनी या पदासाठी अर्ज दाखल केला. त्यानंतर शिंदे गटातील सुराराम माळी यांनीदेखील अर्ज दाखल केला होता.

# वेळेत उपचार न मिळाल्याने नवजात बालिकेचा मृत्यू!

**उल्हासनगर शहरातील हृदयद्रावक घटना**

■ उल्हासनगर

**उल्हासनगरच्या** मध्यवर्ती रुग्णालयात एका अत्यंत कमी वजनाच्या नवजात बालिकेचा वेळेत उपचार न मिळाल्यामुळे मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. या रुग्णालयात अतिदक्षता विभाग आणि व्हेंटिलेटर सुविधा नसल्यामुळेच हा प्रकार घडल्याची भावना स्थानिक नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

या रुग्णालयात नाजीरा धिरेंद्र राजभर यांच्या नवजात कन्येचा जन्म अत्यंत कमी वजनासह झाला होता. जन्मानंतर तिची प्रकृती चिंताजनक असल्याने तिला तातडीने नवजात शिशु अतिदक्षता विभाग आणि व्हेंटिलेटर सपोर्टची आवश्यकता होती. परंतु उल्हासनगर-३ येथील या मध्यवर्ती रुग्णालयात ही सुविधा उपलब्ध नसल्याने बालिकेवर आवश्यक उपचार करता आले नाहीत. त्यामुळे मुलीचा जीव वाचवण्यासाठी तिच्या वडिलांनी कळवा, सायन, वाडिया तसेच मुंबई परिसरातील विविध शासकीय रुग्णालयांमध्ये व्हेंटिलेटर बेड मिळविण्यासाठी धावपळ केली. मात्र आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध न झाल्याने अखेर त्या चिमुकलीचा मृत्यू झाला. त्यामुळे आता या रुग्णालयात नवजात शिशु अतिदक्षता विभाग तातडीने सुरू करण्याची मागणी केली जात आहे. मुरबाड, शहापूर, कसारा, कर्जत, उल्हासनगर परिसरातील हजारो गर्भवती महिला आणि नवजात बदलापूर आणि बालकांसाठी हे रुग्णालय महत्त्वाचे आधारकेंद्र आहे. पण याठिकाणी अत्यावश्यक सुविधा उपलब्ध नाहीत.

# दौंडमध्ये गर्भलिंग निदानाचे रॅकेट दोन वर्षांत ५०० गर्भपातांचा संशय

■ पुणे

**पुणे** जिल्ह्यातील दौंड तालुक्यात बेकायदेशीर गर्भलिंग निदान आणि भ्रूणहत्येशी संबंधित संशयित रॅकेट उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणात गेल्या दोन वर्षांत सुमारे ५०० गर्भपात झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

दौंड तालुक्यातील केडगाव परिसरात एका छोट्या घरामध्ये पोर्टेबल सोनोग्राफी मशीनच्या साहाय्याने बेकायदेशीर गर्भलिंग तपासणी केली जात असल्याची माहिती समोर आली आहे. यासंदर्भातील काही व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. या प्रकरणात बोगस डॉक्टर अण्णासाहेब गिरी आणि डॉक्टर जाधव यांना अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. तपासादरम्यान या रॅकेटचे स्वरूप आणि त्याची व्याप्ती उघड होत आहे.

# बुलेट ट्रेन प्रकल्प काम गतीमान पालघरच्या बोगद्याचे ‘ब्रेकथ्रू’ पूर्ण

**महाराष्ट्रातील तीन पर्वतीय बोगदे तयार**

■ मुंबई

**मुंबई**-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पांतर्गत महाराष्ट्रातील कामाला चांगलाच वेग आला आहे. या प्रकल्पाचा एक महत्त्वाचा टप्पा यशस्वीपणे पूर्ण झाला आहे.पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यात अंबेसरी गावाजवळील तिसऱ्या पर्वतीय बोगद्याचे नुकतेच ‘ब्रेकथ्रू’ पूर्ण करण्यात आले.‘ब्रेक-थ्रू’ म्हणजे खोदकाम पूर्ण होऊन बोगद्याची भिंत भेदून आरपार मार्ग तयार झाला आहे.

पालघरमधील माउंटन टनेल (एमटी) ७ म्हणून ओळखला जाणारा हा बोगदा ४१७ मीटर लांबीचा आणि १४.४ मीटर रुंदीचा असून, अप आणि डाऊन अशा दोन्ही बुलेट ट्रेन ट्रॅकसाठी असणार आहे. बोगद्याचे



उत्खनन दोन्ही टोकांवरून नियंत्रित डिलिंग आणि ब्लास्टिंग पद्धतीने करण्यात आले. उत्खननादरम्यान सुरक्षितता आणि संरचनेची स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. कंपन,भू-संरचना आणि परिसरातील परिणामांवर सतत लक्ष ठेवण्यासाठी ‘सरफेस सेटलमेंट पॉइंटस’, थ्रीडी टार्गेट्स, स्ट्रेन गेजेस आणि ‘सिस्मोग्राफ्स’ यांसारख्या प्रणाली बसवल्या आहेत. कामगारांच्या सरक्षिततेसाठी बोगद्यात प्रभावी वायुवीजन व्यवस्था, अग्निसुरक्षा उपाय, नियंत्रित प्रवेश व्यवस्था आणि सातत्यपूर्ण भू-तांत्रिक निरीक्षण यावर विशेष भर देण्यात आला होता.

# गोव्यातील कांदोळी समुद्रात सोलापूरच्या कंत्राटदाराचा मृत्यू

■ म्हापसा

**सहलीसाठी** कुटुंबासह गेलेले सोलापूरचे कंत्राटदार आणि व्यावसायिक सतीश उद्धव भोसले (५४) यांचा गोव्यातील कांदोळी समुद्र किनाऱ्यावर बुडून मृत्यू झाला.

सतीश हे आपल्या कुटुंबासह गोव्यात सहलीसाठी गेले होते. सोमवारी ते कुटुंबियांसह कांदोळी समुद्र किनाऱ्यावर फिरण्याचा आनंद घेत होते. यावेळी ते आपल्या १६ वर्षांच्या मुलीसह समुद्रस्नानासाठी पाण्यात उतरले. परंतु पाण्याच्या वेगवान लाटेने दोघांनाही समुद्राच्या आत ओढले. या लाटेतून मुलगी कशीबशी पाण्याबाहेर आली वडील मागे कुठेच दिसत नव्हते.त्यामुळे तिने आरडाओरडा केल्याने जीवरक्षक पोहचले.त्यांनी शोधमोहीम राबवून सतीश भोसले यांना बेशुद्धावस्थेत बाहेर काढले.त्यानंतर डॉक्टरांनी ते मृत झाले असल्याचे घोषित केले.

# उमेदवारी अर्ज बाद झाल्यानंतर संताप! बाजोरियांवर गुन्हा दाखल

■ अमरावती

**शिंदे** गटाचे नेते गोपीकिशन बाजोरिया आणि त्यांचे पुत्र विप्लव बाजोरिया यांच्या विरोधात अमरावतीच्या गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विधान परिषद निवडणुकीसाठी दाखल करण्यात आलेल्या उमेदवारी अर्जांच्या छाननी प्रक्रियेत शासकीय कामात अडथळा आणल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला.

जिल्हाधिकारी कार्यालयात उमेदवारी अर्जांची छाननी सुरू असताना विप्लव बाजोरिया यांचा अर्ज बाद करण्यात आला. त्यानंतर संतप्त बाजोरिया पिता-पुत्राने जिल्हाधिकारी कार्यालयात गोंधळ घालत प्रशासनावर आरोप केले. विप्लव बाजोरिया हे महायुतीचे बंडखोर उमेदवार म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. त्यांच्या शपथपत्रावर छाननी प्रक्रियेत आक्षेप नोंदविण्यात आल्याने निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांचा उमेदवारी अर्ज रद्द केला. आदेशाची प्रत मिळाल्यानंतर मी उच्च न्यायालयात जाऊन माझा उमेदवारी अर्ज वैध ठरवून आणणार, अशी प्रतिक्रिया विप्लव बाजोरिया यांनी दिली.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिकृती स्मारकाचा भाग कोसळला! कारवाईची मागणी

■ ठाणे

**ठाण्यात** नव्याने उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिकृती स्मारकाचा एक भाग उद्घाटनानंतर अवघ्या दोन महिन्यांत कोसळल्याने नागरिकांनी संबंधित ठेकेदाराविरोधात कठोर कारवाईची मागणी केली आहे. घोडबंदर रोडवरील आनंदनगर जंक्शन येथे उभारण्यात आलेल्या या स्मारकात रायगड किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंहासनाची ८.५ फूट उंच प्रतिकृती आहे. मंत्री प्रताप सरनाईक यांच्या विकास निधीतून २ कोटी खर्च करून स्मारक उभारण्यात आले होते.

६ मार्च रोजी शिवजयंतीनिमित्त मान्यवरांच्या उपस्थितीत या स्मारकाचे लोकार्पण करण्यात आले होते. मात्र, मंगळवारी रात्री या स्मारकाच्या ३० मीटर उंच व्यासपीठाच्या दगडी संरक्षक भिंतीचा मोठा भाग अचानक कोसळला. किल्ल्याच्या तटबंदीच्या रचनेत मोठ्या पोकळ्या निर्माण झाल्या. काही दगड निखळून पडण्याच्या स्थितीत आहेत.

# अकरावी प्रवेशात मोठा बदल प्रमाणपत्रांसाठी ३ महिन्यांची अतिरिक्त वेळ

■ मुंबई

**राज्यातील** अकरावीच्या केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. शिक्षण संचालनालयाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करण्यासाठी तीन महिन्यांची अतिरिक्त मुदत देण्याचा निर्णय घेतला आहे.

अनेक विद्यार्थ्यांकडे आवश्यक प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्यामुळे त्यांना प्रवेश प्रक्रियेत अडचणींचा सामना करावा लागत होता. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी आणि त्यांच्या हिताचा विचार करून शिक्षण संचालनालयाने हा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. अकरावी प्रवेश प्रक्रियेअंतर्गत पहिली गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर निवड झालेल्या विद्यार्थ्यांना ३ जूनपर्यंत संबंधित महाविद्यालयात जाऊन प्रवेश निश्चित करायचा होता.

विविध आरक्षण प्रवर्गातील तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी नॉन-क्रिमीलेयर आणि ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. अनेक विद्यार्थ्यांकडे ही प्रमाणपत्रे अद्याप उपलब्ध नसल्याने प्रवेश प्रक्रियेत अडथळे निर्माण होत होते. त्यामुळे विद्यार्थी, पालक आणि विविध संघटनांकडून मुदतवाढ देण्याची मागणी सातत्याने करण्यात येत होती.


# साताऱ्याच्या तारळी धरणग्रस्तांचे बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू

**आम्हाला न्याय द्या, अन्यथा गोळ्या घाला**

■ सातारा

**आम्हाला** न्याय द्या,अन्यथा गोळ्या घालून मारून टाका, अशी आर्त हाक देत तारळी धरणग्रस्तांनी सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन करुन दिली. श्रमिक मुक्ती दलाच्या सातारा जिल्हा शाखेच्या वतीने राज्यसंघटक डॉ. प्रशांत पन्हाळकर यांच्या नेतृत्त्वाखाली हे आंदोलन करण्यात येत आहे.

तारळी प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या संकलन यादीतील पात्र खातेदारांचा प्रश्न तब्बल २९ वर्षांपासून प्रलंबित असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. शेती हेच उदरनिर्वाहाचे साधन असताना धरणासाठी जमिनी पाण्याखाली गेल्या मात्र, पुनर्वसन व पर्यायी व्यवस्थेबाबत शासनाने दुर्लक्ष केल्याने अनेक कुटुंबांवर मजुरी करून उदरनिर्वाह करण्याची वेळ आल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्यातील सावरघर,भांबे,करंजोशी, डांगीस्टवाडी, निवडे आणि बोपोशी या गावांतील खातेदारांच्या संकलन यादी दुरुस्ती करून त्यांना न्याय द्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. मागण्या मान्य होईपर्यंत बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा त्यांनी दिला.




संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# हा तर सर्वाधिक दुर्घटनांचा देश

जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश म्हणून भारताने कितीही स्वतःचे कौतुक करून घेतले तरी ही सर्वाधिक लोकसंख्या देशासाठी काडीमोल किमतीची आहे असे म्हणण्याची वेळ येते. या लोकसंख्येबरोबर जगातील सर्वात मोठा लोकशाहीवादी देश म्हणूनही आपण आपली पाठ थोपटून घेत असतो. परंतु या लोकशाहीमधून लोकांचे जीव सुरक्षित ठेवणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे असेदेखील म्हणण्याची वेळ आली आहे. दहशतवाद, नक्षलवाद, स्थानिक पातळीवरच्या गुंडटोळ्या, दहशतवाद्यांना मदत करणारे देशद्रोही यांच्यामार्फत अंतर्गत सुरक्षिततेला सतत धोका असतोच. परंतु साधारण गेल्या दोन-तीन वर्षामध्ये संपूर्ण देशात दुर्घटनांचे प्रमाण प्रचंड वाढले असल्याचे लक्षात येते त्याची कारणे काहीही असली तरी सरासरी रोज किमान पन्नास लोकांचा वेगवेगळ्या दुर्घटनांमध्ये बळी जात असल्याचे समोर येते आहे. ज्यामध्ये रस्ते अपघातांचे प्रमाण पहिल्या क्रमांकावर आहे तर ठिकठिकाणी आगी लागण्याच्या घटना आणि त्यात बळी पडणाऱ्यांची संख्याही सातत्याने वाढते आहे. दिल्लीत एका रेस्टॉरन्टला लागलेल्या आगीत २१ जणांचा होरपळून झालेला मृत्यू आणि जवळपास ४९ जण जखमी झाले. दिल्लीच्या मालवीय नगर परिसरात म्हणजेच बऱ्याच दाटीवाटीच्या परिसरात ही दुर्घटना घडली. सकाळी पावणेदहाच्या सुमारास आग लागली. ही आग इतक्या वेगाने पसरली की रेस्टॉरन्टमधल्या लोकांना बाहेर पडायला वेळ लागला नाही. मुळातच हा सगळा परिसर अतिशय दाटीवाटीचा असल्याने आग असो किंवा इमारत कोसळण्याचा प्रकार असो, अशा दुर्घटनांमध्ये लोकांचे जीव वाचवणे अत्यंत कठीण होत असते आणि अशा परिसरातल्या रेस्टॉरन्ट हॉटेल्स, लॉज, विद्यार्थ्यांचे क्लासेस असे एक ना अनेक व्यवसाय त्याठिकाणी सुरू असतात. परंतु कोणत्याही प्रकारच्या दुर्घटनांची शक्यता लक्षात घेऊन कोणत्याच ठोस उपाययोजनांची तरतूद केली जात नाही आणि त्याच्याच परिणामातून लोकांना आपले जीव वाचवणे कठीण होऊन जाते. एकीकडे ही घटना घडत असताना दुसरीकडे महाराष्ट्राच्या दोन एसटी बसेसची समोरासमोर धडक झाली. त्यावेळी एका बसने पेट घेतला. त्यामध्येदेखील सात जणांचा जागीच मृत्यू झाला.

### आगींचे वाढते प्रकार

दुर्घटनांचे आणि विशेषतः आगीच्या घटनांचे हे प्रकार बघितले तर गेल्या काही वर्षात वाढत चाललेल्या या दुर्घटनांची शृंखला प्रशासकीय पातळीवरची बेपर्वाई, शासन यंत्रणांचा निष्काळजीपणा आणि एकूणच सरकारची संवेदनहिनता त्याला कारणीभूत ठरते. सातत्याने दुर्घटना घडतात आणि स्वाभाविकपणे त्याविषयी जनमानसाच्या प्रतिक्रिया, असंतोष व्यक्त करण्याचे काम अशा प्रकारच्या लिखाणांमधून करावे लागते. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, गेल्या सहा महिन्यांमध्ये आम्हाला अशा दुर्घटनांवर सातत्याने मत मांडण्याची पाळी आली. हाच प्रकार जर असाच चालू राहिला. तर सर्वाधिक लोकसंख्येच्या या देशाला जगातला सर्वाधिक दुर्घटनांचा देश म्हणण्याची वेळ येऊ शकते. सध्या तरी परिस्थिती तशीच आहे असे म्हणावे लागेल. गुजरातमध्ये राज्य परिवहन मंडळाच्या दोन बसेसची टक्कर हा आणखीनच धक्कादायक प्रकार ठरतो. एक बस धुळे आगाराची होती, तर दुसरी बस जामनेर आगाराची होती. समोर एक टँकर उलटलेला होता आणि त्या परिस्थितीत बस चालकाचा ताबा सुटला आणि दुभाजक तोडून विरुद्ध मार्गावरच्या जामनेर बसला या धुळे बसने धडक दिली. ज्यामध्ये जामनेर आगाराच्या चालकासह सात जणांचा जागीच मृत्यू झाला. म्हणजे इथेदेखील टँकर उलटण्याचा प्रकार आणि बसेसचा भरधाव वेग त्यातून या दुर्घटना घडल्या. अगदी गेल्या सहा महिन्यांत राज्यातसुद्धा एसटी महामंडळाच्या जवळपास बारा बसेसना अपघात झाला. याचा अर्थ एसटी महामंडळाला अधिक सुरक्षितता आणि सावधानता बाळगण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. रस्ते अपघातात महाराष्ट्रातसुद्धा दरवर्षी जवळपास वीस ते पंचवीस हजार लोकांचे जीव जातात. तर देशभरात ही संख्या वर्षाकाठी दीड लाखावर पोहचत असते. मोठे रस्ते करूनही अपघात होतातच आणि वर्षानुवर्षे ज्या रस्त्यांची दुरुस्ती करायला हवी ती न केल्याने तिथेही अपघात होतच राहातात. आगीचा प्रकार असो किंवा रस्ते अपघात असो या सर्वांना दुर्घटना या श्रेणीमध्ये ढकलून सरकारी यंत्रणा आपली जबाबदारी झटकत असतात.

### दिल्ली राजधानीतली दाटीवाटी

दिल्ली ही देशाची राजधानी आहे. इथल्या जुन्या दिल्लीतला सगळा परिसर हा अत्यंत दाटीवाटीचा आणि अनेक प्रकारच्या दुर्घटनांना आमंत्रण देणारा असाच होऊ लागला आहे. अनधिकृतपणे विजेच्या जोडण्या घेणे किंबहुना वीज चोरी मोठ्या प्रमाणावर करणे. रस्ते किंवा गल्ल्यांमधल्या वीजवाहक तारांच्याबाबतीतदेखील प्रचंड बेपर्वाई दिल्लीमध्ये पाहायला मिळते. विशेषतः आगीसारख्या प्रकारांना आमंत्रणच मिळते. कारण यासाठी आवश्यक असलेली सुरक्षितता किंवा सावधानता संबंधित व्यवसायाच्या मालकांकडून घेतली जात नाही. शॉर्टसर्कीटची कारणे सांगून आगीचे वर्णन केले जाते. परंतु दिल्लीतले तापमान, वाढती लोकसंख्या आणि अपुरा वीजपुरवठा याचे जे काही अनेक दुष्परिणाम आहेत त्यात आगीसारख्या भयंकर प्रकारांना सहज वाव मिळतो. अनेकवेळेला तर रुग्णालयांमध्येसुद्धा जेव्हा आगीच्या घटना घडतात त्यावेळेला त्या त्या ठिकाणच्या व्यवस्थापनाने किती अमानवीपणा दाखवला आहे हेच त्यातून सिद्ध होते. कारण रुग्णालयांमधल्या सर्व व्यवस्थांची देखभाल अतिशय काटेकोरपणे करणे गरजेचे असते. त्याकडेदेखील दुर्लक्ष केले जाते आणि हतबल असहाय्य स्थितीत असलेल्या रुग्णांनादेखील या आगीचे बळी व्हावे लागते. सरकार केंद्रातले असो किंवा राज्यातले असो कोणीच आग आणि रस्ते दुर्घटनांच्याबाबतीत कोणतीच ठोस उपाययोजना केलेली नाही. जर अपघात आणि आग रोखणाऱ्या यंत्रणा कार्यक्षम केल्या, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला तर अनेक संभाव्य दुर्घटना सहजपणे टळू शकतील.

## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

जीवनात अनंत अडचणी असतातच.
पण ओठावर हास्य ठेवावे,
कारण कोणत्याही परिस्थितीत जगायचं तर असतंच,
मग हसत हसत जगण्यात काय नुकसान आहे.

## पंचांग



गुरुवार, ४ जून २०२६
शक १९४८ पराभवनामसंवत्सर
* अधिक ज्येष्ठ कृष्ण चतुर्थी
नक्षत्र : उत्तराषाढा

रवी उदय- ०६-०२
रवी अस्त- १९-१२

-: जन्मराशी :-
००-०१ ते ०७-४१ धनु
०७-४२ ते २४-०० मकर

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### खानदेशी फुनके



★ **साहित्य :** २ वाट्या चणा डाळ, एक वाटी मूग डाळ, एक कांदा, बारीक चिरलेली कोथिंबीर, २ इंच आलं, ४-५ हिरव्या मिरच्या, ३-४ लसूण पाकळ्या, अर्धा चमचा हळद, एक चमचा धणे पावडर, बडिशेप एक चमचा, जिरे एक चमचा, ओवा एक चमचा, हिंग, मीठ.

★ **कृती :** दोन्ही डाळी ५-६ तास पाण्यात भिजवून घ्या. त्या एकत्र जाडसर वाटून घ्या. मिरची, आलं आणि लसूण यांची पेस्ट किंवा ठेचा करून घ्या. आता वाटलेल्या डाळीत अर्धा चमचा हळद, एक चमचा धणे पावडर, बडिशेप एक चमचा, जिरे एक चमचा, ओवा एक चमचा, थोडा हिंग, बारीक चिरलेला कांदा, मिरचीचा ठेचा, चवीनुसार मीठ, कोथिंबीर सगळं नीट मिक्स करून घ्या. गॅस पेटवुन त्यावर कढई ठेवा. त्याच्या आत स्टीलची रिंग ठेवा आणि पाणी ओता. रिंगवर चाळणी ठेवा आणि डाळीचे मिश्रण मुठीत घेऊन वळा आणि तसेच चाळणीत ठेवा. आता कढईवर झाकण ठेवून १५-२० मिनिटे वाफवून घ्या. वाफवण्याची ही प्रक्रिया तुम्ही स्टिमर, इडली पात्र किंवा कुकरमध्येही करू शकता. याला काही ठिकाणी मुटकेही बनवतात. फुणके कढीबरोबर खातात. खूप स्वादिष्ट लागतात.

# इंग्लंडने विजयासह टी-२० मालिका जिंकली

## कॅप्सीच्या खेळीमुळे भारतीय महिला संघ गारद

**टाँटन येथे झालेल्या टी-२० मालिकेतील तिसऱ्या आणि अंतिम सामन्यात इंग्लंडने शानदार पुनरागमन करुन भारतीय महिला क्रिकेट संघाला ६ गडी राखून पराभूत केले. या विजयासह यजमान इंग्लंडने ही मालिका २-१ ने जिंकली. या सामन्यात भारताने निर्धारित षटकांत ५ बाद १८० धावा केल्या होत्या. या प्रत्युत्तरात ॲलिस कॅप्सीच्या ८२ धावांच्या बळावर इंग्लंडने १८.३ षटकांत ४ बाद १८४ धावा केल्या. कॅप्सीला सामनावीर आणि मालिकावीर म्हणून घोषित करण्यात आले.**



■ टाँटन

**प्रथम** फलंदाजी करणाऱ्या भारतीय संघाची सुरुवातही खराब झाली होती. भारतीय सलामीवीर शेफाली वर्मा ११ धावांवर बाद झाली, तर स्मृती मंधाना चार्ली डीनच्या गोलंदाजीवर पायचीत झाली. त्यानंतर यास्तिका भाटियाने वेगवान खेळी करून भारताची सूत्रे हाती घेतली. तिने पॉवरप्लेमध्ये सात चौकार मारून धावगती कायम ठेवली, पण ३२ धावांवर धावबाद झाली. मधल्या फळीत जेमिमा रॉड्रिग्ज आणि कर्णधार हरमनप्रीत कौर यांनी डाव सावरला.

लॉरेन बेलच्या स्लोअर बॉलवर त्रिफळाचित झाल्यामुळे जेमिमाला आपल्या चांगल्या सुरुवातीचे मोठ्या धावसंख्येत रुपांतर करता आले नाही. हरमनप्रीतने एक बाजू सांभाळत नाबाद ५६ धावा केल्या. मात्र, भारतीय संघ शेवटच्या पाच षटकांत केवळ ४८ धावाच जोडू शकला. त्यामुळे भारताने ५ गडी गमावून १८० धावा केल्या.

या धावसंख्येचा पाठलाग करताना इंग्लंडची सुरुवात अत्यंत खराब झाली, पहिल्या तीन षटकांतच डॅनी वायट-हॉज आणि सोफिया डंकली बाद झाल्या. त्यानंतर पॉवरप्लेच्या शेवटच्या षटकात एमी जोन्स बाद झाली, त्यामुळे इंग्लंडची धावसंख्या ३ बाद ५३ अशी झाली झाली. मात्र, एलिस कॅप्सी आणि कर्णधार हेदर नाईट यांनी जोरदार फटकेबाजी करुन भारतीय गोलंदाजांना चांगलेच जेरीस आणले. कॅप्सीने २६ चेंडूमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. ज्यामुळे इंग्लंडने सामन्यावर पूर्णपणे नियंत्रण मिळवले.

## परेलमध्ये ७ जूनला शालेय कॅरम स्पर्धा

■ मुंबई

**आयडियल** स्पोर्ट्स अकॅडमी व आयडियल ग्रुपतर्फे माजी कॅरम संघटनेचे अध्यक्ष डॉ. जगन्नाथराव हेगडे वाढदिवस चषक १६ वर्षांखालील शालेय मुलामुलींसाठी विनाशुल्क कॅरम स्पर्धा यंदाही ७ जून रोजी होणार आहे. परेल येथील आरएमएमएस सभागृहात होणाऱ्या स्पर्धेतील पहिल्या १६ विजेत्या-उपविजेत्यांना आकर्षक पुरस्कार दिले जाणार आहेत. शालेय नवोदित खेळाडूंना डीएसओ कॅरम स्पर्धेच्या तयारीसाठी यंदाही मोफत उपक्रम आयोजित करण्यात आला.

## इंडोनेशिया ओपनमधून भारतीय जोडीची माघार

■ जकार्ता



**भारताची** स्टार पुरुष दुहेरी जोडी सात्विक-साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांना इंडोनेशिया बॅडमिंटन ओपनमधील पहिल्या फेरीच्या सामन्यातून माघार घ्यावी लागली. सात्विकच्या उजव्या खांद्यात अस्वस्थता जाणवू लागल्यामुळे या जोडीने सामना अर्धवट सोडला. सिंगापूर ओपनचे विजेतेपद पटकावल्यानंतर अवघ्या २ दिवसांनी ही घटना घडली. आता दोन्ही खेळाडू आगामी जागतिक चॅम्पियनशिप आणि आशियाई खेळांवर लक्ष ठेवून दुखापतीतून सावरण्यावर आणि पुनर्वसनावर लक्ष केंद्रित करतील.

मलेशियाच्या कांग खाई शिंग आणि रॉन ताई यांच्याविरुद्ध खेळताना ६-११ ने मागे असताना सात्विकने त्याच्या उजव्या खांद्यात दुखत असल्याची तक्रार केली आणि सामना थांबवण्यात आला. या हंगामात भारतीय जोडीला दुखापतीमुळे सामना सोडून देण्याची ही पहिलीच वेळ आहे. भारतीय बॅडमिंटन संघटनेने (बीएआय) म्हटले आहे की, सात्विक-साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी दुखापतीमुळे पॉलीट्रॉन इंडोनेशिया ओपन २०२६ मधून माघार घेतली आहे. ही जोडी आता आगामी महत्त्वाच्या स्पर्धांच्या तयारीसाठी दुखापतीतून सावरण्यावर आणि पुनर्वसनावर लक्ष केंद्रित करेल.

## खो-खो स्पर्धा! पिछाडीनंतर लातूरची जालन्यावर मात
## नंदुरबार-धुळेच्या मुलींचीही उपांत्यपूर्व फेरीत धडक

■ सोलापूर



**स्वर्गीय** अजितदादा पवार क्रीडा नगरी, नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर सुरू असलेल्या ५२ व्या कुमार-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत बुधवारी रंगलेल्या साखळी फेरीतील सामन्यांनी स्पर्धेची उत्कंठा अधिकच वाढवली. मुलींच्या गटात नंदुरबार आणि धुळे यांनी चुरशीच्या लढतीत निसटते विजय मिळवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला, तर कुमार गटात मध्यंतराला पिछाडीवर असलेल्या लातूरने जालनावर शानदार पुनरागमन करत विजय मिळवला. महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने सोलापूर म्युचर खो-खो असोसिएशन व किरण स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

मुलींच्या गटातील अत्यंत रंगतदार सामन्यात नंदुरबारने जळगाववर ३६-३१ अशी मात करत उपांत्यपूर्व फेरीतील स्थान निश्चित केले. मध्यंतराला १९-१७ अशी मिळालेली आघाडी अखेर निर्णायक ठरली. नंदुरबारच्या कृतिमा नाईक (२ मि. संरक्षण व ६ गुण) हिने अष्टपैलू खेळ करत विजयाचा पाया रचला. तिला सोनल वसावे (६ गुण) आणि प्रतीक्षा गावित (६ गुण) यांनी आक्रमणात मोलाची साथ दिली. जळगावकडून गौरी जाधव (८ गुण) हिने झुंजार खेळी केली, मात्र तिचे प्रयत्न संघाला विजय मिळवून देण्यासाठी अपुरे पडले.

## भारतीय संघ न्यूझीलंडचा सर्वात मोठा दौरा करणार

■ आकलंड

**भारतीय** क्रिकेट संघ यावर्षी ऑक्टोबर ते डिसेंबर दरम्यान न्यूझीलंडचा दौरा करेल. न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाने घरच्या उन्हाळी हंगामासाठी या मल्टी-फॉर्मेट मालिकेचे वेळापत्रक जाहीर केले. या दौऱ्यात भारत आणि न्यूझीलंड यांच्यात ५ टी-२०, ५ एकदिवसीय आणि २ कसोटी सामने खेळले जातील.

या दौऱ्याची सुरुवात २२ ऑक्टोबर रोजी व्हाईट-बॉल मालिकेपासून होईल. त्यानंतर वेलिंग्टन आणि क्राइस्टचर्च येथे दोन कसोटी सामने खेळले जातील. विश्वचषक तयारीसाठी या दौऱ्यातील ५ सामन्यांची एकदिवसीय मालिका न्यूझीलंडच्या चाहत्यांसाठी खास असणार आहे. चाहत्यांना रोहित शर्मा आणि विराट कोहलीला एकदिवसीय सामन्यात थेट खेळताना पाहण्याची संधी मिळणार आहे. दोन्ही खेळाडूंनी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली, परंतु एकदिवसीय फॉरमॅटमध्ये खेळत आहेत.

पुढील वर्षी होणाऱ्या एकदिवसीय वर्ल्ड कपच्या दृष्टीने ही मालिका दोन्ही संघांसाठी तयारी मजबूत करण्याची महत्त्वाची संधी असणार आहे.

## ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदची दुसऱ्यांदा कार्लसेनवर मात

■ ओस्को

**नॉर्वे** बुद्धिबळ स्पर्धेत भारतीय ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने दिग्गज मॅग्नस कार्लसेनला दुसऱ्यांदा क्लासिकल सामन्यात पराभूत करून विजेतेपदाची शर्यत अधिकच रोमांचक बनवली. या विजयामुळे प्रज्ञानंद १२ गुणांसह तिसऱ्या स्थानावर पोहोचला. अमेरिकन ग्रँडमास्टर वेस्ली सो १४ गुणांसह स्पर्धेत अव्वल स्थानी कायम आहे. आर्मागेडॉन टाय-ब्रेकमध्ये जर्मनीच्या व्हिन्सेंट केमरला पराभूत करून त्याने आपली आघाडी अधिक मजबूत केली.

दरम्यान, फ्रान्सच्या अलीरेझा फिरौजाने क्लासिकल सामन्यात विद्यमान विश्वविजेता डी. गुकेशला पराभूत करून १३ गुणांसह दुसरे स्थान पटकावले आहे. विजयानंतर प्रज्ञानंदने सांगितले की, त्याच्याविरुद्ध खेळताना मला नेहमीच अधिक उत्साह वाटतो. त्यामुळे माझ्यातील सर्वोत्तम खेळ बाहेर येतो. मला वाटत नाही की त्याच्या उपस्थितीचा माझ्या खेळावर चांगला परिणाम होतो. आम्ही अनेक अटीतटीचे सामने खेळलो आहोत आणि मला त्याच्याविरुद्ध खेळायला खूप मजा येते.

## रहाणेच्या पँथर्सची सुपर ओव्हरच्या थरारक सामन्यात ब्लास्टर्सवर मात

■ मुंबई

**मुंबईतील** वानखेडे स्टेडियमवर झालेला टी-२० मुंबई लीगचा सामना अजिंक्य रहाणेचा नॉर्थ मुंबई पँथर्स आणि बांद्रा ब्लास्टर्स संघांत बरोबरीत सुटला. त्यामुळे स्पर्धेतील दुसरी सुपर ओव्हर पाहायला मिळाली. सुपर ओव्हरमध्ये वैभव माळीने २ षटकार आणि १ चौकार मारून पँथर्सला एक बाद २० अशी धावसंख्या उभारण्यास मदत केली. प्रत्युत्तरात ब्लास्टर्सला केवळ बिनबाद ७ धावाच करता आल्या आणि पँथर्सने विजय मिळवला. कर्णधार सुवेद पारकरची ५४ चेंडूमधील शानदार ११० धावांची खेळी व्यर्थ गेली.

फलंदाजीसाठी अनुकूल खेळपट्टीवर प्रथम फलंदाजी करताना पारकरने स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात वेगवान शतक झळकावत ब्लास्टर्सला ५ बाद २२८ या भक्कम धावसंख्येपर्यंत पोहोचवले. प्रत्युत्तरात हार्दिक तामोरने ३९ चेंडूमध्ये ८३ धावा करत आपला स्फोटक खेळ कायम ठेवला, त्यानंतर तनुष कोटियनच्या अखेरच्या षटकांतील फटकेबाजीमुळे पँथर्सला त्याच धावसंख्येवर समाधान मानावे लागले, ज्यामुळे सामना निर्णायक षटकात गेला. तत्पूर्वी, ब्लास्टर्सने शानदार सुरुवात केली. पारकर आणि प्रतीककुमार रविशंकर यांनी सलामीच्या विकेटसाठी अवघ्या ८ षटकांत १०१ धावा ठोकल्या. रविशंकरने १५ चेंडूमध्ये वेगवान ३३ धावांचे योगदान दिले, तर पारकरने ऑफ-स्पिनर तनुष कोटियनच्या गोलंदाजीवर सलग ३ षटकार ठोकून अवघ्या ४६ चेंडूमध्ये शानदार शतक पूर्ण केले. ब्लास्टर्सच्या कर्णधाराने पराग खानापूरकरसोबत (१५ चेंडूत २२ धावा) ६७ धावांची भागीदारीही केली, पण अखेरीस तो १० चौकार व ७ षटकारांसह ५४ चेंडूत ११० धावा करून बाद झाला. पारकर बाद झाल्यानंतरही धावगती मंदावली नाही. जय जैन (२८ नाबाद) आणि ध्रुमिल मटकर (२८) यांनी ५२ धावांची वेगवान भागीदारी केली.

# चुकीच्या माहिती आधारे मिळवलेला जामीन हायकोर्टाचे दुसरे खंडपीठ रद्द करू शकते



■ नवी दिल्ली

**आरोपीने** चुकीची माहिती सादर करून जामीन मिळवला असल्यास उच्च न्यायालयातील एका खंडपीठाने मंजूर केलेला जामीन दुसरे खंडपीठ रद्द करू शकते, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे.

हे प्रकरण अलाहाबाद उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या एका जामीन अर्जाशी संबंधित आहे. आरोपी सूरज महानंदा याच्याविरोधात अमली पदार्थ कायदा अंतर्गत कलम २१(क) आणि २९ अन्वये गुन्हे दाखल आहेत. कलम २१(क) हे अमली पदार्थांशी संबंधित नियमांचे उल्लंघन केल्याबद्दलच्या शिक्षेशी, तर कलम २९ हे गुन्ह्याला प्रोत्साहन देणे किंवा गुन्हेगारी कट रचण्याशी संबंधित आहे. सहआरोपी बाबू चॅटर्जी याला यापूर्वी उच्च न्यायालयाच्या एका खंडपीठाने जामीन मंजूर केला होता. त्याच आधारावर सूरज महानंदा यानेही जामिनासाठी अर्ज केला. सुनावणीदरम्यान न्यायालयाला माहिती देण्यात आली की, बाबू चॅटर्जी याने जामीन मिळवताना वस्तुस्थिती चुकीच्या पद्धतीने मांडली होती. त्याने खटल्यात जवळपास २५ साक्षीदारांची साक्ष होणे बाकी असल्याचे सांगितले होते. मात्र प्रत्यक्षात केवळ १३ साक्षीदारांची साक्ष घेणे बाकी होते. ही बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही उच्च न्यायालयाने त्याचा जामीन रद्द करण्याच्या अर्जावर विचार करण्यास नकार दिला. दुसऱ्या खंडपीठाने मंजूर केलेला जामीन रद्द करण्याचा अधिकार आपल्याला नसल्याचे नमूद केले होते. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, जर जामीन चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती देऊन मिळवला गेला असेल.

देश विदेश

# डेन्मार्क पंतप्रधानपदी तिसऱ्यांदा मेटे फ्रेडरिकसेन यांची निवड

■ कोपनहेगन

**डेन्मार्कच्या** पंतप्रधानपदी मेटे फ्रेडरिकसेन यांची सलग तिसऱ्यांदा निवड झाली आहे. संसदीय निवडणुकांनंतर सुमारे दहा आठवडे चाललेल्या चर्चेनंतर अखेर चार पक्षांनी एकत्र येत नव्या आघाडी सरकारची स्थापना करण्यावर सहमती दर्शवली. या नव्या सरकारचे नेतृत्व फ्रेडरिकसेन करणार आहेत.

फ्रेडरिकसेन या सोशल डेमोक्रॅट पक्षाच्या नेत्या असून त्यांच्या नेतृत्वाखाली सोशल डेमोक्रॅट्स, सोशलिस्ट पीपल्स पार्टी, उदारमतवादी व्हेंट्रे पक्ष आणि मध्यममार्गी मॉडरेट्स या चार पक्षांनी आघाडी तयार केली. या आघाडीमुळे संसदेत स्थिर सरकार देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. रात्री फ्रेडरिकसेन यांनी डेन्मार्कचे राजा फ्रेडरिक दहावे यांची भेट घेऊन सरकार स्थापन करण्याची तयारी असल्याची माहिती दिली.

# नेपाळ संसदेत सीमावादावरून गदारोळ! दोन्ही सभागृह तहकूब

■ काठमांडू

**भारत-नेपाळ** सीमावादासंदर्भात नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांनी केलेल्या वक्तव्यावरून नेपाळच्या संसदेत गदारोळ झाला. विरोधी पक्षाच्या खासदारांनी पंतप्रधानांच्या विधानाचा तीव्र निषेध करत संसदेचे कामकाज ठप्प केले. त्यामुळे प्रतिनिधी सभा आणि राष्ट्रीय सभा या दोन्ही सभागृहांचे कामकाज तहकूब करण्यात आले.

संसदेत बोलताना पंतप्रधान बालेन शाह यांनी भारत आणि नेपाळ यांच्यातील सीमावादाचा उल्लेख करत काही वादग्रस्त विधाने केली होती. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वातावरण तापले. विरोधकांनी त्यांच्यावर जोरदार टीका केली आहे. पंतप्रधानांनी केलेले विधान मागे घ्यावे आणि ते संसदीय नोंदीतून वगळावे, अशी मागणी विरोधी पक्षांकडून करण्यात आली. आज सभेचे कामकाज सुरू होताच विरोधी पक्षाचे सदस्य आक्रमक झाले. काही खासदारांनी निषेध व्यक्त करत अध्यक्षांच्या आसनापर्यंत धाव घेतली. अध्यक्ष डोल प्रसाद अर्याल यांनी सदस्यांना शांत राहण्याचे आवाहन केले, मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. गदारोळ वाढत गेल्याने प्रतिनिधी सभेचे कामकाज ८ जूनपर्यंत तहकूब झाले. राष्ट्रीय सभेचे कामकाजही पुढील दिवसापर्यंत स्थगित करण्यात आले.

# पाटणात खान सरांच्या क्लासबाहेर गोळीबार! सुरक्षारक्षक जखमी

■ पाटणा

**पाटणात** प्रसिद्ध शिक्षक फैझल खान उर्फ खान सर यांच्या मुसल्लापूर हाट परिसरातील कोचिंग इन्स्टिट्यूटबाहेर काल रात्री गोळीबार झाला. या घटनेने परिसरात खळबळ उडाली. या हल्ल्यात संस्थेचा सुरक्षारक्षक जखमी झाला असून, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेनंतर परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पोलिसांकडून सीसीटीव्ही फुटेज आणि प्रत्यक्षदर्शींच्या जबाबांच्या आधारे तपास सुरू आहे.

रात्री अज्ञात हल्लेखोरांनी कोचिंग सेंटरमध्ये घुसून मारहाण गोंधळ घालत वस्तूंची तोडफोड केली. मारहाणीत गार्डचे डोके फुटले, १०-१२ राउंड गोळीबार झाल्याची माहिती आहे. या घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि स्थानिक पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले.

# तेलंगणात रोखीने वेतन देण्यास बंदी कामगारांना किमान वेतन संरक्षण

■ हैदराबाद

**कामगार** क्षेत्रातील महत्त्वपूर्ण सुधारणेच्या दिशेने पाऊल टाकत तेलंगणा सरकारने रोखीने वेतन देण्यास बंदी घातली असून गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांना किमान वेतन संरक्षणाच्या कक्षेत आणले आहे. वेगाने वाढणाऱ्या या क्षेत्रातील कामगारांना अशा प्रकारचे संरक्षण देणाऱ्या राज्यांमध्ये तेलंगणा राज्य अग्रणी ठरले आहे.

नुकत्याच लागू झालेल्या नव्या सरकारी आदेशाद्वारे वेतन संहिता २०१९ मधील तरतुदी अंमलात आणण्यात आल्या आहेत. यामुळे १९४८ पासून लागू असलेला किमान वेतन कायदा बदलला जाणार आहे. राज्य सरकारने या निर्णयाला प्रगतिशील कामगार प्रशासनाचा सुवर्णमानदंड असे संबोधले असून कामगारांचे कल्याण आणि व्यवसाय सुलभता यामध्ये समतोल साधण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले आहे. नव्या नियमांनुसार नियोक्त्यांना आता कर्मचाऱ्यांचे वेतन रोख स्वरूपात देण्यास मनाई करण्यात आली आहे. वेतनाचे वितरण एनईएफटी, आरटीजीएस आयएमपीएस किंवा धनादेशाद्वारे करणे बंधनकारक असेल. यामुळे व्यवहारांची पारदर्शक नोंद तयार होईल आणि वेतनासंबंधी वाद तसेच कामगारांच्या शोषणाला आळा बसेल.

# जपानला जांगमी चक्रीवादळाचा तडाखा! जनजीवन विस्कळीत

■ टोकियो



**जांगमी** चक्रीवादळामुळे जपानमधील जनजीवन विस्कळीत झाले असून मुसळधार पाऊस, तुफानी वारे आणि उंच लाटांमुळे मोठे नुकसान झाले आहे. वादळाच्या तडाख्यामुळे ३०० हून अधिक विमान उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. ४७ हजारांहून अधिक घरांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. ९ जण जखमी झाले असून प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

जपानच्या हवामान खात्यानुसार, जांगमी चक्रीवादळ कागोशिमा प्रांतातील याकुशिमा बेटाजवळून ईशान्य दिशेने सरकत आहे. वादळाच्या केंद्राजवळ वाऱ्याचा वेग प्रति सेकंद २५ मीटरपर्यंत नोंदवण्यात आला आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली, घरांचे नुकसान झाले आणि रस्त्यांवर पाणी साचले आहे. वादळामुळे वाहतूक व्यवस्थेवर मोठा परिणाम झाला आहे. खराब हवामानामुळे क्युशू प्रदेशातून ये-जा करणारी ३०० हून अधिक विमान उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. तसेच अनेक रेल्वे मार्गांवरील सेवा स्थगित करण्यात आल्या असून काही द्रुतगती महामार्गांचे भागही तात्पुरते बंद करण्यात आले आहेत. सागरी वाहतुकीलाही मोठा फटका बसला असून ६४ सागरी मार्गांवरील सेवा बंद ठेवण्यात आल्या आहेत.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# एकनाथ शिंदेंचा आदेश पाळणार सत्तार नरमले! उमेदवारी मागे घेणार

■ छत्रपती संभाजीनगर

**जालना** विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील राजकीय हालचालींना वेग आला आहे. शिंदेसेना नेते अब्दुल सत्तार यांनी आता माघारीचा निर्णय घेतला. अब्दुल सत्तार यांनी मित्रपक्षांकडून मतदारसंघात हस्तक्षेप होत असल्याचे विधान केले होते. यामुळे महायुतीत तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान याबाबत काल रात्री संभाजीनगर येथे ६ स्थानिक आमदार आणि १ खासदार यांची जवळपास साडेतीन तास एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात बैठक झाली.

या बैठकीनंतर सत्तार म्हणाले की, मी कार्यकर्त्यांशी चर्चा करून समीरला अर्ज मागे घ्यायला लावणार आहे. याबाबत मला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा झाली. पण कार्यकर्त्यांना विश्वासात घेत उमेदवारी मागे घेतली तर नाराजीचा सूर राहत नाही.

**सत्तार वर्षा बंगल्यावर**

रात्री उशिरा अब्दुल सत्तार यांनी वर्षा बंगल्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीनंतर अब्दुल सत्तार यांनी सांगितले की, जिल्ह्यातील राजकारणावरून मी नाराज होतो. ही नाराजी मी मुख्यमंत्र्यांकडे व्यक्त केली. यावरून त्यांनी आम्हाला आश्वासन दिलेले आहे. जिल्ह्यात कार्यकर्त्यांसोबत उद्या सकाळी १० वाजता बैठक घेणार आहे. त्यानंतर ११ वाजता माझा मुलगा अर्ज मागे घेईल.

# अतिधोकादायक इमारतींच्या सुरक्षेसाठी हस्तक्षेप करा

## आदित्य ठाकरे यांची मागणी

■ मुंबई

**मुंबई** इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने (म्हाडा) नुकत्याच जाहीर केलेल्या पावसाळापूर्व सर्वेक्षणात ८२ उपकरप्राप्त इमारती अतिधोकादायक घोषित केल्यानंतर या इमारतींतील रहिवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वरळीचे उबाठा आमदार आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

म्हाडाने ३० मे २०२६ रोजी अतिधोकादायक इमारतींची यादी जाहीर केली. त्यानंतर या जुन्या आणि मोडकळीस आलेल्या इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षितता, पुनर्वसन आणि हक्कांचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात आदित्य ठाकरे यांनी या इमारतींमधील रहिवाशांच्या हक्कांबाबत चिंता व्यक्त केली आहे. अनेक कुटुंबे पिढ्यानपिढ्या या इमारतींमध्ये वास्तव्यास असून, इमारती अतिधोकादायक घोषित झाल्याचा गैरफायदा काही जागामालकांकडून घेतला जाण्याची शक्यता असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

आदित्य ठाकरे पत्रात म्हणाले की, रहिवाशांवर दबाव टाकून त्यांना जबरदस्तीने घरे खाली करण्यास भाग पाडले जाऊ शकते, तसेच प्रशासनाकडूनही निष्काळजीपणाची कारवाई होण्याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे या प्रकरणात राज्य सरकारने संवेदनशील भूमिका घेत रहिवाशांच्या हक्कांचे संरक्षण करावे, तसेच, या सर्व इमारतींतील मूळ रहिवाशांची अधिकृत नोंद करण्यात यावी आणि त्यांच्या पुनर्वसनाबाबत स्पष्ट धोरण राबवावे. ऐन पावसाळ्यात नागरिकांच्या जीवितास आणि जीवनमानास कोणताही धोका निर्माण होणार नाही, याची खात्री राज्य सरकारने करावी.

# वर्ध्यात डिझेलचा टँकर उलटला ड्रम-बॅरेल घेऊन नागरिकांची झुंबड

■ वर्धा

**वर्धा** जिल्ह्यातील हिंगणघाट परिसरात डिझेलने भरलेला टँकर उलटल्यानंतर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत ड्रम, बॅरेल, कॅन आणि विविध भांडी घेऊन वाहणारे डिझेल गोळा करण्यासाठी झुंबड उडवली. या घटनेमुळे परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

समुद्रपूर तालुक्यातील तरोडा ते बोथुडा मार्गादरम्यान हा अपघात घडला. समुद्रपूरच्या दिशेने जात असलेला डिझेल टँकर अचानक टायर फुटल्याने रस्त्याच्या कडेला उलटला. अपघातात टँकरमधील डिझेल वाहू लागले. अपघाताची माहिती मिळताच हिंगणघाट पोलीस घटनास्थळी पोहचले. पोलिसांनी परिसर ताब्यात घेत नागरिकांना दूर केले आणि पुढील धोका टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना सुरू केल्या. पोलीस घटनास्थळी पोहोचल्यानंतर डिझेल घेण्यासाठी झालेली गर्दी हळूहळू कमी झाली.


**महावितरण** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**विज बंदबाबत जाहीर निवेदन**

कल्याण पश्चिम विभागातील सर्व विज ग्राहकांना कळविण्यात येते की, २२ केव्ही तेजश्री उपकेंद्रातुन निघणाऱ्या **२२ केव्ही कर्णिक रोड** या वाहिनींवर देखभाल व दुरूस्तीच्या कामासाठी **दि. ०५.०६.२०२६ रोजी सकाळी ८.00 ते ११.00** वाजेपर्यत खाली नमुद भागाचा विज पुरवठा बंद राहील याची कृपया नोंद घ्यावी. ग्राहकांच्या होणाऱ्या गैरसोईबद्दल महावितरण कंपनी दिलगीर आहे.

| अनु. क्र. | उपकेंद्र | फिडर | भागाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | २२ केव्ही तेजश्री | कर्णिक रोड | रामबाग लेन नं १,२,३,४, संतोषीमाता रोड, भारत भोईर पार्क, गणेश टॉवर, अनंत रेजन्सी, भुजबळ वाडी, निलतेज नगर, त्रिभुवन, मेगा डेव्हलपर, गणपती मंदीर, गुरूद्वारा रोड, मधुरिमा स्विट्स, एसएसआय तुकाराम टॉवर, पुजा अपार्टमेंट, साई हेमलक्ष्मी अपार्टमेंट, श्रेया पॅलेस |

कार्यकारी अभियंता, कल्याण पश्चिम विभाग


# मनसेच्या इशाऱ्यानंतर मलबार हिलमधील गुजराती फलक हटवले

■ मुंबई

**मुंबईत** पुन्हा एकदा भाषाविषयक वाद पेटला असून, मलबार हिल परिसरातील गुजराती भाषेतील नामफलकांवरून राजकीय वातावरण तापले आहे. मनसेने या फलकांविरोधात आक्रमक भूमिका घेतल्यानंतर बृहन्मुंबई महापालिकेने संबंधित फलक हटविण्याची कारवाई केली.

मलबार हिल परिसरातील विविध चौक, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी गुजराती भाषेतील तसेच काही जैन समाजाशी संबंधित नामफलक लावण्यात आल्याचा मुद्दा मनसेने उपस्थित केला होता. महाराष्ट्रात आणि मुंबईत स्थानिक भाषेला प्राधान्य असताना अशा प्रकारचे फलक का लावण्यात आले, असा सवाल मनसेकडून करण्यात आला होता. या तक्रारीची दखल घेत महापालिकेच्या ए विभागाने संबंधित फलकांची तपासणी केली. तपासणीनंतर नियमांचे पालन न करणारे किंवा आवश्यक परवानगीशिवाय उभारण्यात आलेले काही फलक हटविण्याची मोहीम राबविण्यात आली. मनसेने हे फलक तातडीने हटविण्याची मागणी केली होती.

# अभिनेते आमीर खान-गौरी स्प्रॅट ५ जुलै रोजी विवाहबद्ध होणार

■ मुंबई

**बॉलीवूड** स्टार आमिर खान त्याची पार्टनर गौरी स्प्रॅटशी विवाह एका खासगी समारंभात करणार आहे. अभिनेता आमिर आणि गौरी स्प्रॅट ५ जुलै रोजी खासगी नोंदणीकृत विवाह करून आपल्या नात्याला अधिकृत स्वरूप देणार आहेत. कुटुंबीय आणि जवळच्या मित्रमंडळींच्या उपस्थितीत आमीर यांच्या घरी हा साधा आणि खाजगी विवाहसोहळा पार पडणार आहे.

६१ वर्षीय आमीर खान आणि ४७ वर्षीय गौरी स्प्रॅट यांनी आपल्या नात्याला अधिकृत मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे. या विवाहाला केवळ दोन्ही कुटुंबांतील सदस्य आणि काही निवडक जवळचे मित्र



उपस्थित राहणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. आमीर यांच्या निकटवर्तीयांच्या मते, या जोडप्याने नुकताच विवाहाचा निर्णय घेतला. दोघेही आपल्या आयुष्यात स्थिर आहेत आणि त्यांच्या नात्याचा आनंद आपल्या जवळच्या लोकांसोबत साजरा करू इच्छितात. विवाहाची तयारी सुरू झाली असून हा अत्यंत साधा आणि कौटुंबिक स्वरूपाचा कार्यक्रम असेल. हा समारंभ आमीर खान यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात येणार असून कोणताही मोठा सार्वजनिक सोहळा होणार नाही. पाहुण्यांची यादी अद्याप अधिकृतपणे जाहीर करण्यात आलेली नसली, तरी आमीर यांचे जवळचे मित्र सलमान खान आणि शाहरुख खान उपलब्धतेनुसार उपस्थित राहू शकतात, अशी चर्चा आहे. गौरी स्प्रॅट यांना त्यांच्या पूर्वीच्या विवाहातून सात वर्षांचा क्रिन नावाचा मुलगा आहे.


**जाहीर सूचना**


**श्री. जीत गांगुली आणि श्रीमती चंद्रानी गांगुली,** सदस्य - **एस एस एस प्रसन्ना ओशिवरा ई युनिट क्र. ३ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.,** त्यांचा पत्ताः **स्वामी समर्थ प्रसन्ना ओशिवरा (पूर्व) युनिट क्र. ३ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., ओशिवरा, अंधेरी (प), मुंबई - ४०००५३** आणि सोसायटीच्या दीप श्री अपार्टमेंट इमारतीमधील चौथ्या मजल्यावरील फ्लॅट क्र.४०१ चे धारक, असे की, ५ (पाच) समभागांसाठी ज्यांचे क्र.९१ ते ९५ असे आहेत, आणि ज्यावर प्रमाणपत्र क्र.४०१ आहे, असे मूळ भाग प्रमाणपत्र हरवले/गहाळ झाले आहे आणि त्याऐवजी दुय्यम भाग प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्यात आला आहे.

सोसायटी याव्दारे, दुय्यम भाग प्रमाणपत्र जारी करण्याबाबत दावेदारी/आक्षेप घेणारे यांच्याकडून काही दावे आणि आक्षेप असल्यास ते ह्या सूचनेच्या प्रसिध्दीपासून १४ (चौदा) दिवसांत त्याच्या/तिच्या/त्यांच्या दावा/ आक्षेपांच्या पुष्ठ्यर्थ अशी कागदपत्रे आणि अन्य पुराव्याच्या प्रतींसह लेखी स्वरूपात सचिव, एस. एस. एस. प्रसन्ना को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., स्वामी समर्थ प्रसन्ना ओशिवरा (पूर्व) युनिट क्र. ३ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., ओशिवरा, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०००५३ यांच्याकडे सादर कराव्यात. वरील नमूद केलेल्या कालावधीत कोणतेही दावे/हरकती प्राप्त न झाल्यास, सोसायटीला तिच्या उपविधींमध्ये नमूद केलेल्या तरतुदींनुसार दुय्यम भाग प्रमाणपत्र जारी करण्यास मोकळीक राहील. सोसायटीकडे प्राप्त होणारे दावे/हरकती, असल्यास, सोसायटीच्या उपविधीतील तरतुदींनुसार त्यावर सोसायटी कार्यवाही करेल. सोसायटींच्या नोंदणीकृत उपविधींची प्रत दावेदार/आक्षेपकाव्दारे निरीक्षणाकरिता सोसायटीचे सचिव यांच्याकडे सदर सूचना प्रसिध्दीच्या तारखेपासून कालावधी समाप्तीच्या तारखेपर्यंत स.१०.०० ते दु.४.०० वा. दरम्यान उपलब्ध आहेत.

**एस. एस. एस. प्रसन्ना को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.च्या वतीने व करिता**

**ठिकाणः मुंबई** **सही/-**
**दिनांकः ०४.०६.२०२६** **(सचिव)**


# कोयना धरणातील ८ टीएमसी पाण्याचे बाष्पीभवन झाले



■ पाटण

**चारही** बाजूंनी पर्यावरणपूरक नैसर्गिक साधनसंपत्ती असताना कोयना धरणाला ग्लोबल वॉर्मिंगचा फटका बसत आहे. १०५.२५ टीएमसी पाणी साठवण क्षमता असलेल्या या धरणात २०१९ ते २०२६ या दहा वर्षात तब्बल ७६.५० टीएमसी पाण्याचे बाष्पीभवन झाले आहे.

यावर्षी जगभरासह भारत व राज्यातही उन्हाचा प्रचंड तडाखा बसला आहे. यातून नुकत्याच संपलेल्या धरणाच्या तांत्रिक जलवर्षात ८.१२ टीएमसी पाण्याचे बाष्पीभवन झाले असून, आत्तापर्यंतच्या बाष्पीभवनातील ही सर्वाधिक तांत्रिक आकडेवारी आहे. धरणातील पाण्याचे दरवर्षी सरासरी सात ते आठ टीएमसी पाण्याचे बाष्पीभवन होते. मागील दहा वर्षात याद्वारे तब्बल ७६.५० टीएमसी पाण्याचे बाष्पीभवन झाले. या धरणांतर्गत शिवसागर कोयना ते तापोळा (महाबळेश्वर) अशा ६७.५० किलोमीटर अंतरावर हा जलाशय फार मोठ्या प्रमाणावर विखुरला असला तरी इतर धरणांतील बाष्पीभवनाची तुलना केली तर कोयनेतील पाण्याचे त्यापटीत कमी बाष्पीभवन होत असल्याचा अभ्यासकांचा दावा आहे. धरणाच्या आजूबाजूला संपूर्णपणे पर्यावरण पूरक निसर्ग असून जंगले, वन संपदेमुळे धरणांतर्गत विभागात जमिनीची धूप कमी होत असल्याने बाष्पीभवन कमी होत असल्याचा दावा आहे.तब्बल १८० चौरस किलोमीटर अंतरावरील या परिसरात तापमान, वारा,सुर्यप्रकाश, हवेतील आर्द्रता याचाही परिणाम बाष्पीभवनावर होत असल्याचे अभ्यासकांचे मत आहे.

# टोमॅटोच्या क्रेटवरून वाद विक्रेत्याची हत्या! चौघांना अटक

■ भाईंदर

**भाईंदरच्या** भाजी मार्केटमध्ये टोमॅटोच्या क्रेटवरून झालेल्या वादात एका भाजी विक्रेत्याचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी नवघर पोलिसांनी ४ आरोपींना अटक केली आहे. २९ मे रोजी भाईंदर पूर्वेच्या हनुमान नगर मध्ये असलेल्या भाजी मार्केटमध्ये दोन विक्रेत्यांमध्ये टोमॅटोच्या क्रेटवरून वाद झाला होता.

या वादात संतोष सिंह याच्यावर लोखंडी सळईने हल्ला करण्यात आला होता. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. बुधवारी सकाळी उपचारादरम्यान सिंग याचा मृत्यू झाला. या प्रकरणी नवघर पोलिसांनी धीरज गुप्ता, रोशन गुप्ता, राजन गुप्ता आणि अंजित गुप्ता या चार आरोपींना हत्येचा गुन्हा दाखल करून अटक केली आहे. या घटनेनंतर भाजी मार्केट परिसरात तणाव पसरला आहे.


**जाहीर सूचना**

आम्ही कु. **दिप्पल पी. छेडा (पूर्वीच्या सौ. दिप्पल एस. शाह)** यांच्या मुंबई शहर आणि मुंबई उपनगरच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप-जिल्ह्यामधील परेल-शिवडी विभाग, मुंबईचा कॅडस्ट्रल सर्व्हे क्र. ६५५ (भाग), ६५४, ६५८ (भाग), ६५९ (भाग), ६५३ (भाग), ४४० (भाग), ४३७ (भाग), ८५४, ८६९, ८७०, ८७१ आणि सी.एस.क्र. ४३२ (भाग), ४३७ (भाग), ४४० (भाग), १/४३७, ६४५, ६४६, ६४७, ६४८, ६४९, ६५० आणि ८५४ आणि दादर नायगाव विभाग, मुंबईचा कॅडस्ट्रल सर्व्हे क्र. १०३८, १०३९, १५५ (भाग), १७४ (भाग), १७६ (भाग), १७७ (भाग), १८५ (भाग) धारण केलेल्या जमिनीवर बांधलेल्या (i) क्रेसेन्ट बे या प्रकल्पामधील टी५ या इमारत/विंगच्या ३८ व्या मजल्यावरील युनिट/सदनिका क्र. ३८०२, मोजमाप १०६८.४३ चौरस फूट कार्पेट क्षेत्रफळ (“**युनिट**”) आणि युनिटशी संलग्न आणि पूरक क्षेत्रे मोजमाप ६०३.७५ चौरस फूटच्या वापर, उपभोग, मालकी आणि ताब्याचे तिचे हक्क, (ii) सदर इमारतीच्या पोडियम ५ स्तरावरील २ (दोन) कार पार्किंग जागा क्र. पी५-१५७ आणि पी५-१५८ (“**कार पार्किंग जागा**”) आणि (iii) एलॲण्डटी क्रेसेन्ट बे टॉवर ५ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेडद्वारे पारित भाग प्रमाणपत्र क्र. ०३४-३८०२ दिनांक ६ नोव्हेंबर, २०२० द्वारे सिद्ध होत असल्यानुसार डिस्टिंक्टिव्ह क्र. ०३३१ ते ०३४० (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रु. ५० (रुपये पन्नास) प्रत्येकीचे १० (दहा) पूर्णतः भरणा केलेले समभाग (‘**समभाग**’) च्या संदर्भातील शीर्षकाची तपासणी करीत आहोत.

युनिट, कार पार्किंग जागा आणि समभाग यापश्चात एकत्रितरित्या “**जागा**” असे उल्लेखित.

जागा किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात आणि/किंवा वर वारसा, हिस्सा, उत्तराधिकार, गहाणवट, विक्री, हस्तांतरण, अभिहस्तांकन, शीर्षक करारनाम्याची ठेव, सामंजस्य करार, वाटप, भाडेकरू, भाडेपट्टी, उपभाडेपट्टी, परवाना, उप-परवाना, धारणाधिकार, प्रभार, न्यास, देखभाल, वहिवाट, भेट, प्रलंबित कायदेशीर कारवाई, देवाणघेवाण, ताबा, मृत्यू, वारसा किंवा बोजा या मार्गे किंवा अन्य कशाही प्रकारे कोणताही हक्क, शीर्षक, हितसंबंध किंवा कोणत्याही स्वरुपाचा कोणताही आक्षेप (“**दावे**”) असणाऱ्या सर्व व्यक्तींनी याद्वारे त्याबाबत आवश्यक सहाय्यक दस्तऐवजांच्या प्रतिंसह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना याखाली उल्लेखिलेल्या पत्त्यावर, सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून **१४ (चौदा)** दिवसांमध्ये सूचित करणे आवश्यक आहे. असे न केल्यास, असे समजण्यात येईल की, दावेदार(रां)नी असे दावे सोडून दिले आहेत आणि/किंवा असा दावा वापरण्याचा हक्क त्याग केला आहे आणि अशा कोणत्याही दाव्यांच्या संदर्भाशिवाय विक्री पूर्ण करण्यात येईल.

**दिनांक ४ जून, २०२६**

**निधी शर्मा**
**पी एस चेंबर्स**
ॲडव्होकेट्स
१३२-बी, १३ वा मजला, मित्तल कोर्ट, नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०००२१. दूर.: +९१ ९३७२७३७११०,
ई-मेलः nidhi.sharma@pschambers.co.in



**नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अन्वये**
**ई-लिलाव विक्री सूचना**
**सी. महेंद्रा एक्सपोर्ट्स लिमिटेड - परिसमापनामध्ये**
नोंद. कार्यालयः टॉवर ‘सी’, कार्यालय क्र. सीसी-६०११, भारत डायमण्ड बोर्स, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.

सी. महेंद्रा एक्सपोर्ट्स लिमिटेड (परिसमापनामध्ये) च्या मालमत्तेची ई-लिलाव विक्री **“जसे आहे जेथे आहे”, “जसे आहे जे आहे”, “तेथे जे आहे तत्त्वावर”** आणि **“कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर”** करण्यात येईल.
**ई-लिलावाचा दिनांक आणि वेळः गुरुवार, ०२ जुलै, २०२६, स. ११.३० पासून दु. १२.३० पर्यंत**


| ब्लॉक | मालमत्ता | राखीव किंमत (रु.) | इसारा रक्कम अनामत (ईएमडी) (रु.) | बोली विस्तार मूल्य (रु.) |
|---|---|---|---|---|
| १. | सर्व्हे क्रमांक ४७४ व ४७६ गाव तिसंगी, तालुकाः कवठे - महाकांळ, जि. सांगली - ४१६४०५, महाराष्ट्र येथे स्थित नापीक जमीन, काही अंशी जिरायत व सडा-पड जमीन. (सर्व्हे क्र. ४७४ - ५,९०० चौ. मीटर्स आणि सर्व्हे क्र. ४७६ - २२०० चौ. मीटर्स) | ११,००,००० | १,१०,००० | १,००,००० |
| २. | सी. महेंद्रा इंटरनॅशनल लिमिटेडचे इक्विटी समभाग (रु. १० चे पूर्णतः भरणा केलेले ११२,८०० समभाग) **सी. महेंद्रा इंटरनॅशनल लिमिटेडच्या भारत डायमण्ड बोर्स येथे खालीलप्रमाणे ४ मालमत्ता आहेतः** कार्यालय क्र. / तपशील: बीडब्ल्यू २१०१ - २१३ चौ.फू.; १ पार्किंग; बीडब्ल्यू २१०२ - २०५ चौ.फू.; १ पार्किंग; सीसी ६०१२ - ५२१ चौ.फू.; १ पार्किंग; सीसी ६०१३ - ५४८ चौ.फू., २ पार्किंग | १०,००,००,००० | १,००,००,००० | १०,००,००० |

**ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणेः**
१. ई-लिलाव विक्री वेबसाईट https://ibbi.baanknet.com (**“लिलाव पोर्टल”**) मार्फत बँकनेटद्वारे करण्यात येईल.
२. इच्छुक बोलीदारांनी त्यांचे इसारा रक्कम अनामत (**“ईएमडी”**) लिलाव पोर्टलद्वारे **दि. ०१ जुलै, २०२६ रोजी सायं. ६.०० वाजेपर्यंत** सादर करणे आवश्यक आहे.
३. संभाव्य बोलीदारांनी नादारी आणि दिवाळखोरी संकेताच्या कलम २९ए अन्वये पात्रतेची उद्घोषणा समाविष्ट असलेले आवश्यक दस्तऐवज फक्त लिलाव पोर्टलद्वारे सादर करावे.
४. उच्चतम बोलीदाराची ईएमडी, जर तो प्रक्रियेदरम्यान कोणत्याही समयी अपात्र आढळल्यास, जप्त करण्यात येईल.
५. मालमत्ता आणि लिलावाशी संबंधित सर्व शर्ती, अटी, माहिती प्रक्रिया ज्ञापनामध्ये देण्यात आले आहे आणि लिलाव पोर्टलवर उपलब्ध आहेत. माहिती / डेटा रूमची मागणी **ईमेल आयडीः cirpcmel@gmail.com** द्वारे पाठवावी लागेल.
६. इच्छुक बोलीदारांनी फक्त लिलाव पोर्टलद्वारे नोंदणी करावी, त्यांचे पात्रता दस्तऐवज, बोली अपलोड करावी आणि त्यांच्या बोलीची पुष्टी प्राप्त करावयाची आहे.
७. परिसमापक कोणतेही कारण न दर्शविता कोणतीही बोली स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे किंवा रद्द करण्याचे किंवा प्रक्रिया ज्ञापन/ई-लिलावाच्या कोणत्याही अटी आणि शर्ती सुधारित करण्याचे हक्क राखून ठेवीत आहेत. परिसमापक कोणतेही कारण न दर्शविता कोणत्याही समयी ई-लिलाव रद्द करण्याचे हक्क देखील राखून ठेवीत आहेत.

सही/-
**दिनांकः ०४ जून, २०२६** **क्रिष्णा चमाडिया**
**ठिकाणः मुंबई** **परिसमापक - सी. महेंद्रा एक्सपोर्ट्स लिमिटेड**
आयबीबीआय नोंदणी क्रमांकः IBBI/IPA-001/IP-P00694/2017-18/11220

नवाकाळ

Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in




## ‘स्कॅरी मुव्ही’चे प्रदर्शन पुढे ढकलले

**या** आठवड्यात बॉक्स ऑफिसवर अनेक मोठे चित्रपट प्रदर्शित होत असल्यामुळे स्क्रीन शेअरिंगचा मोठा वाद निर्माण झाला आहे. या गोंधळामुळे ‘स्कॅरी मुव्ही’ या हॉलिवूड चित्रपटाचे प्रदर्शन पुढे ढकलण्यात आले आहे, तर वरुण धवनचा ’है जवानी तो इश्क होना है’ आणि राम चरण स्टारर ‘पेड्डी’ या चित्रपटांमध्ये स्क्रीन मिळवण्यासाठी तीव्र चढाओढ सुरू आहे. चित्रपटगृहांच्या मालकांनुसार, एकाच वेळी अनेक चित्रपट येत असल्याने किंवा सेन्सॉरशिपच्या अडचणींमुळे हा चित्रपट पुढे ढकलण्यात आला असावा. हा चित्रपट आता पुढील आठवड्यात १२ जून रोजी प्रदर्शित होण्याची शक्यता आहे.

## कंगनाने सांगितला २६/११ चा किस्सा



**अभिनेत्री** आणि खासदार कंगना राणौतच्या आगामी ‘भारत भाग्य विधाता’ या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला. हा चित्रपट २६/११ च्या मुंबई हल्ल्यादरम्यान कामा हॉस्पिटलमधील परिचारिका आणि वॉर्डबॉईज यांनी रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी दाखवलेल्या शौर्यावर आधारित आहे. या ट्रेलर लाँच सोहळ्यात जेव्हा पत्रकारांनी विचारले की, २६/११ च्या रात्री तुम्ही कुठे होता? तेव्हा कंगनाने या घटनेचा खुलासा केला.

कंगनाने सांगितले की, २००८ साली मी चित्रपटसृष्टीत नवीन होते आणि विशेष फिल्म्स’ सोबत काम करत संघर्ष करत होते. त्या रात्री अभिनेत्री शहाना गोस्वामी हिने यारी रोड येथील तिच्या नवीन घरात एका पार्टीचे आयोजन केले होते. या पार्टीत मी शगुफ्ता रफीक आणि इतर २० ते २५ तरुण कलाकार उपस्थित होतो. सर्वजण गाण्यांवर नाचत आणि आनंद साजरा करत होतो. त्याचवेळी दिग्दर्शक महेश भट्ट तिथे आले आणि त्यांनी सर्वांना तात्काळ टीव्ही चालू करण्यास सांगितले. टीव्हीवर मुंबईतील दहशतवादी हल्ल्याच्या बातम्या सुरू होत्या. हे पाहून सर्वजण स्तब्ध झाले. सुरुवातीला कोणालाच परिस्थितीचे गांभीर्य समजले नाही आणि पार्टी थांबवून घरी जावे की इथेच थांबावे?’ असा प्रश्न पडला. मात्र, बाहेरची गंभीर परिस्थिती पाहून महेश भट्ट यांनी सर्वांना परिस्थिती निवेपर्यंत घरातच सुरक्षित राहण्याचा सल्ला दिला. महेश भट्ट यांनी माहिती दिली नसती, तर आपल्याला या हल्ल्याबद्दल काहीच समजले नसते, असे कंगनाने आवर्जून सांगितले.


## रणवीरच्या एक्झिटने ‘डॉन ३’ संकटात



**‘डॉन ३’** या चित्रपटातून अभिनेता रणवीर सिंग अचानक बाहेर पडल्यामुळे सध्या हिंदी चित्रपटसृष्टीत मोठी खळबळ उडाली आहे. या चित्रपटाशी संबंधित अंतर्गत सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, हा संपूर्ण प्रकल्प जवळपास ३२ महिने केवळ रणवीर सिंगला केंद्रस्थानी ठेवून तयार करण्यात येत होता. त्यामुळे ऐन चित्रीकरणाच्या तोंडावर त्याने हा चित्रपट का सोडला, असा सवाल आता चित्रपटसृष्टीतील जाणकार उपस्थित करत आहेत.

‘एक्सेल एंटरटेन्मेंट’ने एप्रिल २०२३ पासूनच रणवीर सिंगला नवा ‘डॉन’ म्हणून सादर करण्याची तयारी सुरू केली होती. शाहरुख खाननंतर या प्रसिद्ध फ्रँचायझीची धुरा रणवीरकडे सोपवण्यासाठी निर्मात्यांनी मोठा आर्थिक आणि व्यावसायिक धोका पत्करला होता. नोव्हेंबर २०२५ मध्ये रणवीरने निर्मात्यांच्या खर्चाने ॲक्शन ट्रेनिंगही पूर्ण केले होते. इतकेच नव्हे तर, डिसेंबर २०२५ रोजी त्याने दिग्दर्शक फरहान अख्तर आणि इतर कलाकारांसोबत संहितेच्या वाचनाचे (स्क्रिप्ट रीडिंग) सत्रही पूर्ण केले होते. सर्व काही ठरल्याप्रमाणे सुरू असताना, अचानक डिसेंबर २०२५ रोजी होणारी लूक टेस्ट ऐनवेळी रद्द करण्यात आली. त्यानंतर दोनच दिवसांनी म्हणजेच डिसेंबर २०२५ मध्ये रणवीर सिंगने निर्मात्यांना फोन करून तो या चित्रपटाचा भाग असणार नाही, असे कळवले.

## शक्ती कपूर यांचा गौप्यस्फोट



**‘द कपिल शर्मा शो’**मध्ये बोलताना शक्ती कपूर यांनी जुन्या काळातील काही आठवणींना उजाळा दिला आहे. ‘सत्ते पे सत्ता’ या चित्रपटातील कॉमेडी भूमिकेनंतर त्यांना जितेंद्र, श्रीदेवी आणि जयाप्रदा यांची मुख्य भूमिका असलेल्या ‘मवाली’ चित्रपटात काम करण्याची मोठी संधी मिळाली होती. मात्र, चित्रीकरणाच्या पहिल्याच दिवशी त्यांच्यासोबत अनपेक्षित प्रकार घडला. पहिल्याच शॉटमध्ये कादर खान यांनी त्यांना अशी थप्पड मारली की ते जमिनीवर पडले. त्यानंतर दुसऱ्या शॉटमध्ये अरुणा इराणी यांनीही त्यांना थप्पड मारली आणि ते पुन्हा खाली पडले. तिसऱ्या शॉटमध्येही असेच घडल्याने शक्ती कपूर अत्यंत अस्वस्थ झाले. आपले करिअर सुरू होण्यापूर्वीच संपेल अशी भीती त्यांना वाटू लागली. अजून आपले लग्नही झाले नाही आणि अशा भूमिकांमुळे प्रेक्षक आपल्याला कधीच गांभीर्याने घेणार नाहीत, असे वाटून त्यांनी थेट कादर खान गाठले. त्यांचे पाय धरून, ‘माझे संध्याकाळचे विमानाचे तिकीट बुक करा, मला या चित्रपटात काम करायचे नाही,’ अशी विनंती त्यांनी केली. पण चित्रपटाचे ॲक्शन डायरेक्टर वीरू देवगण यांनी त्यांची समजूत काढली.

## रुमानाचे पाऊल आता दिग्दर्शनाच्या क्षेत्रात



**अभिनेत्री** आणि दिग्दर्शिका रुमाना मोल्ला हिने तिच्या ‘इन्व्हर्टेड’ या चित्रपटाच्या माध्यमातून दिग्दर्शन क्षेत्रात पाऊल ठेवले आहे. अभिनय आणि दिग्दर्शन या दोन्ही क्षेत्रांचा अनुभव घेतल्यानंतर, दिग्दर्शनाची प्रक्रिया अधिक समाधान देणारी असल्याचे तिने म्हटले आहे. एका मुलाखतीत आपला अनुभव शेअर करताना रुमाना म्हणाली की, जेव्हा तुम्ही एखादी गोष्ट स्वतः निर्माण करता, तेव्हा त्यातून मिळणारे समाधान खूप वेगळे असते. अभिनय करताना तुम्ही दुसऱ्या कोणाच्या तरी कल्पनेचा भाग असता, पण दिग्दर्शन करताना तुम्ही स्वतः एका नव्या कलाकृतीला जन्म देत असता. त्यामुळे दिग्दर्शिका म्हणून काम करणे तिला अधिक आनंददायी वाटले. एक दिग्दर्शिका म्हणून काम करताना कलाकारांची निवड करणे हा सर्वात आव्हानात्मक भाग होता, असे रुमानाने सांगितले. चित्रपटाचे बजेट मर्यादित असल्याने त्यांना अशा कलाकारांची गरज होती जे केवळ भूमिकेसाठी योग्य नसतील, तर कमी मानधनात आणि उपलब्ध वेळेत काम करण्यास तयार असतील.

रुमाना मोल्ला हिने यापूर्वी ‘प्यार का पंचनामा २’ या गाजलेल्या चित्रपटात अभिनय केला आहे. अभिनय क्षेत्रातील अनुभवाचा फायदा तिला दिग्दर्शन करताना झाला, कारण कलाकारांना सेटवर कशा प्रकारच्या अडचणी येतात आणि त्यांच्याकडून सर्वोत्तम काम कसे करून घ्यायचे, हे तिला चांगल्या प्रकारे समजले होते.

## मनोज वाजपेयींनी सोडले मौन



**अभिनेता** मनोज वाजपेयी यांनी त्यांच्या आगामी ‘घूसखोर पंडत’ या चित्रपटाच्या शीर्षकावरून निर्माण झालेल्या वादावर आणि त्यांना मिळालेल्या जिवानिशी मारण्याच्या धमक्यांवर अखेर आपले मौन सोडले आहे. या वादादरम्यान त्यांच्या १५ वर्षांच्या मुलीला आणि पत्नीला ट्रोल करत अत्यंत अश्लील भाषा वापरली गेल्याने ते प्रचंड दुखावले गेले आहेत. मनोज बाजपेयी यांनी स्पष्ट केले की, चित्रपटाचे नाव ठरवण्याच्या प्रक्रियेत अभिनेत्यांचा सहभाग नसतो. ओटीटी प्लॅटफॉर्म आणि दिग्दर्शकांनी हे नाव निश्चित केले होते आणि वैयक्तिकरित्या त्यांना या नावात कोणतीही अडचण वाटली नव्हती. मात्र, सोशल मीडियावरील एका वर्गाने या शीर्षकावर आक्षेप घेतल्यानंतर, निर्मात्यांनी जनभावनांचा आदर करत नाव बदलण्याची तयारी दर्शवली. हा वाद न्यायालयात गेल्यानंतर केवळ एका सुनावणीत हा प्रश्न मिटवण्यात आला आणि चित्रपटाचे नाव बदलण्याचा निर्णय घेण्यात आला. पण केवळ चित्रपटाच्या नावावरून जिवानिशी मारण्याच्या धमक्या देणे कितपत योग्य आहे, असा सवाल त्यांनी केला. ट्रोलिंगबद्दल बोलताना ते म्हणाले की, इथे बॉटस् आणि ट्रोल करणाऱ्यांची संख्या इतकी आहे की कोणाला गांभीर्याने घ्यावे हे समजत नाही. परंतु, ज्यांचा या चित्रपटाशी किंवा नाव ठरवण्याशी काहीही संबंध नाही, अशा त्यांच्या १५ वर्षांच्या मुलीला आणि पत्नीला यामध्ये खेचून त्यांच्याबद्दल अश्लील वक्तव्ये करण्यात आली, याने त्यांना अत्यंत मानसिक त्रास आणि निराशा झाली आहे.

# वसई-विरार पालिकेची प्रभाग रचना नियमानुसारच!निवडणूक होणार

■ विरार

**वसई**-विरार महापालिकेची रखडलेली प्रभाग समितीच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला. ही प्रभाग रचना नियमानुसारच झाल्याचा अहवाल पालिकेने राज्य शासनाला सादर केला. पालिकेच्या प्रभाग रचनेवर भाजपाने तक्रार केल्याने २ महिन्यांपासून या निवडणुका रखडल्या होत्या.

वसई-विरार महापालिकेत बहुजन विकास आघाडीची सत्ता आहे. बविआकडे ७१ तर भाजपाकडे ४३ सदस्यांचे संख्याबळ आहे. विरोधकांना प्रभाग समिती मिळू नये यासाठी बविआने बहुमताच्या जोरावर नवीन प्रभाग रचना मंजूर करून घेतली होती. यामुळे बविआला ८ तर भाजपाला अवघा १ सभापती मिळणार आहे. याविरोधात भाजपा आमदार राजन नाईक यांनी मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केली होती. त्यावर शासनाने पालिकेकडून अहवाल मागवला होता. पालिकेने हा अहवाल तयार शासनाला सादर केला आहे. त्यानुसार प्रभाग रचना ही महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदीनुसारच करण्यात आल्याचे म्हटले आहे. पालिकेच्या या अहवालामुळे प्रभाग समिती निवडणुकीतील अडसर दूर झाला आहे.

# नाशिकमधील महायुतीचे बंडखोर गीते बंधू निवडणूक लढण्यावर ठाम

■ नाशिक

**नाशिक** विधान परिषद मतदार संघातील महायुतीचे बंडखोर उमेदवार गणेश गीते व गोकुळ गीते आपल्या उमेदवारीवर ठाम आहेत. ही निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी पुन्हा स्पष्ट केल्यामुळे महायुतीतील संभ्रम कायम झाला. उद्या अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे. मात्र त्यांच्या भूमिकेकडे आता महायुतीच्या नेत्यांचे लक्ष लागले आहे.

गणेश गीते यांचे बंधू गोकुळ गीते यांनी अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज दाखल केल्यामुळे नाशिकमधील राजकीय समीकरणे अधिकच गुंतागुंतीची बनली आहेत. यासंदर्भात शिवसेना नेते आणि मंत्री उदय सामंत यांनी गणेश गीते आणि गोकुळ गीते यांच्याशी संपर्क साधल्याची चर्चा आहे. मात्र ते आपल्या निवडणूक लढवण्याच्या भूमिकेवर ठाम आहे.

दुसरीकडे राष्ट्रवादीकडूनही विष्णुपंत म्हैसधुने आणि गोरख बोडके यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. मात्र, गोरख बोडके यांनी मंत्री दादा भुसे आणि उदय सामंत यांची भेट घेऊन निवडणुकीतून माघार घेण्याबाबत चर्चा केली. या चर्चेनंतर काही बंडखोर उमेदवार लवकरच माघार घेतील, अशी अपेक्षा उदय सामंत यांनी व्यक्त केली.

# मराठा लाईट इन्फन्ट्रीतर्फे ‘अग्निवीर’ साठी मेगाभरती

■ बेळगाव

**मराठा** लाईट इन्फंट्री रेजिमेंटल सेंटरतर्फे सेंटरच्या छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियमवर २७ जूनपासून ३ जुलैपर्यंत लष्करात अग्निवीर भरती मेळावा होणार आहे. २८ व २९ जून रोजी महाराष्ट्रातील तर १ जुलै रोजी कर्नाटकातील उमेदवारांना संधी मिळणार आहे. पहिल्या दिवशी २७ जून रोजी खेळाडूंसाठी शारीरिक चाचणी होणार आहे. २८ रोजी केवळ महाराष्ट्रातील उमेदवारांसाठी अग्निवीर जनरल ड्युटी पदासाठी भरती होईल. यामध्ये अहमदनगर, अकोला, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, बीड, बुलडाणा, भंडारा, चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, गोंदिया, हिंगोली, जळगाव, जालना, कोल्हापूर, लातूर, मुंबई येथील उमेदवारांना सहभागी होता येईल. तर २९ रोजी नागपूर, नांदेड, नंदूरबार, नाशिक, धाराशिव, पालघर, परभणी, पुणे, रायगड, रत्नागिरी, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर, ठाणे, वर्धा, वाशीम, यवतमाळ या जिल्ह्यांमधील उमेदवारांना भरती प्रक्रियेमध्ये सहभागी होता येईल. १ जुलै रोजी मध्यप्रदेश, छत्तीसगड, गुजरात, गोवा, कर्नाटक व आंध्र प्रदेश येथील उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आले आहे.


## शंकरसिंग रघुवंशी



**शंकर जयकिशन या सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक जोडीतील शंकरसिंग रघुवंशी यांचा जन्म. १५ ऑक्टोबर १९२२ रोजी झाला.**

**शंकर यांचे पूर्ण नाव शंकरसिंग रघुवंशी. शंकर हे पृथ्वीराज कपुर यांच्या पृथ्वी थिएटर या नाटक कंपनीत तबला वाजविण्याचे काम करायचे. ते एका गुजराती चित्रपट निर्मात्याकडे संगीत देण्याची संधी मिळते का हे पाहण्यासाठी चकरा मारत होते. तेव्हा त्यांना जयकिशन नावाच्या तरुण मुलाची गाठ पडली. तोही याच कामासाठी चकरा मारत होता.**

**तो** हार्मोनिअम अप्रतिम वाजवायचा. या दोघांची ओळख झाली. संगीत दोघांच्याही रक्तात वहात होते. पुढे ही मैत्री इतकी घट्ट झाली की जयकिशन यांच्या अकाली जाण्यानंतरही १६ वर्षे एकट्या शंकर यांनी चित्रपटांना संगीत दिले पण नाव मात्र ‘शंकर जयकिशन’ असेच ठेवले होते. तसा त्या दोघांत करारच झाला होता असं म्हणतात. शंकर जयकिशन प्रतिभावंत संगीतकार होते. बरसात, आह, आवारा, श्री ४२०, जिस देश मे गंगा बहती है, बुट पॉलिश, संगम, मेरा नाम जोकर असे एकाहून एक चित्रपट देत शंकर-जयकिशन आणि राजकपुर या जोडीने इतिहास घडविला.शंकर जयकिशनचे नाव काढले की पहिल्यांदा राज कपुरच डोळ्यांसमोर येतो. मुकेशचा आवाज आपल्या कानात घुमायला लागतो ‘मेरा जुता है जपानी’, ‘आवारा हुं’, ‘किसी की मुस्कूराहटों पे हो निशा’, ‘दुनिया बनानेवाले क्या तेरे मन मे समाई, काहे को दुनिया बनाई’, ‘होठों पे सच्चाई होती है’ हीच गाणी येतात. कारण तशी प्रतिमाच तयार झाली आहे. शंकर जयकिशन यांच्याकडे लता मंगेशकर यांनी सर्वात जास्त ४६६ गाणी गायलेली आहेत. मोहम्मद रफी यांनी ३६३, आशा भोसले २१३ यांच्यानंतर मुकेश १३४ चा नंबर लागतो. किशोर कुमार यांनी १०३ आणि मन्ना डे यांनी ७७ गाणी गायलेली आहेत.



# कपालेश्वर मंदिराजवळ पहिल्याच पावसात वाड्याची भिंत कोसळली

■ नाशिक

**नाशिकमध्ये** पहिल्याच पावसात कपालेश्वर मंदिर परिसरात दुर्घटना घडली आहे. मंदिरालगत असलेल्या ‘बिवलकर वाडा’ या जुन्या इमारतीची भिंत कोसळल्याने परिसरात खळबळ उडाली. या घटनेत एक भाविक गंभीर जखमी झाला आहे.

काल नाशिक शहर परिसरात झालेल्या पावसामुळे या जुन्या वाड्याची भिंत अचानक कोसळली तसेच छताचा काही भाग आणि पत्रेही उडून गेले. घटनेच्या वेळी परिसरात अनेक भाविक उपस्थित होते. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे काही जणांना किरकोळ दुखापती झाल्या, तर एका भाविकाच्या डोक्याला गंभीर इजा झाली आहे. जखमी भाविकाला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

ही मिळकत ‘संस्थान श्री कपालेश्वर महादेव मंदिर’ यांच्या मालकीची असल्याची माहिती आहे. वाड्याचा काही भाग अत्यंत धोकादायक अवस्थेत असल्याने तो पाडण्याबाबत महापालिकेने यापूर्वीच नोटीस बजावली होती.

# पालिकेच्या सहाय्यक आयुक्ताला बलात्कार प्रकरणात जामीन मंजूर

**सत्र न्यायालयाचा दिलासा**

■ मुंबई

**लग्नाचे** खोटे आमिष दाखवून अत्याचार केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेल्या मुंबई महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त आरोपी नितीन चंद्रप्रताप शुक्लाला सत्र न्यायालयाने दिलासा दिला. शुक्लाला न्यायालयाच्या अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. के. करहाळे यांनी २५ हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला.

तक्रारदार महिला आर्किटेक्ट असून नितीन शुक्ला इमारत प्रस्ताव विभागात उपअभियंता म्हणून कार्यरत असताना दोघांची पहिली भेट झाली होती. त्यानंतर त्यांच्यात मैत्री झाली व दोघे संपर्कात राहिले. महिलेने केलेल्या आरोपानुसार शुक्लाने पत्नीसोबत कौटुंबिक वाद सुरू असल्याचे सांगून घटस्फोट घेतल्यानंतर महिलेशी लग्न करण्याचे आश्वासन दिले होते. त्या खोट्या आमिषाच्या जोरावर शुक्लाने सप्टेंबर २०२३ ते जानेवारी २०२६ या कालावधीत तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले आणि नंतर लग्न करण्यास नकार दिला. महिलेच्या तक्रारीच्या आधारे पार्कसाईट पोलिसांनी २७ एप्रिल रोजी शुक्लाला अटक केली होती. शुक्लाने जामीनासाठी सत्र न्यायालयात अर्ज केला होता. त्याच्यावतीने ॲड. सुदीप पासबोला यांनी बाजू मांडली.

# डहाणूकरवाडी मेट्रो लिफ्ट छेडछाड प्रकरणी आरोपीला रायपूरहून अटक

■ मुंबई

**कांदिवली** पश्चिम येथील डहाणूकरवाडी मेट्रो स्थानकाच्या लिफ्टमध्ये १७ वर्षीय विद्यार्थिनीशी छेडछाड करणाऱ्या आरोपीला कांदिवली पोलिसांनी अटक केली आहे. घटना घडल्यानंतर आरोपी रेल्वेने आपल्या गावी पळून जाण्याच्या तयारीत असताना पोलिसांनी छत्तीसगडमधील रायपूर जंक्शन रेल्वे स्थानकावरून त्याला ताब्यात घेतले.

संबंधित विद्यार्थिनी नेल आर्टच्या वर्गासाठी जात होती. डहाणूकरवाडी मेट्रो स्थानकात पोहोचल्यानंतर ती प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर जाण्यासाठी लिफ्टमध्ये चढली. त्यावेळी लिफ्टमध्ये ती एकटी असल्याचा फायदा घेत आरोपीने तिच्याशी गैरवर्तन केल्याचा आरोप आहे. घटनेनंतर विद्यार्थिनीने याबाबत माहिती दिल्यानंतर कांदिवली पोलिसांनी तपास सुरू केला.

सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपीची ओळख पटवण्यात आली. दरम्यान, आरोपी मुंबई सोडून रेल्वेने छत्तीसगडकडे रवाना झाल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांचे विशेष पथक रवाना करण्यात आले. पोलिसांनी रायपूर रेल्वे स्थानकावर सापळा रचून आरोपीला अटक केली.

# रीलमुळे दुबईत ४७ दिवस डांबले कॉमेडियन यश भारद्वाजचा दावा


■ दुबई

**स्टँड-अप** कॉमेडियन यश भारद्वाज याने म्हटले केला आहे की, अमेरिका-इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर दुबईतील गुगल मॅप्सच्या बिघाडावर बनवलेल्या एका रीलमुळे त्याला दुबईत ४७ दिवस ताब्यात ठेवण्यात आले आणि नंतर भारतात परत पाठवण्यात आले.

यश भारद्वाजने सांगितले की, तो एक निरुपद्रवी आणि विनोदी रील होता. मात्र, स्थानिक अधिकाऱ्यांना तो विनोद वाटला नाही. मला राष्ट्रीय सुरक्षेला धोका मानून ताब्यात घेण्यात आले आणि अटक करण्यात आली.

त्याच्या या दाव्यामुळे सोशल मीडियावर मोठी चर्चा रंगली असून, एका साध्या विनोदी व्हिडिओमुळे इतकी कठोर कारवाई झाल्याचा आरोप त्याने केला आहे. दुबईतील अधिकाऱ्यांकडून याबाबत अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.

# नवाकाळ शब्दकोडे-१६२६



**आडवे शब्द –**

२. घोडे बांधायची जागा ४. याग, यज्ञ ५. टोकदार ९. लग्नाच्या दिवशी सर्वप्रथम होणारा धार्मिक विधी; xxx बसविणे ११. संत ज्ञानेश्वरांची प्रसिद्ध रचना १४. बैरागी १५. भीतीदायक १७. उमर १८. सोय, प्रबंध २०. जळाऊ लाकूड २२. जादा नफा मिळवण्यासाठी व्यापाऱ्यांनी केलेली कृत्रिम टंचाई, मागणी असलेला माल साठवून लपवणे २४. स्पष्टवक्ता २७. कुंपण २८. क्रीडा ३०. सुखरूप ३३. हुरळून जाणे ३६. इतरांच्या मतांबद्दल आदर-सहिष्णुता असणारा ३९. ओझेवाहू, भारवाहक ४०. लता, वल्लरी ४१. वाराणशी ४२. त्रास, अपेष्टा ४३. बटीक, सेविका ४४. आठवड्याचा एक भाग ४६. गावाची सीमा ४७. अजाण, निरागस ४८. प्रणाम ४९. निर्मळ; मुलींचे एक नाव ५०. इच्छा, मनीषा ५१. मोजदाद ५३. मजल, मर्यादा ५४. रेशमाचे किडे या झाडाची पाने खातात ५५. पातळ गादी ५७. आरोग्यघातक पेय, वारुणी ५८. समईचे टोक ६०. सुंदर स्त्री ६१. शोक, रडणे ६२. प्रवाह ६४. साळुंकी ६६. मनातली इच्छा पूर्ण व्हावी म्हणून देवाला कबूल केलेली गोष्ट ६८. बाज विणण्याची जाड सुती पट्टी ६९. पडवी ७१. सोंगट्या व स्ट्रायकरचा खेळ ७३. बाणांचा भाता ७५. लहान भाकरी ७७. पाणकोंबडा ७९. मारुती ८०. काम संपवण्याचा झपाटा ८१. बोगस ८३. ताकद ८६. लेखी करार ८९. पाकातली बंगाली मिठाई ९१. इमारतीभोवतीची मोकळी जागा ९२. आग्रह ९४. गुण ओळखण्याची क्षमता ९५. रोख रक्कम ९७. पलीकडे, पैलतीरावर ९९. धमकी १००. श्यामरंगी १०२. देवांचा राजा १०४. गाडा १०६. डच्चू देणे १०७. कंटाळा न येणारे १०८. जळते लाकूड १०९. रामाच्या सेनेचा प्रमुख ११०. फक्त ११२. ताकीद ११३. लहान आकाराचे घोडे ११४. ज्येष्ठता, ज्येष्ठतेचा मान ११५. भेद, अंतर

**उभे शब्द –**

१. न्यून, उणीव २. अर्जुन ३. बिछाना ४. संमती ५. असमर्थ, असहाय ६. कुऱ्हाड ७. जाड व मोठी सुई ८. शान, वैभव ९. निधन होणे १०. कानवला १२. निरर्थक १३. पिवळ्या रंगाचा मिश्र धातू १४. हाक, हाळी, पुकारा १६. धार्मिक व्रत १९. सध्यापुरते २०. मुजरा, वाकून केलेला नमस्कार २१. झाडाचे पान २३. स्त्री, नारी २५. रवाळ २६. सूर्यापासून मिळणारी ऊर्जा २८. चक्कर, फेरी २९. उत्साह ३०. प्रश्न ३१. फरशी ३२. मामलेदार ३३. मिठाई करून विकणारा ३४. नाराज, रुष्ट ३५. तलवारीबरोबरचे आयुध ३६. उडाणटप्पू ३७. रसना; उसाचा रस ३८. तृषित, तृषार्त ४०. गुरांच्या नाकात घातलेली दोरी ४१. आचारी ४३. मूल्य, किंमत ४५. विहिरीतून पाणी शेंदण्याचे साधन ४६. निराळे, अलग ४७. वखवखलेला ४९. धूम्रपानाचा प्रकार, चुट्टा ५२. निर्मूलन ५४. पँट, विजार ५६. लिंबूवर्गातले, जाड सालीचे, पिवळे, नासपातीच्या आकाराचे फळ ५९. चोपडी ६१. विस्मरण ६२. तीक्ष्ण पाते ६३. चिथावणी ६५. प्रिय व्यक्तीची ताटातूट ६७. इमानदार ६९. पोटाचा खालचा भाग ७०. चरबी ७२. माणूस ७४. चिखल ७६. बारा राशीतील एक ७७. बगळा ७८. रागाने कुरकुरणे ८०. सर्प, अही ८१. नाशवंत ८२. आवाका; अंतर, टप्पा; पदर ८४. उष्ण ८५. न्याहारीतील एक पदार्थ ८७. राखण, पहारा ८८. दैत्य ९०. समतल पृष्ठभाग ९३. व्याकूळ, अस्वस्थ ९४. खेप, क्रम ९६. रावणाचे एक नाव ९८. अजाणता १०१. वशिला १०३. नित्य १०५. कपर्दिक १०६. लोभ, लालूच १०८. फ्लॉवर वर्गातली एक भाजी ११०. मोर १११. अभिप्राय •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६२५ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. बराक ३. पराधीन ६. भाकरी ९. खोटे ११. कलत्र १२. मणका १३. कोहिनूर १५. हिडीस १७. अनुजा १८. विसार १९. गोधडी २०. मिजास २२. इंद्रधनुष्य २४. साधू २५. समाधान २७. गज २८. ताठा २९. लकब ३१. काफिला ३२. वध ३४. राठ ३६. पन्हे ३७. आवश्यकता ३९. किसान ४०. कर्णा ४१. सामूहिक ४२. गवसणी ४४. आव ४५. कराल ४६. सखा ४९. थोतांड ५०. बाणेदार ५३. नजराणा ५४. संताप ५५. वाडा ५६. देवमासा ५८. जाग ५९. वधू ६०. सान ६१. कीव ६२. धमाका ६३. गय ६४. चणे ६६. मफलर ६८. यादवी ६९. गौडबंगाल ७०. अज ७१. खस ७२. वहिनी ७४. भंबेरी ७६. बिलामत ७८. फाया ७९. शिळा ८१. लाचखोर ८२. भुई ८४. नीरा ८५. सय ८६. चपखल ८८. त्वरा ९०. पावशेर ९१. अमदानी ९४. कदली ९५. वक्रदृष्टी ९६. हार्दिक ९७. सदाशिव ९८. विद्रूप ९९. नेता १००. और १०१. डेरेदार

**उभे शब्द** : १. बलभद्र २. रात्र ३. पणजा ४. राका ५. नकोसा ६. भानू ७. करगोटा ८. थंडी १०. टेकस १२. मनुष्य १४. हिरण्यकश्यपू १५. हिडीसफिडीस १६. समिधा १७. अनुज १८. विधू २१. जानवसा २२. इंदिरा २३. धग २४. साठा २६. माला २८. तान्हे मूल २९. लव ३०. बक ३३. धनदांडगा ३५. ठकवणे ३६. पसारा ३७. आकस ३८. ताग ४३. वर्म ४४. आबाळ ४५. करडा ४७. खानसामा ४८. इरादा ४९. थोपवणे ५१. दावानल ५२. शैव ५४. संग ५६. देवयानी ५७. माधवी ५८. जायबंदी ६०. साफसफाई ६३. गड ६४. चलबिचल ६५. रजत ६६. मख ६७. रव ६९. गौरी ७०. अमरत्व ७३. हिम ७५. बेकायदा ७७. लाखो ७९. शिरा ८०. नाच ८१. लाख ८२. भुजा ८३. आवली ८४. नीरवता ८५. समष्टी ८७. पलीकडे ८९. राजवट ९०. पादप ९१. अदृश्य ९२. नीहार ९३. उदार ९३. कद्रू ९७. सदा

# शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांची अमेरिकेत मालमत्ता?

पान १ वरून

या संस्थेवर अनेक आरोप केले जात आहेत. अशा परिस्थितीत केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या पत्नीचे नाव या संस्थेशी जोडले जाणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. लोकांच्या मनात संशय निर्माण होत आहे. त्यामुळे प्रधान यांनी याबाबत सत्य काय आहे ते जनतेसमोर मांडले पाहिजे, अशी मागणी बीजेडीच्या नेत्या राज्यसभेतील खासदार सुलता राव आणि पक्षाचे प्रवक्ते लेनिन मोहंती यांनी पत्रकार परिषदेत केली.

सीबीएसई आणि नीट परीक्षांमधील या गोंधळामुळे देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड रोष पसरला असून प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी विद्यार्थी करत आहेत. याच मुद्यावर सरकारला घेरण्याचा कॉकरोच पार्टीचा (सीजेपीचा) प्रयत्न आहे. केवळ व्यवस्थेवर व्यंगात्मक भाष्य करण्यासाठी सोशल मीडियावर जन्मलेल्या सीजेपीने अवघ्या महिन्याभरात राजकीय पक्षाचे रुप धारण केले आहे. स्थापन झाल्याच्या पहिल्या दिवसापासून बड्या कलावंतांनी पाठिंबा दर्शवलेल्या सीजेपीचे दोन कोटींपेक्षा जास्त फॉलोअर्स झाले आहेत. ६ जूनचे आंदोलन अत्यंत नियोजनबद्ध रितीने करण्याचे सीजेपीने ठरवले आहे. त्याचाच एक भाग म्हणून सीजेपीने तीन प्रवक्त्यांची नियुक्ती जाहीर केली आहे. शोध पत्रकार सौरव दास हे पक्षाचे मुख्य प्रवक्ते असणार आहेत. तर राजकीय विश्लेषक,लेखक आणि चित्रपट निर्मात्या विजेता दहिया आणि आयआयटी कानपूरचे माजी विद्यार्थी, आंतरराष्ट्रीय व्यवस्थापकीय सल्लागार संस्था मॅककिनसेचे आशुतोष रांका यांची प्रवक्तेपदी नियुक्ती करण्यात आली आहे. हे तिनही प्रवक्ते उच्चशिक्षित आणि आपापल्या क्षेत्रातील दिग्गज आहेत.

प्रधान यांच्या कार्यकाळात राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए) आणि केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) परीक्षांमध्ये झालेले गोंधळ गंभीर स्वरुपाचे आहेत. एनटीएने घेतलेल्या वैद्यकीय प्रवेशासाठी महत्त्वाच्या नीट यूजी २०२६ परीक्षेचा पेपर फुटल्याने परीक्षा रद्द करण्याची नामुष्की सरकारवर ओढवली. त्यामुळे लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे.सीबीएसई बारावीच्या निकालादरम्यान ऑनस्क्रिन मार्किंग (ओएसएम) प्रणालीच्या वापरामुळे गुणदान प्रक्रियेत आणि उत्तरपत्रिका तपासणीत मोठ्या त्रुटी आढळल्या. हजारो विद्यार्थ्यांना अपेक्षेपेक्षा अत्यंत कमी गुण मिळणे किंवा तांत्रिक कारणांमुळे गुण न दिसणे अशा समस्यांना सामोरे जावे लागले. सीबीएसईने यावर्षी इयत्ता १२ वीच्या परीक्षांसाठी ऑनस्क्रीन मार्किंग पद्धत लागू करण्यात आली होती. ज्यामध्ये छापील उत्तरपत्रिकांऐवजी स्कॅन केलेल्या डिजिटल प्रतिंचे मूल्यमापन केले गेले. मात्र कोएम्पट एडु टेक कंपनीला ही मूल्यमापन पद्धती योग्यरित्या वापरता आली नाही.उत्तर पत्रिका तपासण्यात तांत्रिक अडचणी आल्या. त्यामुळे गुणदानातही चुका झाल्या. या कंपनीच्या भूतकाळातील वादग्रस्त कारभारावरून काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी प्रधान यांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत.

एका पाठोपाठ एक घडणाऱ्या परीक्षा घोटाळ्यांमुळे संतप्त झालेल्या नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया (एनएसयूआय) आणि युवक काँग्रेसच्या वतीने दिल्ली, मुंबई, पुणे, नागपूरसह विविध शहरांमध्ये प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत युवा आक्रोश मोर्चे काढण्यात येत आहेत. परीक्षांमधील या गोंधळानंतर मूल्यमापन प्रणाली अधिक पारदर्शक करण्यासाठी आयआयटीमधील तज्ज्ञांची मदत घेऊन पोर्टल दुरुस्त करण्याचे आश्वासन प्रधान यांनी दिले आहे. भविष्यात परीक्षांमध्ये असा गोंधळ होऊ नये यासाठी संपूर्ण प्रक्रियेवर पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः लक्ष ठेवतील, असे अफलातून उत्तर सरकारने कोर्टात दिले आहे.

कारवाईच्या नावाखाली डिजिटल मूल्यमापन पद्धतीतील अनियमिततेची चौकशी करण्याचे आदेश दिले. त्याचबरोबर वादग्रस्त ठरलेले सीबीएसईचे अध्यक्ष राहुल सिंग यांना पदावरून दूर करून त्यांच्या जागी २००१ च्या बॅचचे आयएएस अधिकार प्रशांत लोखंडे यांची नियुक्ती करण्यात आली. तर सचिव हिमांशु गुप्ता यांना मूळ केडरमध्ये परत पाठवण्यात आले.मात्र ज्यांच्यावर शिक्षण मंत्रालयाची जबाबदारी सोपवण्यात आली होती त्या धर्मेंद्र प्रधान यांना सरकार का पाठीशी घालत आहे,असा प्रश्न आता विचारला जात आहे.

दरम्यान, सीबीएसईच्या ऑन स्क्रिन मार्किंग पद्धतीतील गोंधळ सर्वप्रथम बाहेर काढणारा १७ वर्षीय विद्यार्थी सार्थक सिध्दांत याने राहुल गांधी यांची भेट घेतली. सिद्धांतने काल ससंदीय स्थायी समितीसमोर आपली साक्ष नोंदवली.त्यानंतर काही वेळातच राहुल गांधी यांची भेट घेतली. आपल्या तत्वांवर ठाम रहा, असा सल्ला सार्थकला राहुल गांधी यांनी दिला.

## नीटची कोरी उत्तरपत्रिका २० लाखांत भरून देणारे एजंट

पान १ वरून

या ऑडिओ क्लिप आणि तक्रारीच्या आधारे देशातील या मोठ्या रॅकेटचा तपास करत आहे. विद्यार्थ्यांना त्यांची मुख्य उत्तरपत्रिका म्हणजेच ओएमआर शीट परीक्षेत कोरीच ठेवण्यास सांगितले जाते. तुम्ही फक्त तुमचे परीक्षा केंद्र आणि नंबर सांगा, त्या केंद्रावरील पर्यवेक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांना आम्ही पैशांच्या जोरावर मॅनेज करू. परीक्षा संपल्यानंतर आमची माणसे त्या कोऱ्या ओएमआर शीटवर अचूक उत्तरे शाईने भरून ती पुढे पाठवतील, असा दावा मध्यस्थांच्या टोळीकडून केला जात आहे. तपास यंत्रणांना किंवा कोणालाही संशय येऊ नये, म्हणून हे रॅकेट विद्यार्थ्यांना पैशांच्या बदल्यात टॉपर बनवत नाही. त्याऐवजी, विद्यार्थ्याला सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात हमखास प्रवेश मिळेल, इतकेच मर्यादित गुण ओएमआर शीटमध्ये भरले जातात. या संपूर्ण करामतीसाठी प्रति विद्यार्थी तब्बल २० लाख रुपयांचा दर ठरवला जातो.

## सीजेपीचे घोषणापत्र

सीजेपीने फक्त पाच मुद्यांवर भर देत आपले घोषणापत्र जाहीर केले. निवृत्तीनंतर सरन्यायाधीशांना राज्यसभेची खासदारकी दिली जाणार नाही. मतदार यादीतून एका जरी वैध मतदाराचे नाव वगळल्याचे आढळून आल्यास मुख्य निवडणूक आयुक्तांना बेकायदेशीर कायदे प्रतिबंधक कायद्यान्वये (यूएपीए) गुन्हा दाखल करून तत्काळ अटक केली जाईल. संसदेच्या जागा न वाढवता महिलांना ५० टक्के आरक्षण देणे, अदानी आणि अंबानींच्या मालकीच्या वाहिन्यांचे परवाने रद्द करणे आणि गोदी मीडियाची सर्व बँक खाती तपासणे आणि पक्षात बंडखोरी करून दुसऱ्या पक्षात प्रवेश करणाऱ्या नेत्यावर २० वर्षे कोणतीही निवडणूक लढवण्यास मनाई करणे हे पाच मुद्दे सीजेपीच्या घोषणापत्रामध्ये आहेत.

# महाराष्ट्रात पावसाची दमदार हजेरी

पान १ वरून

उपनगरांत १.२५ मिमी पाऊस झाला. वसई-विरार शहरातही गडगडाटासह जोरदार पाऊस झाला. पालघरमध्ये पावसामुळे तासभर वीजपुरवठा खंडीत झाला. कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यात रिमझिम पाऊस पडला असून हवामान विभागाने ६ जूनपर्यंत यलो अलर्ट जारी केला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातही अनेक भागांत तुरळक स्वरुपाचा पाऊस झाला. पुणे जिल्ह्यातील जेजुरी गडावर काल झालेल्या मुसळधार पावसामुळे गडावरील पायऱ्यांना धबधब्याचे स्वरूप आले होते.

सांगली-मिरज शहरासह जिल्ह्यात दुपारच्या सुमारास जोरदार पाऊस झाला. अर्धा तास कोसळलेल्या पावसामुळे अनेक सखल भाग आणि रस्त्यांवर पाणी साचले. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची धावपळ उडाली. कोल्हापूर, जयसिंगपूर आणि शिरोळ परिसरात सुमारे दीड तास मुसळधार पाऊस झाला. अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली, तर काही घरांवरील पत्रे उडून गेली. जयसिंगपूर शहरातील लक्ष्मी रोड परिसरातील अनेक घरांमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने नागरिकांची मोठी गैरसोय झाली. अहिल्यानगर जिल्ह्यातही मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली. पाथर्डी तालुक्यातील करंजी परिसरात मुसळधार पाऊस झाला. आठवडे बाजारात पाणी साचल्याने व्यापारी आणि नागरिकांची तारांबळ उडाली. बुलडाणा येथे पावसाने केळीचे नुकसान झाले.

# शिवसेना उभी फोडली आता तृणमूलवर घाव

पान १ वरून

संबंधित निर्णय स्वीकारत नाहीत. अभिषेक बॅनर्जींच्या लेटरहेडवर अध्यक्षांना पाठवलेल्या पत्रात शोभनदेव यांना विरोधी पक्षनेते करण्याचा प्रस्ताव पाठवला होता. आमदार संदीपन साहा आणि ऋतब्रत बॅनर्जी यांनी तक्रार केली होती की, या प्रस्तावावरील त्यांच्या सह्या बनावट आहेत. तक्रारीनंतर ममतांनी दोन्ही आमदारांना पक्षातून निलंबित केले होते. त्यानंतर ऋतब्रत बॅनर्जी आज २/३ पेक्षा अधिक आमदारांच्या समर्थनाने विधिमंडळ नेते झाले. जावेद खान, संदीपान साहा आणि शिउली साहा यांची उपनेते म्हणून निवड करण्यात आली आहे. तर अखरुज्जमान यांना मुख्य प्रतोद बनवण्यात आले आहे. दरम्यान, पक्षांतर्गत बंडखोरीच्या पार्श्वभूमीवर ममता बॅनर्जी यांनी आज राज्याच्या सर्व समित्या आणि फ्रंटल संघटना तात्काळ प्रभावाने विसर्जित केल्या. पक्ष आता संपूर्ण संघटनेची पुनर्रचना करणार असल्याची माहिती आहे. तर अभिषेक बॅनर्जी यांच्या अस्थापनांवर ईडीना छापा टाकला.

**जाहीर सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, श्री. दत्तात्रय कृष्णराव शिंदे हेगाव दहिसर, तालुका बोरिवली, जिल्हा मुंबई उपनगर येथील सी.टी.एस.क्र.१२९८/१ ते ८ असलेल्या जमिनीवर बांधकामित राष्ट्रीय मजदूर आनंद नगर युनिट क्र. ६ कोहौसो लि. म्हणून ज्ञात इमारत क्र.२७ या इमारतीतील बी विंग, चौथा मजला, फ्लॅट क्र. ४०४, बिल्ट अप क्षेत्रफळ ४२८.७६ चौ. फूट असलेल्या फ्लॅटचे मालक आहेत, त्यांनी मला श्री. राम नारायण सोमन यांच्या नावे स्पेस बिल्डर्स प्रा. लि. यांनी दि.१५.१२.१९८३ रोजी जारी केलेले मूळ वाटपपत्र हरवले/गहाळ झाल्याबाबत ही जाहीर सूचना प्रसिद्ध करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

ज्या कोणा व्यक्तिस सदर मूळ वाटप पत्र सापडले असेल, त्यांनी संपर्क साधून ते अधोस्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीकडे सुपूर्द करावे, अशी विनंती आहे. सर्व व्यक्तींना याद्वारे पुढील सूचना व विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त बाबींची दखल घ्यावी आणि त्यांना याद्वारे ताकीद देण्यात येत आहे की, उपरोक्त दस्तऐवज किंवा मालमत्तेच्या आधारावर कोणतेही तृतीय-पक्ष हक्क निर्माण करू नयेत, कर्ज घेऊ नये किंवा कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. असे करणारी कोणतीही व्यक्ती खर्च आणि परिणामांच्या बाबतीत स्वतःच्या जोखमीवर असे करेल आणि अशी कृत्ये/व्यवहार माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

यापुढे, कोणा व्यक्तिस सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागावर विक्री, अदलाबदल, गहाण, शुल्क, भेट, ट्रस्ट, वारसा, ताबा, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, अभिहस्तांकन, हस्तांतरण, वहिवाट, उपवहिवाट, मृत्युपत्र, उत्तराधिकार, परवाना, देखभाल, प्रलंबित वाद, कर्ज, आगाऊ, धारणाधिकार, तारण, आदेश, कोणत्याही न्यायालय, कर, महसूल किंवा वैधानिक प्राधिकरणांनी पारित केलेले किंवा निर्गमित केलेले निर्णय अथवा आदेश; जप्ती, तडजोड किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही दावा असलेल्या व्यक्तींनी त्यासंबंधीची माहिती व त्याच्या समर्थनार्थ वैध कागदोपत्री पुरावे अधोलिखितांकडे, बी/१०६, पहिला मजला, सईद मंझिल कोहौसो लि., पंडित दीनदयाल नगर, बसीन कॅथॉलिक बँक लि. समोर, माणिकपूर, वसई (पश्चिम), जि. पालघर–४०१२०२ येथे, या सूचनेच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात सादर करावेत, अन्यथा, अशा प्रकारचे कोणतेही दावे अस्तित्वात नाहीत असे गृहीत धरले जाईल आणि असल्यास ते दावे माफ केलेले अथवा त्याग केलेले मानले जातील.

वसई, दिनांक ०४ जून २०२६ रोजी

सही/-
डेव्हिड एस. डाबरे
वकिल उच्च न्यायालय, मुंबई

# कुवेत आणि बहरीनमधील अमेरिकी तळांवर इराणचा हल्ला! संघर्ष तीव्र

पान १ वरून

त्याला गुन्हेगारी कृत्य म्हटले आहे. कुवेत आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनलवर ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांमुळे मोठे नुकसान झाले असून अनेकजण जखमी झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. सुरक्षेच्या कारणास्तव विमानतळावरील उड्डाणे तात्पुरती स्थगित करण्यात आली आहेत. बहरीनच्या लष्करानेही तीन क्षेपणास्त्रे आणि अनेक ड्रोन पाडल्याचा दावा केला आहे. या हल्ल्यांना आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन ठरवत देशाचे संरक्षण करण्यासाठी सैन्य पूर्णपणे सज्ज असल्याचे बहरीनने स्पष्ट केले.

अमेरिकेने केशम बेट, गोरुक परिसर आणि होर्मुजजवळील काही तेलवाहू जहाजांवर कारवाई केल्याचे वृत्त आहे. त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने एका जहाजावर क्षेपणास्त्र हल्ला केल्याचा दावा केला आहे. त्यामुळे आखाती प्रदेशातील तणाव पुन्हा वाढला आहे. भारतातील इराणी दूतावासाने प्रसिद्ध केलेल्या व्हिडिओमध्ये अमेरिकन लष्करी तळांवरील हल्ले हे कायदेशीर आत्मसंरक्षणासाठी दिलेले प्रत्युत्तर असल्याचे म्हटले आहे. दुसरीकडे, युनायटेड स्टेट्स सेंट्रल कमांडने अमेरिकन नौदलाच्या पाचव्या ताफ्याच्या मुख्यालयावर यशस्वी हल्ला झाल्याचा इराणचा दावा नाकारला आहे. इराणचे केशम बेट हे होर्मुज सामुद्रधुनीच्या प्रवेशद्वाराजवळ असून आखाती प्रदेशातील सर्वात मोठे बेट मानले जाते. या बेटावर भूमिगत बोगदे, क्षेपणास्त्र प्रणाली आणि लष्करी तळ असल्याचे सांगितले जाते. जगातील मोठ्या प्रमाणातील तेल आणि वायू वाहतूक होर्मुज सामुद्रधुनीतून होत असल्याने या भागाला मोठे सामरिक महत्त्व आहे. अमेरिकेच्या मते, इराण या बेटाचा वापर सागरी मार्गांवर दबाव निर्माण करण्यासाठी करत असून त्यामुळे केशम बेट अमेरिका-इराण तणावाचे प्रमुख केंद्र बनले आहे. दरम्यान, लेबनॉनमध्ये इस्त्रायली हवाई हल्ले सुरूच असून नबातियेहसह अनेक भागांना लक्ष्य करण्यात आले. त्याला प्रत्युत्तर म्हणून हिजबुल्लाहकडून ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले करण्यात आल्याचे वृत्त आहे. त्यामुळे मध्यपूर्वेतील सुरक्षा परिस्थिती अधिकच चिंताजनक बनली आहे.

## भारतीय नागरिकाचा मृत्यू

कुवेत आंतरराष्ट्रीय विमानतळावर झालेल्या इराणी ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यात एका भारतीय नागरिकाचा मृत्यू झाला आहे. कुवेतमधील भारतीय दूतावासाने आज याबाबत अधिकृत दुजोरा दिला आहे. कुवेतच्या आरोग्य मंत्रालयाच्या माहितीनुसार, या हल्ल्यात विमानतळ कर्मचारी आणि प्रवाशांसह किमान ६३ जण जखमी झाले आहेत. कुवेते अधिकाऱ्यांनी सांगितले की, इराणच्या ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यामुळे विमानतळावरील विविध सुविधा तसेच काही राजनैतिक मिशनच्या इमारतींचे नुकसान झाले. हल्ल्यानंतर सुरक्षेच्या कारणास्तव कुवेत आंतरराष्ट्रीय विमानतळावरील उड्डाणे तात्पुरती स्थगित करण्यात आली होती.

# दिल्लीतील हॉटेलला भीषण आग

पान ८ वरून – दाखल करण्यात आले. संबंधित आस्थापनाला दिल्ली सरकारने 'बेड अँड ब्रेकफास्ट' योजनेअंतर्गत केवळ सहा खोल्या चालविण्याची परवानगी दिली होती. मात्र, प्रत्यक्षात तेथे तळघरासह सुमारे २५ खोल्या चालवल्या जात असल्याचा आरोप आहे. परवाना अटी व अग्निसुरक्षा नियमांच्या पालनाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. अग्निसुरक्षा नियमांचे पालन करण्यात आले होते का आणि हॉटेलचे संचालन मंजूर परवानगीनुसार सुरू होते का, याची चौकशी प्रशासनाकडून केली जाणार आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेतील मृतांबद्दल शोक व्यक्त केला आहे. त्यांनी मृतांच्या कुटुंबियांना पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येकी २ लाख रुपयांची मदत आणि जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. एक्सवरील संदेशात पंतप्रधान मोदी म्हणाले, दिल्लीतील मालवीय नगर येथील आगीत झालेली जीवितहानी अत्यंत दुर्दैवी आहे. आपल्या प्रियजनांना गमावलेल्या कुटुंबियांप्रती माझ्या संवेदना आहेत. जखमींना लवकर बरे वाटावे, हीच प्रार्थना. प्रभावितांना सर्वतोपरी मदत केली जात आहे. मृतांच्या निकटवर्तीयांना पीएमएनआरएफमधून २ लाख रुपये आणि जखमींना ५० हजार रुपयांची मदत दिली जाईल.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई–निविदा सूचना**

दि.०४.०६.२०२६ पासून महावितरण तर्फे सिंधुदुर्ग मंडळ कार्यालया अंतर्गत खालीलप्रमाणे ई–निविदा मागविण्यात येत आहेत.

| Sr. No. | Tender Details | Tender No. | Tender Amt Rs. | Emd Amt Rs. |
|---|---|---|---|---|
| १ | Supply of Kit Kat Fuse 63 A, 100 A & 200 A , as per MSEDCLspecifications for Kudal Division. | SE/SC/KDL/KIT KAT FUSE KUDAL/2026-27/T-06 | १०.०० लाख | १०,०००/– |
| २ | Supply of Kit Kat Fuse 63 A, 100 A & 200 A , as per MSEDCLspecifications for Kankavali Division. | SE/SC/KVL/KIT KAT FUSE KANKAVALI/2026-27/T-07 | १०.०० लाख | १०,०००/– |

सविस्तर ई–निविदा http://works.mahadiscom.in/eTender/etender संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत आहेत. ई–निविदा भरण्याची अंतिम मुदत दि. १८.०६.२०२६ वेळ १७:०० अशी आहे. सदर निविदेचे शुल्क व लागू असणारे बयाणा शुल्क ऑनलाईन पध्दतीने स्विकारले जातील. अधिक माहितीसाठी मंडल कार्यालय, सिंधुदुर्ग कुडाळ फोन नं. ७८७५७६५०७० यांचेशी संपर्क साधावा.

PRO/KZR/37/2026-27 dt. 03.06.2026

अधिक्षक अभियंता, सिंधुदुर्ग मंडळ

# नवाकाळ

• मुंबई । गुरुवार ४ जून, २०२६ • पान -८




## पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहरुंचा विक्रम मोडणार

**नवी दिल्ली -** तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधानपद भूषवणारे नरेंद्र मोदी हे देशाचे पहिले पंतप्रधान दिवंगत पंडित जवाहरलाल नेहरू यांचा सर्वाधिक काळ पंतप्रधान पदावर राहण्याचा विक्रम मोडणार आहेत. पंडित नेहरुंचा ४ हजार ३९७ दिवस पंतप्रधानपदी राहण्याचा विक्रम आहे. येत्या ९ जून रोजी मोदी हा विक्रम मोडणार आहेत. ९ जून रोजीच मोदींच्या तिसऱ्या कार्यकाळाला दोन वर्षे पूर्ण होत आहेत. १० जून रोजी होणाऱ्या रालोआच्या मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत प्रस्ताव मंजूर करून पंतप्रधान मोदींचे या ऐतिहासिक कामगिरीबद्दल अभिनंदन केले जाणार आहे.

# दिल्लीतील हॉटेलला भीषण आग! २१ ठार

■ नवी दिल्ली

**दक्षिण** दिल्लीतील मालवीय नगर परिसरातील 'बेड अँड ब्रेकफास्ट' योजनेअंतर्गत चालवल्या जाणाऱ्या हौज रानी येथील लेमन ग्रीन रेस्टॉरंटमध्ये आज सकाळी भीषण आग लागली. या आगीत किमान २१ जणांचा मृत्यू झाला, तर ३७ जणांची सुटका करण्यात आली. मृत्युमुखी पडलेल्या २१ जणांपैकी १८ परदेशी नागरिक आहेत. या आगीमुळे हॉटेलमध्ये एकच गोंधळ उडाला. धुराने भरलेल्या खोल्यांमधून बाहेर पडण्यासाठी अनेकांनी धावपळ केली. दोन महिलांनी जीव वाचवण्यासाठी इमारतीवरून उड्या मारल्या. ही आग प्रथम



तळघरात लागून ती पहिल्या व दुसऱ्या मजल्यापर्यंत पसरली.

दिल्ली अग्निशमन दलाला सकाळी सुमारे ९ वाजता आगीची माहिती मिळाली. त्यानंतर १० हून अधिक अग्निशमन वाहने घटनास्थळी रवाना करण्यात आली. आग विझविणे आणि अडकलेल्या लोकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू करण्यात आले. दिल्ली अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, सुरुवातीच्या टप्प्यात दोन वॉटर टेंडर, दोन वॉटर बाउझर, एक

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

क्विक रिस्पॉन्स वाहन आणि इतर अग्निशमन यंत्रणा घटनास्थळी पाठविण्यात आल्या. धुराने भरलेल्या भागातून शोधमोहीम राबवत बचावकार्य सुरू ठेवण्यात आले. सुरुवातीला तळघरातून तीन जणांना बाहेर

### दोन महिलांची इमारतीवरून उडी

काढून रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर बचाव पथकांनी हॉटेलच्या विविध भागांत शोधमोहीम राबवून अनेकांना बाहेर काढले. मात्र, मृतांचा आकडा वाढत गेला. आगीनंतरच्या दृश्यांमध्ये इमारतीचा संपूर्ण दर्शनी भाग जळून काळाकुट्ट झाल्याचे दिसून आले. अनेक मजल्यांवरील खिडक्या धुरामुळे काळवंडल्या असून आगीमुळे मोठे नुकसान झाले आहे. आगीत जखमी झालेल्या अनेकांना उपचारासाठी साकेत येथील मॅक्स रुग्णालय आणि एआयआयएमएस ट्रॉमा सेंटरमध्ये

पान ७ वर

# नवी मुंबई कृषी बाजार समितीचा कारभार मंत्री रावल यांच्या हातात

■ नवी मुंबई

**राज्यात** राष्ट्रीय बाजार समिती लागू झाल्यामुळे नवी मुंबईतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले आहे. पणन मंत्री जयकुमार रावल यांची 'राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराचे' अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, त्यांनी वाशी येथील कार्यालयात जाऊन अधिकृत पदभार स्वीकारला. आता राज्यातील या सर्वात मोठ्या बाजार समितीचा कारभार मंत्री रावल हे पाहणार आहेत. आपला पदभार स्वीकारल्यानंतर पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले की, यापुढे शेतकऱ्यांना त्यांचा माल ऑनलाईन पद्धतीने देशभरातील

### विद्यमान संचालक मंडळ बरखास्त

व्यापाऱ्यांना विकता येणे शक्य होणार आहे. राज्य सरकारचे धोरण शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून काम करण्याचे आहे. शेतीमालाला अधिक भाव मिळावा यासाठी पीक काढणीनंतरची संपूर्ण साखळी मजबूत केली जाणार आहे. कोल्ड स्टोरेज, गोदामे, कृषी उत्पन्न बाजार समित्या आणि निर्यात व्यवस्था बळकट करण्यावर भर दिला जाणार आहे.

राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजारपेठा विकसित करण्याचा सरकारचा मानस आहे. भविष्यात सुमारे ११०० ते १२०० एकर क्षेत्रावर जगातील सर्वात मोठी कृषी बाजारपेठ महाराष्ट्रात उभारण्याचा संकल्प आहे. या बाजारपेठेद्वारे महाराष्ट्रातील शेतीमाल जागतिक बाजारपेठेत पोहोचवण्याचा प्रयत्न आहे.

# विधान परिषद निवडणुकीत महायुतीची सरशी! महाविकास आघाडीची कोंडी

■ मुंबई

**राज्यातील** स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातील विधान परिषद निवडणुकीच्या १७ जागांसाठी राजकीय वातावरण तापले असून महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात थेट सामना रंगला आहे. उमेदवारी अर्जाची छाननी आणि माघारीच्या प्रक्रियेदरम्यान अनेक मतदारसंघांत राजकीय समीकरणे बदलताना दिसत आहेत. अर्ज बाद होणे आणि उमेदवारांच्या माघारीमुळे काही जागांवर महायुतीची स्थिती अधिक मजबूत झाली आहे. तर महाविकास आघाडीची कोंडी झाल्याचे दिसत आहे.

सोलापूर मतदारसंघात महायुतीने राजेंद्र राऊत यांना उमेदवारी दिली आहे. तर महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे आदित्य फत्तेपूरकर रिंगणात होते. अर्ज छाननीदरम्यान त्यांचा उमेदवारी अर्ज बाद ठरल्याने महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे. यवतमाळमध्ये महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार साहेबराव कांबळे यांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे. मतदारसंघातील संख्याबळ अपुरे असल्याचे कारण देत त्यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला. अमरावती मतदारसंघात भाजपाचे अधिकृत उमेदवार प्रवीण पोटे पाटील आहेत.

# गडकरींचे आश्वासन पुन्हा हवेत विरले मुंबई-गोवा महामार्ग ३१ मे नंतरही अपूर्ण

■ मुंबई

**मुंबई-गोवा** महामार्गाचे काम ३१ मे अखेर पूर्ण होईल, असे केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी दिलेले आश्वासन पुन्हा एकदा हवेत विरले. मुदत संपून जून महिना सुरू झाला तरीही महामार्गावरील अनेक महत्त्वाचे टप्पे अद्याप रखडलेले आहेत. त्यामुळे कोकणवासीयांचा प्रवास यावर्षीही त्रासदायक ठरणार आहे. या महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाला २०११ साली सुरुवात झाली होती. हे काम २०१४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र अनेक कारणांमुळे प्रकल्प वारंवार रखडत गेले. आज २०२६ उजाडले तरीही



महामार्ग पूर्णपणे सुरू झालेला नाही. दरवेळी नवीन मुदती दिल्या जात असल्या तरी प्रत्यक्ष कामाचा वेग अत्यंत संथ असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे.

कणकवलीत खासदार नारायण राणे यांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या १० एप्रिलच्या कार्यक्रमात गडकरी यांनी ३१ मे पर्यंत महामार्गाचे काम पूर्ण होणार असल्याचे स्पष्ट आश्वासन दिले होते. मात्र ही मुदत संपल्यानंतरही इंदापूर, माणगाव, कोलाड, वडखळ, नागोठणे यांसारख्या महत्त्वाच्या भागांतील कामे अपूर्ण आहेत. तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील आरवली ते कांटे दरम्यानचा रस्ता, चिपळूण आणि संगमेश्वर येथील पुलांची कामेही अद्याप पूर्ण झालेली नाहीत.

# शेतकरी कर्जमाफीचा शासन निर्णय जारी मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात उपसमिती स्थापन

■ मुंबई

**महाराष्ट्रातील** शेतकरी बांधवांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देणारा शासन निर्णय जारी करण्यात आला. शेतकरी कर्जमाफीचा आढावा घेण्यासाठी ७ जणांची मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील या उपसमितीत दोन्ही उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री, कृषी मंत्री, सहकार मंत्री आणि सहकार प्रधान सचिवांचा समावेश आहे. शेतकरी कर्जमाफीची अंमलबजावणी ऑनलाईन पद्धतीने केली जाणार आहे. याची संपूर्ण प्रक्रिया सहकार आयुक्त आणि निबंधक पाहणार आहेत.

अनेक दिवसांपासून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात यावी, या मागणीने चांगलाच जोर धरला होता. याची दखल घेऊन मंगळवारी महायुतीच्या मंत्रिमंडळ बैठकीत शेतकरी कर्जमाफीला मंजुरी देण्यात आली होती. आता लगेचच दुसऱ्या दिवशी आज तातडीने कर्जमाफीचा शासन निर्णय काढण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

# जैन समाजाचा प्रस्तावित इनाम विधेयकाला विरोध

■ मुंबई

**महाराष्ट्र** सरकारच्या प्रस्तावित महाराष्ट्र देवस्थान इनाम रद्द (मुसुदा) अधिनियम, २०२६ ला जैन संघटनांनी तीव्र विरोध दर्शवित हा मसुदा मागे घेण्याची मागणी केली आहे. या विधेयकामुळे धार्मिक मालमत्ता आणि मंदिर ट्रस्टच्या स्वायत्ततेवर परिणाम होऊ शकतो, अशी भीती संघटनांनी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्राचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या नेतृत्वाखाली जैन समाजाच्या प्रतिनिधी मंडळाने काल महसूल मंत्री बावनकुळे यांची भेट घेऊन प्रस्तावित कायद्याला विरोध दर्शविला. मुंबईतील ७५० हून अधिक जैन ट्रस्ट आणि संस्थांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या तसेच ११ लाखांहून अधिक जैन समाजबांधवांशी निगडित असलेल्या श्री मुंबई जैन संघ संघटन या महासंघाने या मसुदा कायद्याबाबत आक्षेप व्यक्त करत सरकारच्या सल्लामसलत प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. बावनकुळे यांना सादर केलेल्या निवेदनात महासंघाने सार्वजनिक अभिप्रायासाठी देण्यात आलेल्या मर्यादित वेळेवर टीका केली आहे. आक्षेप आणि सूचना सादर करण्याची अंतिम मुदत ५ जून २०२६ ठेवण्यात आली असून ती अपुरी असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. तसेच या मसुद्याची पुरेशी प्रसिद्धी न झाल्याने विशेषतः ग्रामीण भागातील अनेक मंदिर व्यवस्थापन संस्था आणि भाविकांना प्रस्तावित बदलांची माहितीच नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. महासंघाच्या कार्यकारिणी सदस्य अ‍ॅड. कमलेश शाह यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील किमान ६५ जैन मंदिरे मोठ्या प्रमाणावर इनामी जमिनींची मालकी राखून आहेत आणि या विधेयकाचा त्यांच्यावर थेट परिणाम होऊ शकतो.

# मच्छीमार युवकांसाठी राज्य सरकारचा ६ महिन्यांचा विशेष प्रशिक्षण उपक्रम

■ मुंबई

**राज्यातील** मत्स्यव्यवसाय क्षेत्र अधिक सक्षम व आधुनिक करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभागाने मच्छीमार युवकांसाठी सहा महिन्यांच्या विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाची घोषणा केली आहे. 'सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन व सागरी डिझेल इंजिन देखभाल आणि परिचालन' या प्रशिक्षणाच्या १३६ व्या सत्रासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

हे प्रशिक्षण मुंबईतील वर्सोवा येथील मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्रात १ जुलै २०२६ ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. प्रशिक्षणासाठी अर्ज करणारा उमेदवार कार्यशील मच्छीमार, शारीरिकदृष्ट्या सुदृढ व १८ ते ३५ वर्षे वयोगटातील असावा. त्याला पोहता येणे आवश्यक असून किमान चौथी उत्तीर्ण आणि मासेमारीचा दोन वर्षांचा अनुभव असणे बंधनकारक आहे.

# कर्नाटकचे २४ वे मुख्यमंत्री म्हणून डी.के.शिवकुमार यांचा शपथविधी

■ बंगळुरु

**कर्नाटकचे** २४ वे मुख्यमंत्री म्हणून डी.के.शिवकुमार यांनी आज बंगळुरु येथील लोक भवनमध्ये शपथ घेतली. यावेळी त्यांच्या हातात भारतीय संविधानाची प्रत होती. शिवकुमार यांच्यासह आणखी १३ आमदारांनीही मंत्रिपदाची शपथ घेतली. यामध्ये माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांचे विधान परिषदेचे सदस्य असलेले पुत्र यतींद्र सिद्धरामय्या आणि काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचे पुत्र प्रियंक खरगे यांनीही मंत्रिपदाची



शपथ घेतली. जी. परमेश्वर यांनी नवीन उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. या शपथविधी कार्यक्रमाला काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे उपस्थित होते.

३० मे रोजी झालेल्या काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत शिवकुमार यांची नेतेपदी निवड करण्यात आली होती. ते आता सिद्धरामय्या यांच्या जागी राज्याची धुरा सांभाळणार आहेत. सिद्धरामय्या यांनी २८ मे रोजी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. ते २० मे २०२३ ते २८ मे २०२६ या कालावधीत कर्नाटकचे मुख्यमंत्री होते.

# क्रिप्टोकरन्सी प्रकरणात कुंद्राला दिलासा! विदेश प्रवासाला परवानगी

■ मुंबई

**मुंबईतील** मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायदा (पीएमएलए) विशेष न्यायालयाने क्रिप्टोकरन्सी मनी लाँडरिंग प्रकरणात अभिनेत्री शिल्पा शेट्टीचा पती व उद्योगपती राज कुंद्राला दिलासा दिला. ६,६०० कोटी रुपयांच्या गेनबिटकॉइन प्रकरणात सुरू असलेल्या तपासादरम्यान न्यायालयाने त्याला ७ जून ते २७ जुलै या कालावधीत विदेश प्रवास करण्याची परवानगी दिली. न्या. आर. बी. रोटे यांनी स्पष्ट केले की, राज कुंद्राने त्याच्या स्वातंत्र्याचा गैरवापर केल्याचे कोणतेही पुरावे नाहीत.



विदेश प्रवास हा मूलभूत अधिकार आहे. त्यामुळे त्याला परवानगी दिली आहे. दरम्यान, ईडीने त्याच्या प्रवासाला विरोध करत फरार होण्याचा धोका असल्याचा युक्तिवाद केला होता. न्यायालयाने तो फेटाळत काही अटींवर विदेश प्रवासाला परवानगी दिली. न्यायालयाने नमूद केले की, या कालावधीत राज कुंद्रा हाँगकाँग, दुबई, टोकियो, लॉस एंजेलिस, टोरोंटो आणि मेलबर्न येथे प्रवास करू शकतात. मात्र, जर त्यांच्या अनुपस्थितीत खटल्याची महत्त्वाची प्रक्रिया सुरू झाली, तर त्यांना तत्काळ भारतात परत यावे लागेल.

# दाऊदच्या हस्तक सलीम डोलाशी संबंधित २० ठिकाणांवर ईडीचे छापे

■ मुंबई



**अंडरवर्ल्ड** डॉन दाऊद इब्राहिमचा सहकारी कुख्यात ड्रग तस्कर सलीम डोला याच्याशी संबंधित आर्थिक व्यवहारांचा तपास सुरू आहे. अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) महाराष्ट्र आणि गुजरातमधील डोलाच्या २० ठिकाणांवर एकाच वेळी छापे टाकत कारवाई केली. ड्रग तस्करी, हवाला व्यवहार आणि मनी लाँड्रिंगच्या संशयावरून ही कारवाई करण्यात आली.

ईडीने ही कारवाई मनी लाँड्रिंग प्रतिबंधक कायद्याअंतर्गत केली आहे. सलीम डोला हा आंतरराष्ट्रीय ड्रग सिंडिकेटचा महत्त्वाचा भाग असल्याचा संशय असून, त्याच्याविरोधात गुजरात एटीएस, महाराष्ट्र पोलीस आणि डीआरआय या यंत्रणा आधीपासून तपास करत आहेत. मुंबई, सुरत, राजकोट आणि अंकलेश्वर येथे एकाच वेळी छापे टाकून अनेक ठिकाणांची झडती घेण्यात आली. तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, सलीम डोला हा मेफेड्रोन किंग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ड्रग नेटवर्कचा प्रमुख सूत्रधार आहे. या नेटवर्कद्वारे मेफेड्रोन (एमडी) या कृत्रिम अमली पदार्थाची मोठ्या प्रमाणावर तस्करी होत आहे. या बेकायदेशीर व्यवहारातून मिळालेला पैसा हवाला मार्गाने देश-विदेशात वळवल्याचा संशय आहे. सलीम डोला आणि त्याच्या साथीदारांनी ड्रग्ज्या पैशातून बनावट नावाने मालमत्ता खरेदी केल्याचा संशय आहे. तुर्कियेत आणि इतर देशांमध्ये बनावट नावाने आर्थिक गुंतवणूक झाल्याचेही उघड झाले आहे. मार्च २०२४ मध्ये इंटरपोलच्या रेड कॉर्नर नोटीसनंतर त्याला तुर्कियेत अटक होऊन भारतात प्रत्यार्पण झाले.

# मिठागराची जागा खासगी विकासकांना स्थानिक मीठ उत्पादक कोर्टात जाणार

■ भाईंदर

**भाईंदरमधील** मीठागरची २२० एकर जागा खासगी कंपनीला देण्याच्या उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे तीव्र पडसाद उमटले आहे. स्थानिक मीठ उत्पादकांनी याविरोधात सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला आहे.

मिरा रोड पश्चिमेतील २२० एकर जागा मूळ राज्य शासनाच्या मालकीची होती. १९५८ मध्ये या जमिनीचा वापर मिठागरासाठी होत असल्याने ती मीठ आयुक्तांच्या नावे होती. या जागेवर खासगी कंपन्यांनी दावा केला होता. मात्र न्यायालयाने ही जागा खासगी विकासकांची असल्याचा निकाल नुकताच दिला होता. पारंपरिक जागा खासगी विकासकाकडे जाणार असल्याने स्थानिक मीठ उत्पादक हवालदिल झाले आहेत.

याबाबत मीठ उत्पादकांनी भाईंदरमध्ये एका सभेचे आयोजन केले होते. मीठ उत्पादकांच्या पिढ्यानपिढ्यांचा मालकी हक्क नाकारून बेठीस धरत असल्याचे यावेळी उत्पादकांनी सांगितले. या निर्णयाविरोधात मीठ उत्पादकांनी सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा निर्णय छोटे शिलोत्री सेवा संघाने केली आहे घेतला आहे.

कर्जमाफीसाठी सरकारने काढलेल्या शासन आदेशामध्ये अत्यंत जाचक अटी लागू करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे या वेळची कर्जमाफी सर्वात कडक अटी असलेली व खूप कमी शेतकऱ्यांना लाभ देणारी ठरणार आहे. सरकारच्या या निर्णयाच्या विरोधात संताप व्यक्त करण्यासाठी किसान सभेने या आदेशाची राज्यभर होळी करण्याची हाक दिली होती.

# कर्जमाफी शासन आदेशाची अकोल्यात शेतकऱ्यांकडून होळी

■ अकोले

**अहिल्यानगर** जिल्ह्यातील अकोले येथे यानुसार अध्यादेशाची होळी करण्यात आली. उद्या व परवा सलग दोन दिवस राज्यभर हे होळी आंदोलन सुरू राहणार आहे. सरकारने कर्जमाफी करताना, २०१९ मध्ये कर्जमाफी घेतलेले शेतकरी, जरी ते यावेळी थकित असले तरी त्यांना ५० हजार रुपयांच्या मर्यादेत कर्जमाफी देण्यात येणार आहे. नियमित कर्जदारांना सुद्धा केवळ ५० हजार रुपये देण्यात येणार आहेत. त्यांनाही किमान दोन वर्षे नियमित कर्जदार असणे ही अट टाकण्यात आली आहे. अत्यल्प पगारावर राबणाऱ्या सहकार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना कर्जमाफीतून वगळण्यात आले आहे. निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना सातबारा कोरा करण्याचे आश्वासन देण्यात आले होते आणि आता २ लाखाचे कर्ज माफ करणार सांगून बहुसंख्य शेतकऱ्यांची केवळ ५० हजारावर बोळवण करायची ही अत्यंत संतापजनक गोष्ट आहे. शेतकऱ्यांची घोर फसवणूक आहे.

शेतकऱ्यांच्या या फसवणुकी विरोधात शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप असून तो राज्यभर आंदोलनाच्या माध्यमातून व्यक्त होत आहे.

# स्कूल बस शुल्कात १५ टक्क्यांची वाढ

■ मुंबई

**महाराष्ट्रातील** शालेय बस चालक-मालक संघटनेने जूनपासून शालेय बस वाहतूक शुल्कात १५ टक्के वाढ जाहीर केली. शासनाकडे वारंवार निवेदने देऊनही कोणतीही मदत मिळाली नाही. त्यामुळे वाढते खर्च लक्षात घेता शुल्कवाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

डिझेल, कर्मचाऱ्यांचे वेतन, वाहन देखभाल, विमा, टोल, परवाना शुल्क, सुटे भाग, ई-चलन दंड आणि महागाईमुळे खर्चात मोठी वाढ झाली असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. नवीन शैक्षणिक वर्षापासून ही दरवाढ लागू होणार आहे. पालक आणि शाळांनी सहकार्य करण्याचे आवाहन संघटनेने केले आहे.

# शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा संदेश नवे पर्व युवा सर्व! ४२ प्रभारी नियुक्त

■ मुंबई

**शरद पवार** यांच्या राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष महबूब शेख यांनी राज्यातील विविध शहरांसाठी प्रभारी पदांच्या ४२ नव्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. या नियुक्त्यांमधून शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने नवे पर्व युवा सर्व, असा संदेश दिला आहे. या नियुक्त्यांमध्ये मालेगाव शहराची जबाबदारी सलग तिसऱ्यांदा शादाब सय्यद यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. महबूब शेख यांनी राज्यातील ४२ शहरांसाठी प्रभारी नियुक्त्या जाहीर



केल्या आहेत. यामध्ये संदीप किते (नागपूर), गोरख नलावडे (पुणे), प्रशांत बाबर (कोल्हापूर), सौरभ मिश्रा (भंडारा-गोंदिया), तेजस शिंदे (नवी मुंबई), निळकंठ वडमोरे (छत्रपती संभाजीनगर), प्रमोद सर्वदे (मीरा-भाईंदर), भरत सौंदाणे (नंदुरबार) आणि प्रवीण लोणकर (चंद्रपूर) यांचा समावेश आहे. नियुक्त्यांची घोषणा करताना महबूब शेख यांनी सोशल मीडियावर पोस्टमध्ये शुभेच्छा संदेश दिला. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे व विधिमंडळ पक्षनेते जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी नव्या पदाधिकाऱ्यांनी कार्य करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.